।। दत्तात्रेय ॐ नमः शिवाय श्री सदानंदाय नमः ।।

# ।। प. पू. सद्‌गुरु श्री सदानंद महाराज ।।




www.sadgurusadanandamaharaj.com

-: संकलन :-

**श्री. नागेश जोशी** (प्रथमावृत्ती)
**श्री. पांडुरंग पाटकर (पप्पा)** (द्वितीयावृत्ती)
**श्री. मदन पोखरे**

## प. पू. सद्गुरु श्री सदानंद महाराज

# अमृतानुभव

*प्रकाशक :*
**सद्गुरु श्री सदानंद महाराज आश्रम चॅरीटेबल ट्रस्ट**
''शिल्पा'' वृंदावन को-ऑप-हाऊसिंग सोसायटी
डंकन कॉजवे रोड, शीव, चुनाभट्टी,
मुंबई ४०० ०२२.
फोन : (०२२) ४०७ ४५७८

*मुद्रक :*
**श्री. मोहन नारायण सुर्वे**
लक्ष्मी प्रिंटींग प्रेस
२०७, बोरा बाजार स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
फोन : २६२ २२७९, २३४ ७९७१

प्रथमावृत्ती : मे १९७६ - *महिमा*

द्वितीयावृत्ती : मार्च २००२ - *अमृतानुभव*
(महाशिवरात्री)

मूल्य : **रुपये तीस फक्त (रु. ३०/-)**

www.sadgurusadanandamaharaj.com

# अभिमत

माणसाचे जीवन अनेक अंगाने घडत असते. माणूस जन्माला आल्यापासून स्वत:च्या जीवनाची सर्वांगिण उन्नती व्हावी म्हणून धडपडत असतो. चांगले जीवन चालविण्यासाठीं, आर्थिक सुबत्ता निर्माण करुन घेण्याचा, स्वाभाविकच सर्वांचा प्रयत्न असतो.

आर्थिक सुबत्ता निर्माण झाली म्हणजे माणसाचे जीवन संपन्न होते असा सर्वसाधारणपणे समाजामध्ये समज असतो आणि ते स्वाभाविकच आहे. पण माणसाचे जीवन केवळ पैशानेच समृध्द होऊ शकेल काय या प्रश्नाची चर्चाही मानवी जीवनामध्ये सततच होत राहीली आहे. केवळ पैशाने अगर भौतिक प्रगतीनेच माणसाचे जीवन संपूर्ण समृध्द होत नाही हा सिध्दान्तही सर्वसाधारणपणे मान्य झाला आहे. आर्थिक सुबत्तेबरोबरच सदाचाराचा व सद्‌विचाराचा संस्कारही माणसाच्या जीवनावर होत राहण्याची गरज असते हे आज सर्वमान्य झाले आहे. माणसाच्या जीवनामध्ये सदाचार व सद्‌विचार निर्माण व्हावा म्हणून धार्मिक प्रभावनेचे कार्यही अनादीकालापासून होत आले आहे. जशी माणसाच्या जीवनामध्ये पैशाची आवश्यकता आहे तसेच त्याच्या जीवनाला धार्मिक प्रभावनेची जोड असावी लागते.

या दोन्ही गोष्टी साध्य करुन घ्यावयाच्या झाल्यास आणि माणसाला खरी जीवनदृष्टी यावयाची झाल्यास मनुष्य हा शहाणा झाला पाहिजे. तो ज्ञानी झाला पाहिजे. माणसाला ज्ञानही पाहिजे व धार्मिक प्रभावनाही पाहिजे. धार्मिक प्रभावनेला ज्ञानाची जोड पाहिजे. आणि ज्ञानाला धार्मिक प्रभावनेची अर्थात डोळस धर्माची बैठक असावी लागते. ज्ञानयुक्त धर्म व धर्मयुक्त ज्ञान याचा अर्थ डोळस धर्म आणि धर्मप्रभावनेने भरलेले ज्ञान, असाच संस्कार माणसाच्या मनावर होत राहण्याची गरज आहे.

अशा प्रकारचा समाज बनावा म्हणून भारतीय समाजामध्ये संतमाहात्म्यांनी प्रभावीपणे कार्य केले आहे. संतमहात्म्यांची प्रभावळच भारतीय समाजामध्ये निर्माण झाली आहे. माणसाला गती मिळण्यासाठी माणसाने सद्‌गुरु करुन घ्यावा अशी भारतीय समाजाची शिकवण आहे. अशा रितीने थोर संतमहात्म्यांना गुरु मानून आणि त्यांच्यावर श्रध्दा व भक्ती ठेऊन माणूस आपल्या जीवनाचा विकास करुन घेण्याचा प्रयत्न करीत असतो. भारतीय समाज जीवन संतमहात्म्यांच्या प्रभावळीने संपन्न झाले आहे.

अशाच संतमहात्म्यांच्या प्रभावळीमध्ये श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांचा प्रभावीपणे उल्लेख करावा लागेल. श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांना आपले गुरु मानून भक्ती करणारे हजारो स्त्री-पुरुष ठिकठिकाणी विशेषत: कर्नाटक आणि महाराष्ट्रांत पसरलेले आहेत. अशा प्रकारे श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या कार्याची माहिती सर्वांना

होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने त्यांचे जीवनचरित्र लिहिण्याचा विचार झाला. पण श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या आयुष्यक्रमांच संपूर्ण यथासांग माहिती मिळविणे अशक्य झाल्यामुळेच लेखकाने भक्तांना आलेला अनुभवांचे संकलन करुन श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांची योग्य रितीने ओळख करुन देण्याचा प्रयत्न ''श्री सद्‌गुरु सदानंद महाराज-महिमा'' या पुस्तकांत लेखकानी केलेला आहे. त्यांनी या पुस्तकात ग्रंथीत केलेले भक्तांचे अनुभव रोमांचकारी आहेत आणि ते सोप्या व सुटसुटीत भाषेमध्ये उधृत करण्यामध्ये लेखकाने महत्वाजे सम्यगदर्शन वाचकांना घडविले आहे.

कदाचित भक्तांचे अनुभवातून समाजामध्ये अंधश्रध्दा निर्माण होण्याची शक्यता आहे. पण श्री सद्‌गुरु सदानंद महाराज यांचे सारे जीवन आणि त्यांचे विचार डोळस आणि अंधभक्ती विरोधी आहेत. त्यांचा जीवनामध्ये तथाकथित बुवाबाजी निर्माण होऊ नये असा कटाक्ष व प्रयत्न असतो. म्हणून सदरच्या पुस्तकाच्या वाचकमंडळींनी त्याच्या निरनिराळ्या भक्तांचे अनुभव त्या दृष्टीनेच तपासून घेण्याची गरज आहे. तसे वाचक घेऊ शकले नाहीत तर श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांवर नकळत अन्याय होण्याचा संभव आहे. श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांचे जीवन निर्मळ आहे तितकेच ते डोळस आहे. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात सह्रदयता आहे. माणसाच्या जीवनामध्ये खरी मानवता निर्माण व्हावी असाच त्यांचा भाव आहे. श्री सद्‌गुरु सदानंद महाराज यांचे जीवनाचे हे खरे स्वरुप जनमानसामध्ये सतत राहावे असे मला वाटते आणि या पुस्तकाच्या लेखकाचा तोच हेतू आहे या संबंधी मला शंका वाटत नाही.

सदर पुस्तक वाचकांना मानवी जीवनाची डोळस प्रेरणा देईल व ते डोळस भक्तीमार्गाकडे वळतील याची मला खात्री वाटते. श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या जीवनचरित्राचे वैशिष्ठय पुस्तकरुपाने प्रकाशित करुन लेखकाने फार मोठे मौलिक सेवेचे कार्य केले आहे. त्याबद्दल पुस्तक लेखकाना मी धन्यवाद देतो आणि त्यांच्या पुस्तकातून श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या संत सदाचाराची व सद्‌विचाराची सरिता समाज जीवनात समर्थपणे आणि निर्मळपणे वहात राहो अशा शुभभावना मी व्यक्त करतो.

**रत्नाप्पा कुंभार**

मुंबई, अन्न व नागरी पुरवठा मंत्री,

२९ एप्रिल, १९७६. महाराष्ट्र शासन.

www.satgurusadanandmaharaj.com

# प्रस्तावना

भारतात आपला धर्म व संस्कृती यांच्या रक्षणाचे महत्कार्य पुराणकालापासून अनेक ऋषी, महर्षी आणि साधूसंतांनी केले आहे. त्या सर्वांचे मार्ग भिन्न असूनही अंतिम उद्दिष्ट मात्र एकच असलेले दिसून येते अशा या साधूसंतांना आणि सत्पुरुषांना आपले कार्य पार पाडीत असताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले आहे. स्वकियांकडूनच निंदा नालस्ती आणि छळ सोसावा लागला आहे. हे सर्व आघात सोसूनच ते आज पूजनीय ठरले आहेत.

शिरडीचे श्री साईबाबा, शेगावचे श्री गजानन महाराज, कर्नाटकातील श्री सिध्दारुढ स्वामी, मुंबईचे श्री नित्यानंद आदी अनेक अवतारी सत्पुरुषांमध्ये एका बाबतीत विलक्षण साम्य दिसून येते. यांतील कोणीही शिकलेले नाहीत, तरी अगाध ज्ञानभांडार त्यांच्याजवळ दिसून येते. भक्तांचे कल्याण करण्यातच त्यांनी आपले आयुष्य घालविले. त्यांनी केलेल्या अनेक चमत्कारांतही विलक्षण साम्य आहे. पूर्वी ऋषीमुनी शिष्यांकडून गुरुदक्षिणा स्वीकारीत. पण या सत्पुरुषांनी तीही स्वीकारली नाही. त्यांना हवे असायचे एकच. निष्ठा आणि ईश्वर भक्ती.

अशाच परंपरेतल्या एका सत्पुरुषाची ओळख करुन देण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे. स्वामी श्री सद्‌गुरु सदानंद महाराज आपल्या भक्तांत 'बाबा' म्हणून प्रिय आहेत. केवळ नेमाने ईश्वराचे ध्यान करा आणि गुरुंच्याठायी अढळ श्रध्दा ठेवा, तुमचे कल्याण होईल, ही बाबांची थोडक्यात शिकवण. बाबा कसलाही उपदेश करीत नाहीत, मंत्रतंत्र सांगत नाहीत. लहानमोठा, गरीब-श्रीमंत हा भेद मानीत नाहीत आणि म्हणूनच समाजातील सर्व धर्मातील आणि सर्व थरांतील लोकांना बाबा आपलेच आहेत असे वाटते.

"जो आपल्या शिष्यांचे किंवा भक्तांचे दु:खनिवारण करतो तोच खरा सत्पुरुष समजावा" असे नेहमीच बाबा म्हणतात. अशा अनेक भक्तांचे कल्याण झाल्याचे आम्ही पाहिले आहे.

सत्पुरुषांचे महात्म्य त्यांच्या हयातीतल्यापेक्षा त्यांच्या पश्चातच लोकांना कळून येते व ते त्यांचा महिमा गाऊ लागतत. याला काय बरे कारण असावे? बाबांना ज्यांनी जवळून पाहिले आहे, जे त्यांच्या सान्निध्यात राहिले आहेत, ज्यांनी बाबांचे अद्‌भुत चमत्कार पाहिले आहेत त्यांना बाबा हे अवतारी पुरुष आहेत याबद्दल शंका येत नाही.

भक्तांना आजपर्यंत आलेले अनुभव, त्यांनी पाहिले बाबांचे चमत्कार आणि त्यांच्या अद्‌भुत-लीला यांचे संकलन या पुस्तकात केले आहे. या कामात सर्वच भक्तांनी उत्स्फूर्ततेने मदत केली आहे. भक्तांच्या अनुभवपुष्पांची माळ गुंफण्याचेच तेवढे काम माझे.

www.sadgurusadanandamaharaj.com

बाबांच्या ठायी अल्पशी सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल मला धन्यता वाटते. या थोर सत्पुरुषाची ओळख सर्वांना व्हावी आणि त्यांचाही उध्दार व्हावा एवढाच हे पुस्तक प्रकाशित करण्यामागील उद्देश आहे. माझे मित्र श्री. एस. के. कुळकर्णी यांच्या मदतीशिवाय हे संकलन करणे अशक्य होते. त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. तसेच या पुस्तकासाठी ज्यांनी मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत केली त्यांचा मी ॠणी आहे. माझ्या हातून अधिक-उणे काही लिहिले गेले असल्यास भक्तांची मी क्षमा मागतो.

श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या चरणी ही कृती अर्पित करुन त्यांचे आशिर्वाद सर्व भक्तांना मिळावेत अशी प्रार्थना करतो.

**नागेश जोशी**
संकलक

www.sadgurusadanandamaharaj.com



# प्रस्तावना

(दुसरी आवृत्ती)

प. पू. सद्‌गुरु श्री सदानंद महाराज यांनी मुंबई-बेंगलोर परिसर, विजापूर परिसर आणि रायापूर परिसरांत सगुण रुपात, दर्शविलेल्या साक्षात्काराच्या अनुभवावरुन असें दिसुन येते, की प. पू. सदानंद बाबा हे अद्‌भुत शक्ती असलेले सिध्द पुरुष होते. भक्तांमध्ये ते ''बाबा'' म्हणुन प्रिय होते. ते कुठलाच जातीभेद मानीत नसत! तेलगी, कन्नड, मराठी, मुसलमान, पंजाबी, गुजराथी सर्व धर्माचे लोक बाबांपाशी येऊन आपल्या वरील संकटांचे, दुःखाचे, निवारण करीत. महाराजांनी सिध्दीचा कधीही दुरुपयोग केला नाहीं, आपल्या भक्तांना योग्य ते मार्गदर्शनही करित असत. प. पू. अक्कलकोटस्वामी, प. पू. साईबाबा, भालचंद्र महाराज, गजानन महाराज या विभूतींना शालेय शिक्षण न घेता पूर्ण ज्ञान, दैवी शक्ति प्राप्त झाली होती. प. पू. सदानंद बाबांनाही कसलेच शिक्षण न घेता हें सर्व जन्मतांच प्राप्त झाले.

स्वतः देहत्यागाची वाणी २ वर्षापूर्वी म्हणजे १२-२-१९९४ रोजी मुंबई आश्रमी भक्तांसमोर केली की ''मी फक्त २ वर्षे आहे''. हे ऐकताच सर्व भक्त रडू लागले. भक्तांच्या समाधानासाठी त्यावेळी बाबा म्हणाले, ''तुम्ही रडू नका मी तुमच्या सोबत आहे''. त्यानंतर बरोबर २ वर्षांनी म्हणजेच १२-२-१९९६ रोजी बाबांचे महानिर्वाण झाले, तरी निर्गुण रुपात, भक्तांच्या स्वप्नांत येऊन ''तुझे कल्याण होईल'' हे शब्द खरे ठरल्याचा अनुभव अजुनही भक्तांना येतो. एवढेच नव्हे तर त्यांच्या गादीचें दर्शन घेतानाही भक्तांच्या मनातील इच्छा फलद्रुप होतात.

म्हणुनच पहिल्या आवृत्तीतील शब्दाक्षरें जशीच्या तशी ठेवून, नंतर भक्तांना आलेल्या साक्षात्काराच्या अनुभवावरुन आवृत्तीत वाढ केलेली आहे, कारण चरीत्र वाचत असताना प. पू. सदानंद बाबा आमच्यात आहेत, असा आभास होतोच व ही दुसरी आवृत्ती तयार होतांना, काहीं अनुभवी प्रसंग घालावेत म्हणून हा प्रयत्न.

मी कधी काव्य-गीतें केलीच नव्हती, परंतु प. पू. सद्‌गुरु सदानंद बाबांच्या सहवासात राहून त्यांच्या प्रेरणेनेंच बाबांचा 'जीवन चरित्र महिमा' लिहिला आणि काही गीतेही संगीत बध्द केली आहेत आणि ती आश्रमात दररोज गायली जातात. कारण

सद्‌गुरु वाचोनी सापडेना सोय ।।
धरावे ते पाय आधी त्याचे ।।

किंवा

गुरु परमात्मा परेशू ।।
ऐसा ज्याचा दृढविश्वासू ।।

www.sadgurusadanandmaharaj.com

ब्रम्हांडामध्ये असणाऱ्या अणू-रेणूत सुध्दा जो परमात्मा भरुन राहिलेला आहे. आत्मज्ञानाद्वारे जो त्या स्वरुपाचा ठाव घेतो, तो त्या स्वरुपातच मिसळतो, तसाच तो गुढ व स्थिर आहे. त्याच्या ठिकाणी दुजेपणा नाही ही खूण सद्‌गुरु कृपेने कळली की ते प्रत्ययाला येते. त्यासाठी हा प्रयत्न.

गुरु म्हणजे ईश्वराचे साकार रुप व ईश्वर म्हणजे गुरुंचे निराकार रुप, गुरु आपल्या शिष्याला अस्तित्वाची आठवण करुन देतात, शिष्याची प्रगती कशी होते हे गुरुच पहात असतो, तो आपल्या डोळयातुन जाणतो. शिष्याने ध्यान-धारणा-अध्यात्म-नामस्मरण-श्रध्दा-भाव, या माध्यामातुन स्वत:ची प्रगती त्यानेच करावी, तोच स्वत:चा शिल्पकार असतो. त्या मागे मात्र सद्‌गुरुची प्रेरणा असते हें निश्चित.

**।। दत्तात्रेय ॐ नमः शिवाय श्री सदानंदाय नमः ।।**

**पांडुरंग पाटकर (पप्पा)**
संकलक



www.sadgurusadanandamaharaj.com

# प्रस्तावना

प्रिय वाचक व गुरु बंधू भगिनींनो,

परम पूज्य श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांचे महानिर्वाण १२-२-१९९६ रोजी झाले.


प. पू. सद्‌गुरु श्री सदानंद बाबांनी सगुण रुपात साक्षात्काराच्या रुपाने दर्शविलेल्या अनुभवावरुन असें दिसुन येते कीं, बाबांचे महानिर्वाण झालेच नाही असे वाटते, निर्वाणानंतरही भक्तांना साक्षांत दृष्टांत देऊन आपल्या अवतार कार्याची प्रचिती सर्व भक्तांना, महिमा भजनादी कार्यक्रम व गुरुपौर्णिमा, दत्तजयंती, महाशिवरात्री उत्सवातुनही देत असतात. ''तुझें कल्याण होईल'' हे त्यांच्या मुखातील शब्द निर्गुण रुपातील प्रगटीकरणातुन जाणीव करुन देतात.

ऐवढेच नाही तर मुंबई, विजापूर, बेंगलोर आणि रायपूर (समाधी मंदिर) येथील आश्रमांत येणाऱ्या भक्तांनाही, त्यांच्या गादीचे दर्शन घेतल्यावर प्रचिती येते, दर्शनानंतर भक्तांच्या मनांतील इच्छा पूर्ण होतात, बाबा हे खरोखरच अवतारी पुरुष होते, अर्थांत अवतारी पुरुषांनाही आपले कार्य संपल्यावर देह सोडावा लागतो. तरीही प. पू. सदानंद बाबा अजुनही आमच्यासोबत निर्गुण रुपात वावरत आहेत.

म्हणून पहिल्या आवृत्तीमधील शब्द वाक्य प्रसंग, चरित्र वाचत असताना वर्तमानकाळातील प्रसंग तसेच ठेवले आहेत, आजही प. पू. बाबा आमच्या सोबत आहेत, होते व यापूढेही असतील या सद्‌भावनेने आम्ही; पहिल्या आवृत्ती नंतर बाबांनी दर्शविलेले साक्षात्कार व भक्तांचे अनुभव वाढविले आहेत. ते वाचकांना, भक्तगणांना माहितीसाठी येथे देत आहोंत. म्हणुनच दुसरी आवृत्ती छापून पूर्ण करण्याची संधी, प. पू. बाबांच्या आशिर्वादानेच आम्हाला लाभली हेच आमचे भाग्य.

धन्यवाद !

**श्री. मदन कृ. पोखरे**
संकलक



www.sadgurusadanandamaharaj.com



**मुंबई आश्रम - दत्त मंदिर**
१, शिल्पा वृंदावन सोसायटी,
सायन - चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२.
फोन : (०२२) ४०७४५७८

**विजापूर आश्रम - दत्त मंदिर**
उप्पली बुरुजा समोर,
विजापूर ५८६ १०१.
फोन : (०८३५२) २०३३९

**बेंगळूर आश्रम - सद्गुरु श्री सदानंद महाराज आध्यात्मिक केंद्रं**
दत्त मंदिर, २४, पॅलेस क्रॉस रोड,
अरमाने गुट्टळळी, बेंगळूर ५६० ०२०.
फोन : (०८०) ३६८२२३

**रायापूर आश्रम - समाधी मंदिर**
हुबळी-धारवाडच्या मध्ये,
'रायापूर', जिल्हा धारवाड.
फोन : (०८३६) ३२४००१

meoie® ßee meoeveo cenejepe ÛejCee DeheCe

www.sadgurusadanandamaharaj.com

# अनुक्रमणिका


| | | पृ. क्र. |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना ..... ..... ..... | |
| २) | बाबा कोण आहेत ? ..... ..... ..... | १ |
| ३) | बाबांचं बालपण ..... ..... ..... | ४ |
| ४) | तेलगीत बाबा ..... ..... ..... | ६ |
| ५) | कोरवारात बाबा ..... ..... ..... | १५ |
| ६) | बाबा सासनूरला ..... ..... ..... | २१ |
| ७) | बाबा नाशिक येथे ..... ..... ..... | २५ |
| ८) | विजापूर येथे बाबा ..... ..... ..... | २६ |
| ९) | सिंदगीस भेट ..... ..... ..... | ३४ |
| १०) | बाबा बेंगळूर येथे ..... ..... ..... | ३६ |
| ११) | इंडी मुक्कामात बाबा ..... ..... ..... | ४१ |
| १२) | बाबा रायचूर भागात ..... ..... ..... | ४३ |
| १३) | मुंबईत बाबा ..... ..... ..... | ४४ |
| १४) | बाबांची दक्षिणची यात्रा ..... ..... ..... | ७६ |
| १५) | मुंबईचा दत्त जयंती उत्सव ..... ..... ..... | ७८ |
| १६) | समारोप ..... ..... ..... | ८१ |
| १७) | आरती ..... ..... ..... | ८२ |


www.sadgurusadanandamaharaj.com



## श्रीगुरु महती

श्रीगुरु म्हणजे साक्षात परमेश्वरच; दया, क्षमा, शांती, करुणा व अहिंसा यांचे ते सागर, केवळ तारक परब्रह्म. भक्तरक्षणार्थ, लोकोपकारार्थ, जीवांच्या उद्धारासाठीच ते भूतलावर अवतरीत होत असतात. परोपकार हेच त्यांचे जीवन असते. भक्तांना सुखी, समाधानी व शांत जीवन देऊन ते त्यांची आत्मिक प्रगती करीत असतात. त्यांच्यामध्ये सद्गुणांची वाढ व्हावी म्हणून प्रयत्न करीत असतात. त्यांच्या बुद्धीवरील अहंकार, भ्रम, कल्पना व तर्क यांची आवरणे काढून टाकून त्याला ज्ञान व प्रेम यांच्या मार्गाने प्रगतिपथावर नेण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न चालू असतो; म्हणून ज्यादिवशी श्रीगुरुंचे दर्शन होईल तो दिवस भाग्याचा समजावा.

।। विश्व प्रकाशकं ब्रह्म । ब्रह्म प्रकाशको श्रीगुरुः ।।
।। गुरुदेवात्परो नास्ति । तस्मात्सद्गुरुवे नमः ।।

www.sadgurusadanandmaharaj.com

## श्रीगुरुचरण

श्रीगुरुंची कृपा ज्याच्यावर होते त्याला सर्व विश्व परब्रह्ममय दिसू लागते. जीवाला शिव बनविण्याचे सामर्थ्य श्रीगुरुंजवळ असते. श्रीगुरुचरणांपाशी सर्व देव देवता राहतात; म्हणून आजपर्यंत होऊन गेलेल्या अनंत संतानी श्रीगुरु चरणांचा महिमा गायिला आहे.

## नामस्मरण

नामस्मरणामुळे परमशांती मिळते. निरंतर नामस्मरणाने कुळाची परंपरा शुद्ध होते. नामस्मरण करण्यासाठी विशिष्ट काळवेळेचें बंधन नाही. नामाचें महात्म्य इतके अपूर्व आहे की, नाम उच्चारणारा व ते ऐकणारा दोघेही उद्धरून जातात. भक्ताचे सर्व दोष हरण करुन नाम त्याला दोषमुक्त करते, म्हणून जडजीवांना तारणारे नामस्मरणच आहे. एकाच नामस्मरणाची शेकडो हजारो आवर्तने झाल्यावर आपली स्पंदनं त्या देवतेचा आकार घेऊ लागतात. रामाची भक्ती करणारा राम होतो. कृष्णाची भक्ती करणारा कृष्ण होतो. तसेच सद्गुरु श्री सदानंद बाबांची भक्ती करणारा सद्गुरु रुप होतो.

## कर्म

मानव ही कर्मयोनी असल्याने मानव आपली जात (स्पंदन प्रकार) कर्माने बदलू शकतो. वाईटाचा चांगला व चांगल्याचा वाईटही होऊ शकतो. हा मानव व इतर योनीतील फरक आहे. उदा. वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो किंवा शिवभक्त रावणाचा अधःपती दानव बनू शकतो.

***(प. पू. गगनगिरी महाराजांच्या सिद्ध सनातन संस्कृति ग्रंथातून)***

memeej keâjlee keâjlee meeOee hejceeLe ~
Ielee ie®Ûe veece neF peeJeve keâleeLe ~~

**।। ॐ गुरोभ्योनमः ।।**

**ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्ती ।।**
**द्वंद्वातीतं गगन सदृषं तत् त्वमस्यादि लक्षं ।।**
**एकं नित्यं विमल मचलं सर्वधि साक्षिभूतं ।।**
**भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।।**
**गुरुःब्रह्मा गुरुः विष्णुः गुरुः देवो महेश्वरः ।।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः ।।**

# बाबा कोण आहेत ?

आपल्या बाबांचे जन्मस्थान व जन्म तारीख या संबंधी निश्चयपूर्वक काहीच सांगता येत नाही. या विषयी लोकांचा निरनिराळा अभिप्राय आहे. तसेच त्यांच्या आईवडिलांविषयी व त्यांना भाऊबहिणी आहेत काय, आणि असले तर ते कोठे आहेत ? या प्रश्नांना समर्पक उत्तरे सापडत नाहीत. विशेष म्हणजे या बाबत बाबा कधी चकार शब्दही उच्चारत नाहीत. केव्हा ''मला काहीच आठवत नाही,'' तर कधी ''देवीच माझी आई'' असे सांगतात.

बाबांचे या विषयीचे मौन हेतूपूर्वकही असू शकेल. त्यांच्या सान्निध्यात आलेल्या भक्तांनाही याविषयी विशेष जिज्ञासा नाही. कारण बाबा कोठले किंवा त्यांचे आई-वडील कोण, हे त्यांच्या दृष्टीने महत्वाचे नाही. ते एक अवतारी पुरुष असून भक्तांचे निश्चित कल्याण करणारे आहेत याबद्दल त्यांची पूर्ण खात्री झालेली आहे.

त्यांच्या सान्निध्यात अनेक वर्षे राहिलेल्या भक्तांनी सांगितलेल्या गोष्टींवरुन त्यांचे जन्मस्थळ वगैरे बाबत अंदाज मात्र करता येईल.

बल्लारी आणि रायचूर या जिल्ह्यांच्या सरहद्दीवर उप्पेरी हालभावी नावाचे गाव आहे. बाबा याच गावचे असावे असे म्हणतात. वडील मोठे जमीनदार होते. बाबांच्या जन्मानंतर थोडयाच दिवसांत त्यांच्या मातोश्री मरण पावल्या व त्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न केले. वडील सुध्दा सुमारे १८ वर्षांपूर्वी वारले. आईचे गाव इळकलगड आहे असे म्हणतात. बाबा घर सोडून केव्हा व कोणत्या कारणाने बाहेर पडले या संबंधीही वेगवेगळी बोलवा आहे.

असेही सांगतात की आई वारल्यानंतर बाबांची सावत्र आई त्यांना फार त्रास देऊ लागली. का कोण जाणे, या मुलाला पाहताच तिच्या अंगाची लाही लाही होत असे. काही करुन या तान्ह्या बाळाचा नाश करावा असा दुष्ट विचार करुन तिने आपल्या भावाला बोलावून घेतले. त्याच्याकडे त्या तान्ह्या बाळाला देऊन ''दूर जंगलात याचे तुकडे करुन टाकून ये'' असे सांगितले.

www.sadgurusadanandamaharaj.com

सावत्र मामाने बहिणीने सांगितल्याप्रमाणे, त्या बाळाला अरण्यात नेले पण बाळाला ठार मारण्याचा धीर होईना म्हणून किंवा त्यांची दया येऊन त्याला सिंधनूर आणि सिध्दापूर या गावाच्यामध्ये असलेल्या रायचूर जिल्ह्यातील सिध्द पर्वतावरील देवीच्या देवळात ठेवून दिले व तो परत निघून आला असे म्हणतात. ते देऊळ म्हणजे श्री बगळांबिका व श्री अंबादेवी यांचे मंदीर या देवींनीच या बाळाचे पालन पोषण करुन ते मोठे झाल्यावर ''तू सदा आनंदात राहा. तू त्रिकाल ज्ञानी होशील'' असा आशिर्वाद देऊन त्यांना दत्तदर्शनही दिले असेही सांगतात.

अशा प्रकारे लहानपणीच देवींच्या आशिर्वादाने दत्तदर्शन झालेले बाबा खरोखरच सिध्द पुरुष आहेत असे म्हणायला हरकत नाही. कारण कोणतेही शिक्षण न घेता तपश्चर्या किंवा यज्ञयाग न करता अद्‌भुत शक्ती असणे व सर्वज्ञानी असणे हे केवळ सिध्द पुरुषांनाच शक्य आहे.

या घटनेसंबंधी आणखी एक अनुमान म्हणजे बहिणीने सांगितल्याप्रमाणे सावत्र मामाने त्या बाळाला अरण्यात नेऊन त्याचे तीन तुकडे करुन तेथेच टाकून दिले. तिथे दत्तगुरु प्रकट झाले व त्या देहांचे तिन्ही तुकडे एकत्र जोडून परत जीवदान देऊन म्हणाले ''तुझ्या देहाचे तीन तुकडे हे ब्रह्मा विष्णू आणि महेशाचे प्रतीकच होते'' असा आशिर्वाद देऊन दत्तगुरु अंतर्धान पावले असे म्हणतात.

बाबा कपाळाला लावतात ते भस्म आणि नाम पाहिले तर हे खरेच असावे असे वाटते.

बाबांच्या बालपणाविषयी आणखी एक अनुमान म्हणजे सावत्र आईने बाबांचा खूपच छळ करण्यास सुरुवात केली. केवळ बोलणे किंवा मारणे यांनी समाधान न होता तिने राक्षसी वागणूक द्यावयास सुरुवात केली. बाबांच्या अंगावर अजूनही याचे डाग आहेत ''इथे चाकूचा मार बसला होता, ही बघ विळ्याची जखम'' असे म्हणत बाबा कधीकधी आपल्या अंगावरील जखमांच्या खुणा दाखवत.

सावत्र आईने केलेल्या अघोरी कृत्यांच्या या बोलक्या खुणा. ते पाहून त्या छोटया निष्पाप बालकावर झालेल्या अत्याचारांच्या नुसत्या कल्पनेनेही भक्तांचे डोळे पाणावतात.

अवतारी पुरुषालासुध्दा अशा प्रकारच्या यातना भोगाव्या लागाव्या या कल्पनेने आपला जीव कळवळतो. भक्त प्रल्हादाला सहन कराव्या लागलेल्या यातनांचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहाते. अशा प्रकारच्या छळांना कंटाळून, यातना चुकविण्यासाठी, वयाच्या पांचव्या वर्षीच तो मुलगा कोणालाही न सांगता एके दिवशी घर सोडून अरण्यात निघून गेला असेही सांगतात. अरण्यात दिवसभर मन मानेल तिथे भटकायचे, झाडाची पाने-फळें खायची व रात्री एखाद्या झाडावर किंवा दगडावर झोपायचे हा बाबांचा नित्याचा क्रम. सृष्टीदेवीच मुलाला वाढवू लागली.

असेच अरण्यात भटकत असताना त्यांना देवी रोग झाला. वय लहान. त्या रोगाने तो मुलगा खूपच खंगून गेला. त्याची शुश्रुषा दत्तगुरुनींच एका वृध्दाच्या रुपाने

www.sadgurusadanandmaharaj.com

येऊन केली. मुलगा बरा झाल्यावर तो वृध्द दत्तरुपात प्रकट झाला व त्याने मुलाच्या जिभेवर तीन बोटे ठेवून ''आजपासून तुझ्या तोंडून जे उच्चार निघतील ते सर्व खरे ठरतील'' असा आशिर्वाद देऊन अंतर्धान पावला. बाबांच्या जिभेवर दत्तात्रयांच्या बोटांच्या खुणा अजूनही आहेत असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द खरा ठरतो हा अनुभव आहे. एक गोष्ट निश्चित की बाबांची जीभ आपल्या सहसा नजरेस पडत नाही.

वरील घटनेबद्दल कोणतेही अनुमान ग्राह्य मानले तरी एक गोष्ट लक्षात येते की बाबा लहानपणीच पोरके झाले व घरातून बाहेर पडले.

बाबांचे जन्मस्थान व जन्म तारीख याबाबत जसे निश्चित काही सांगता येत नाही त्याचप्रमाणे त्यांच्या आयुष्यक्रमाबद्दलही काहीच निश्चितपणे सांगता येत नाही. त्यांचे सध्याचे वय साधारण ४० वर्षे असावे म्हणजेच त्यांचा जन्म १९३५ च्या सुमारास झाला असावा.

आतापर्यंतच्या त्यांच्या आयुष्याची चार टप्प्यांत विभागणी करता येईल.

१९३५ ते १९४२ चा कालखंड पहिल्या विभागात मोडतो असे म्हणायला हरकत नाही. या ७ वर्षांच्या काळाबद्दल वर लिहिल्याप्रमाणे वेगवेगळी अनुमाने आहेत. ही ७ वर्षे त्यांनी घरीच किंवा अरण्यात देवींच्या सान्निध्यात घालविली असावीत.

१९४२ ते १९५२ हा सुमारे १० वर्षांचा काळ दुसऱ्या विभागात येतो. ही दहा वर्षे त्यांनी कोठे नि कशी घालविली याबद्दलची निश्चित माहिती उपलब्ध नाही. तरी पण हा काळ बहुधा त्यांनी दक्षिण कर्नाटकात घालवला असावा असे वाटते.

१९५२ ते १९६९ म्हणजे साधारणपणे १८ वर्षांचा काळ तिसऱ्या टप्प्यात येतो. या काळात बाबा तेलगी, विजापूर, सिध्द पर्वत, उप्पिन अंगडी, इळकल, सुब्रमण्य, कोरवार, बदामी, सासनूर आदी गावी प्रामुख्याने राहात असावे असे दिसते. त्यांतल्या त्यात तेलगीसच जास्त दिवस राहिले. या काळातच महाराष्ट्रातील काही गावांतही त्यांचे वास्तव्य असावे असा तर्क आहे. आपण औरंगाबाद आदी ठिकाणी गेलो होतो असे बाबा सांगतात. तसेच आपण नित्यानंद स्वामींना भेटल्याचेही बाबा सांगतात. नित्यानंद स्वामींनी आपले उत्तर आयुष्य मुंबई जवळच्या वज्रेश्वरीत घालविले होते. म्हणजेच बाबा १९६९ च्या आधी वज्रेश्वरीस आले होते असा अंदाज काढता येतो.

१९७० च्या नंतरचा काळ चौथ्या विभागात मोडतो. १९७० ते १९७२ ही दोन वर्षे बाबा नासिकला होते. १९७२ च्या फेब्रुवारी महिन्यात ते मुंबईला आले. तेव्हापासून त्यांचे वास्तव्य बहुधा मुंबईसच असते. महिन्यातील काही दिवस मुंबई येथे, काही दिवस विजापूर येथे राहाणे हा त्यांचा सध्याचा परिपाठ आहे. येथूनच ते मधूनमधून इतरत्र जाऊन येऊन असतात.

www.sadgurusadanandamaharaj.com

# बाबांचं बालपण

बाबांनी आपले बालपण दक्षिण कर्नाटकात घालविले हे आधीच सांगितले आहे. जन्मत: अद्‌भुत शक्ती होतीच आणि दत्ताचा अवतार, असे असूनही बालपणाला शोभतील अशा खोडया किंवा मस्ती करुन त्यातूनही ते आपली सुप्त शक्ती प्रकट करीत असत.

दक्षिण कर्नाटकात एका गावी जत्रा भरली होती. बंदोबस्तासाठी स्वत: डी. वाय्. एस्. पी. साहेब आले होते. १२ वर्षाच्या वयास अनुरुप अशा खोडया बाबांच्या असायच्या. बाबांनी तेथे उभा असलेला रथ ओढला. डी. वाय्. एस्. पी. व इतर जमलेले लोक संतापले. डी. वाय्. एस्. पी. बाबांना म्हणाला, ''काय रे पोरा, रथाला हात लावायला लाज नाही वाटत ? ही काय तुझ्या बापाची गाडी वाटली काय ?'' असे म्हणत तो बाबांना मारण्यास गेला. त्याच्या शिव्या ऐकून तो मुलगा रागावला व त्याने हातातील चाबकाने त्यालाच मारावयास सुरुवात केली. मग बघायलाच नको. साहेबाच्या हुकुमाने पोलिसांनी त्या मुलाला पकडून लॉक अप्‌मध्ये ठेविले. त्या बिचाऱ्या साहेबांना बाबांचा महिमा काय माहीत ? पोलिसांना माहीत होते. पण त्यांचा नाईलाज होता. त्यांना आज्ञापालन करणे भाग होते.

लॉकअपमध्येही त्या मुलाचा खोडकरपणा चालूच होता. पहारा करणाऱ्या शिपायावर त्यांनी एके दिवशी लघुशंका केली. तरीपण त्या पोलिसाने काही केले नाही. एवढेच नव्हे तर त्या मुलाची आणखी सेवा करु लागला. लॉकअप् मधील ११ दिवसांत त्याला पकडणाऱ्या साहेबाला फारच त्रास झाला. त्याला उलटया होऊ लागल्या व त्यातच तो मृत्यू पावला.

गुरगुंटी या गांवी सुध्दा अमरेश्वराची जत्रा भरत असे. बाबा लहानपणी या गावाजवळच्या डोंगरातील अरण्यात रहात होते. एका वर्षी काही लोक जत्रेसाठी म्हणून बैलगाडयांतून जात होते. वाटेत गाडया थांबवून विश्रांतीसाठी एका मोठया झाडाखाली बसले व चहा करण्यासाठी दगड मांडून त्यांनी चूल पेटविली. पण त्यांना चहासाठी दुध काही मिळेना. काय करावे, असा विचार करीत असतानाच नजीकच्या डोंगरातून वेडयासारखा दिसणारा उघडा-नागडा मुलगा धावत येऊन त्या लोकांना उद्देशून म्हणाला, ''जवळच एक विहीर आहे त्यातल्या पाण्याने चहा करा. दुधाची गरज भासणार नाही.''

ते ऐकून लोक हसले. सहज गम्मत बघावी म्हणून त्यांनी मुलानें सांगितलेल्या विहिरीतून पाणी आणून चहा केला. तेव्हा दुधातच चहा केल्याप्रमाणे त्या चहाला रंग आला व चवही आली. लोकांना अतिशय आश्चर्य वाटले. आपण ज्याला वेडा समजत होतो तो कोणी सामान्य नसून एक अद्‌भुत शक्ती असलेला अवतारी पुरुषच

www.sadgurusadanandmaharaj.com

आहे याची खात्री झाली. त्या मुलाला त्यांनी आपल्या बरोबर जत्रेस नेले.

त्या दिवसापासूनच त्या मुलाला 'हालुभावी' स्वामी म्हणतात असं बोलले जाते. (कारण कानडीत हालु-म्हणजे दूध व भावी म्हणजे विहीर असा अर्थ होतो.)

आणखी एका वर्षी, देवाच्या कोपामुळे असेल कदाचित, जत्रेतला रथ अनेक लोकांनी मिळून ओढण्याचा प्रयत्न केला तरी तो ओढला जाईना. लहान वयाचे बाबा तिथेच होते. त्याला वेडा समजून आणि हा लोकांना दगड मारतो म्हणून पोलिसांनी त्यांना पकडून ठेवले होते. दत्ताचे अवतार असलेल्या मुलाला पकडून ठेवल्यामुळेच तो रथ जागचा हलत नसावा. बाबांनी कसे तरी पोलिसांच्या पाहाऱ्यातून निसटून पळत जाऊन त्या रथाला हात लावला मात्र, तो रथ चालू झाला.

अमरेश्वरांनीच स्वत: येऊन रथ चालू केला असा सर्वांचा समज झाला. अमरेश्वर स्वत: न येता त्या मुलाच्या रुपाने येऊन रथ चालू केला. हे त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक ?



www.sadgurusadanandamaharaj.com

# तेलगीत बाबा

बाबा तेलगीत १९५० ते १९६२ म्हणजे साधारणपणे १२ वर्षे राहिले. तेलगीच्या वास्तव्यात ते निरनिराळ्या गावी जाऊन येत असत. पण १२ वर्षातला अधिक काळ त्यांनी तेलगीतच घालविला.

बाबा तेलगी गावात कसे आले या बाबतीत भिन्न अभिप्राय आहेत. एका अभिप्रायाप्रमाणे बाबा लहान असतांना नेहमी भटकतच असायचे मनाला येईल त्या गावी हवे तेवढे दिवस राहून निघून जायचा त्यांचा परिपाठ होता. असेच एके दिवशी भटकत भटकत तेलगीला आले व तेथेच १२ वर्षे मुक्काम केला.

बाबांच्या बालपणीचा प्रसंग. त्यावेळी बाबा १२/१३ वर्षांचे होते. तेलगीमध्ये धोटयाळ गांवी एका साधूने बाबांना गंगाम्माच्या स्वाधीन केले व म्हणाले, 'याचा सांभाळ कर, तुझे कल्याण होईल' आणि तो साधू गुप्त झाला. बाबा बालरुपात तेथे दोन वर्षे राहिले. त्या काळात त्यांनी द्वाडपणा फार केला, लोकांच्या तक्रारी येऊ लागल्या, गंगाम्माचा पती तिला रागावून म्हणे, कुणाचा पोरगा आहे हा, तुला कुणी दिला, ना याचे आईबाप, सगेसोयरे, कशाला याला जवळ केलास किती छळतो तुला, लोकांचे शाप आपल्यामागे का लावून घेतेस ? गांव वेशीवर सोडून दे त्याला, जाईल कुठेतरी, राहील कुठे तरी, इतके ऐकुन सुध्दा ती माऊली बाळगुरुवर जीवापाड मातेप्रमाणे प्रेम करी, म्हणे कुणाचा का असेना. आपल्याला मुलबाळ नाही. देवानेच याला आपल्या पदरी दिलं आहे असे समजून त्या मुलाची ती जीवापाड सेवा करी, परंतु त्या बालकाला एका शब्दानेही तीने दुखावले नाही, त्याला कांही हवं ते ती पुरवीत असे, पतीचे बोलणे ऐकुन घ्यावे लागे.

एके दिवशी बाळ गुरुने घर सोडायचे ठरवले. गंगाम्माला फार दु:ख झाले ! ती एकसारखी रडू लागली. त्या बालक गुरुमध्ये अशी कोणती आकर्षण शक्ती होती की ज्यामुळे तीला त्याचा लळा लागला. म्हणाली मला सोडून जावू नकोस तुझा विरह मला सहन होणार नाही, असा मी काय गुन्हा केला की तू मला सोडून जात आहेस. बालक म्हणाले आई मला गेलेच पाहिजे, हे मी ठरवीत नाही. माझे कर्तव्य मला स्थिर राहू देत नाही, मला जायलाच हवं. पुन्हा केव्हा तरी मी तुला भेटेन. गंगाम्मा म्हणाली, जोतोस तर तुझी आठवण राहिल अशी मला एखादी भेट म्हणून काहीतरी दे की ज्यामुळे मी कधी तुला विसरणार नाही. बालक गुरुने आपल्या पायातील कपडयाचे बुट (त्या काळात लहान मुलांना वापरता येत असत) गंगाम्माला दिले व म्हणाले हे घे, माझ्यामुळे तुला फार त्रास झाला, तुझे कल्याण होईल असे सांगून ते बालक निघून गेले. इकडे गंगाम्माने त्या कपडयाच्या बुटांचा पादुका सारखा उपयोग केला. ती रोज त्या पादुकांची पुजा करीत असे. त्या पादुकात पाणी ओतून, ते पाणी अमृत समजून तिर्थ म्हणून रोज पीत असे.

www.sadgurusadanandamaharaj.com

एके दिवशी त्या धोटयाळ गांवी एका बाळंतीणबाईला अडचण निर्माण झाली, ती बाळंत होईना, मुल आडवे असल्याने तिला त्रास होवू लागला, ही गोष्ट गंगाम्माला समजली. सहज म्हणून शुध्द भावनेने तिने त्या पादुकातील तिर्थ त्या बाईला पिण्यास दिले, तो काय चमत्कार! ती बाई सुखरुप बाळंत झाली. ही बातमी गावांत पसरली. गांवकरी गंगाम्माचे कौतुक करु लागले. परंतु गंगाम्मा मात्र मनातून त्या बालक बाबांचे आभार मानून, ''सर्वही तिर्थे घडती देवा सद्‌गुरु चरणाशी'' या उक्तीप्रमाणे ती त्यानंतर रोगी, बाळंतीण, वगैरे रोग्यांना अनेक व्याधीतून रोगमुक्त होण्यासाठी गंगाम्मा माई बाबांच्या चरणतिर्थाचा उपयोग करु लागली. लोकांना गुण येवू लागले, अशा तऱ्हेने कांही वर्षे गेली. ती गांवामध्ये तीर्थवैद्य म्हणून नांवारुपास आली.

एके दिवशी वृध्दवेषात गंगाम्माच्या घरी काही महिन्यांनी गेले. बाहेर द्वारावर उभे राहून ''माई भीक्षा वाढा'' म्हणू लागले, गंगाम्मा बाहेर येवून भीक्षा देवू लागली परंतू तिने बालक बाबांना ओळखले नाही. बाबा हसले व म्हणाले मला ओळखले नाहीस, मी तुझा सदू, ती एकसारखी टक लावून पाहू लागली. केस, दाढी वाढलेली व अवतार विचित्र असा पाहून ती भारावली व रडू लागली. मिठी मारुन म्हणाली माझा सदू बाळ आला. माझा सदू आला, आता तुला मी जावू देणार नाही. बाळगुरुंनासुध्दा गहिवरुन आलं. मिठी मारुन ती - कुठही आता जावू नकोस म्हणाली,

सर्व मायेचे सोडुनी नाते
भटकतोस कुठवरी ।
जीव माझा तीळतीळ तुटतो
खा थोडी भाकरी ।।
बाळा माया सलते उरी ।
तू जाऊ नको रे दूरी ।।

इतक्या प्रेमाने त्याला जवळ घेवून बोलली मी तुला जाऊ देणार नाही. परंतू अवतारी पुरुषाला आपले अवतार कार्य चालू ठेवण्यासाठी सतत फिरावे लागते. दत्तावतारी नरसिंह सरस्वतींना सुध्दा अंबामाता (त्यांची आई) यांची आज्ञा व वचनाप्रमाणे जागून आपल्या अवतार कार्याचा प्रचार करण्यास जनउध्दारासाठी भस्म-रुद्रमाळा घालून गुरु आज्ञेने काशी तीर्थी निघाले तद्वत गंगाम्माची आज्ञा घेवून बाळगुरु पुन्हा यात्रेला निघाले, प्रचार करण्यासाठी. इकडे गंगाम्मा बाबांच्या चरणतिर्थाने गावातल्या आजूबाजूच्या परीसरात रोगनिर्मूलनेचे कार्य करीत वयाच्या १०६ वर्षापर्यंत बाबांच्या कृपाशिर्वादाने जगली व सन १९९४ मध्ये निधन पावली.

दुसऱ्या एका अभिप्राया प्रमाणे बाबा लहानपणी फारच खोडया करीत. कोणत्याही दुकानात शिरुन मनाला येईल ते खायचे व नको असलेले फेकून द्यायचे

www.sadgurusadanandmaharaj.com

व वेडावीत लोकांना दगड मारण्यास धावल्यासारखे करायचे. असेच एका गावी त्यांचा हा खोडकरपणा चालू होता. तेथल्या काही लोकांना या मुलाबद्दल अनुकंपा वाटली तर काही लोकांनी त्याला गावाबाहेर हाकलून देण्याचे ठरवले. त्या मुलाला गोळी घालून मारण्यासाठी काही लोक बंदूक घेऊन मुलाच्या मागे लागले. जीव वाचविण्यासाठी मुलगा पळू लागला. लोक मागे लागलेलेच होते. धावत जाऊन मुलगा एका डोंगराच्या टोकापर्यंत गेला. त्याला मारण्यासाठी बंदूक घेतलेला माणूस नेम धरु लागला. त्याच क्षणी देवाच्या कृपेने एक घोडा डोंगराच्या टोकावर प्रकट झाला. मुलगा घोडयावर उडी मारुन बसला. तो घोडा गोळी चुकवून भरधाव निघाला व तेलगीतल्या द्यामव्वा देवीच्या मंदिराच्या ३ फूट उंचीच्या दरवाजातून आंत शिरला व वळून परत बाहेर आला. हा चमत्कार पाहिलेल्या लोकांनी तोंडात बोटे घातली. हा काही सामान्य माणूस नव्हे हे जाणून त्याला तेथेच ठेवून घेऊन त्याची सेवा करु लागले. अशा रीतीने १५-१६ वर्षांचे असतानाच बाबा तेलगीत प्रथम आले असे सांगतात.

द्यामव्वा देवी वाघावर बसलेली आहे. बाबा कधी कधी त्या देवळांत जाऊन तास दोन तास घालवायचे. गाभाऱ्यात ते असताना बाहेरच्या लोकांना वाघाची डरकाळी ऐकू यायची. बाबा बहुधा आत वाघाशी खेळत असावेत.

तेलगीत आल्यावर पहिल्यांदा बाबा बसाप्पा इराप्पा बसमिनाळ यांच्या घरी राहिले. त्यांच्या घरी एकदा देवपूजा चालली होती. देवापुढे तेलाचा काकडा जळत होता. बाबांनी तो आपल्या तोंडात घालून गिळून टाकला. ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. एवढया लहान वयातच ही अद्‌भुतशक्ति असलेला माणूस काही सामान्य नव्हे अशी सर्वांची खात्री झाली.

बाबांच्या तेलगीच्या वास्तव्यात रोज पूजा व भजनाचा कार्यक्रम चाले ते तिथे असेपर्यंत प्रत्येक अमावस्या आणि पौर्णिमेला जत्रा भरायची. आजूबाजूच्या खेडयांतील हजारों माणसे येऊन बाबांचा आशिर्वाद घेत होती. पूजेला येणारे भक्त बरोबर नारळ घेऊन यायचे. एवढे नारळ जमायचे की त्यांचा डोंगरच व्हायचा व नारळाच्या पाण्याचे पाट वाहायचे हे आपण स्वत: बघितलेले आहे असे तेथील लोक सांगतात. बाबांच्या ठायी लोकांची श्रध्दा वाढत होती. त्याचप्रमाणे बाबा देखील भक्तांना आशिर्वाद देऊन त्यांचे जीवन सुखी करीत होते. वरचेवर चमत्कार करुनही भक्तांना आकर्षित करीत होते.

एके दिवशी बाबांचे एक भक्त शिवलिंगप्पा चिंम्मलगी यांच्या घरी बाबा जेवायला गेले होते. त्यांच्या घरी आलेल्या एका स्त्रीने बाबांची कुत्सितपणे टीका केली. बाबांनी घरात शिरल्याबरोबर सर्परुप धारण केले. ते पाहाताच ती बाई घाबरली. धावत रस्त्यावर येऊन सर्वांना तिने ती हकीकत सांगितली. सगळेजण आत

www.sadgurusadanandamaharaj.com

जाऊन तो सर्प पाहून हात जोडून बाबांच्या लीलेची प्रशंसा करु लागले. बाबांची निंदा करणारी ती बाई मात्र पुढे काही दिवसांतच मृत्यू पावली.

बाबांनी स्टोव्हमध्ये, कंदिलात किंवा गॅस बत्तीत तेला ऐवजी पाणी घालून पेटविल्याची अनेक उदाहरणे आहेत. तसेच गाडीतले पेट्रोल संपले असता पाणी घालून गाडी चालविल्याचीही उदाहरणे आहेत.

बाबा एकदा कारमधून मल्लाप्पा राचप्पा गोणी, बसप्पा हणमंतप्पा बिडलदिन्नी व इतर सात लोकांबरोबर कोरवारला गेले होते. परत येताना वाटेत कारमधील पेट्रोल संपले. गाडीमधेच थांबली. जवळ पास पेट्रोल मिळण्याची आशा नव्हती. लोकांना काय करावे ते समजेना. तेव्हा बाबा ड्रायव्हरला म्हणाले, ''तू पेट्रोलची काळजी करु नकोस. तू गाडी चालू कर ती आपोआप चालू होईल.'' बाबांच्या आज्ञेप्रमाणे काही एक विचार न करता ड्रायव्हरने गाडी चालू केली आणि आश्चर्य म्हणजे, कोणत्याही प्रकारचा त्रास न होता, पेट्रोल नसलेली ती गाडी तेलगीला येऊन पोहोचली.

गावातल्या हनुमान मंदिराच्या समोर एक मोठे वडाचे झाड आहे. एकदा बाबा त्या झाडावर उंच टोकावर जाऊन आरामात हातपाय पसरुन झोपले. ते पाहून लोक घाबरले व ''बाबा खाली उतरा. पडाल.'' म्हणून परोपरीने विनवणी केली. त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन बाबा रात्रभर झाडावरच झोपून पहाटे खाली उतरले. बाबा खाली येईपर्यंत काही भक्त खालीच बसून बाबा सुरक्षितपणे खाली यावेत म्हणून प्रार्थना करीत होते. बाबा खाली आल्यावर त्यांचा जीव भांडयात पडला.

बाबांनी भक्तांचे दु:खनिवारण केल्याची अनेक उदाहरणे आहेत. गावातल्या आश्रमाच्या समोर कडुलिंबाचे झाड आहे. त्या झाडाखाली १२ वर्षाचा जन्मत:च आंधळा असलेला एक मुलगा बसत असे. त्या मुलाचे वडील बाबांचे परम भक्त. आपला मुलगा आंधळा, त्याचे पुढे कसे होईल, ही चिंता त्यांना लागलेली होती. एके दिवशी बाबांना त्यांनी आपली व्यथा सांगितली व म्हणाले ''बाबा, माझा मुलगा जन्मांधळा आहे. मला ती एकच काळजी आहे. आपण मजवर अनुग्रह केलात तर मुलाच्या जन्माचे कल्याण होईल व माझ्यावर जन्माचे उपकार होतील. काहीही करुन माझ्या मुलाला दृष्टी द्या.'' असे म्हणून त्यांनी बाबांचे पाय धरले. बाबांचे हृदय विरघळले. त्यांच्या भक्तीवरही बाबा संतुष्ट होते. बाबा ज्या रात्री झाडावरच राहिले, तेव्हां तो भक्त त्या झाडाखाली रात्रभर बसून बाबा सुखरुप खाली यावेत म्हणून प्रार्थना करीत होता. बाबा म्हणाले ''तू काळजी करु नकोस, देव तुझ्या मुलाला डोळे देईल.'' बाबांच्या शब्दाप्रमाणे त्या मुलाला दृष्टी आली. त्याला दिसू लागले. मुलाच्या जन्माचा उध्दार झाला. आईवडिलांना झालेल्या आनंदाचे वर्णन करणे अशक्य आहे.

बाबा संतुष्ट झाले म्हणजे भक्तांना कोणत्याही संकटांतून वाचवितात. भक्तांनी मात्र भक्तीने व निष्ठेने सेवा करावयास पाहिजे.

www.sadgurusadanandamaharaj.com

बाबांनी भक्ताला त्याच्या जीवावर आलेल्या गंडांतराची पूर्व सूचना देऊन त्याला त्यापासून वाचविल्याची अनेक उदाहरणे आहेत. तेलगी स्टेशनच्या जवळ शरणम्मा नावाची बाबांची भक्त आहे. शरणम्मा सुईणीचे काम करते. तिचे यजमानही बाबांचे भक्त आहे. बाबा अधूनमधून त्यांच्या घरी जात असत. एकदा असेच तिच्या घरी गेले असताना कोणाच्याकडे तरी शरणम्मा सुईणीच्या कामासाठी निघाली होती. बाबांनी तिला सांगितले, ''तू आज कुठेही कामावर जाऊ नकोस. जर तू गेलीस तर थोडयाच दिवसांत तुझ्या जीवाला धोका आहे.'' तेव्हा ती म्हणाली ''मी सुईणीचं काम करते. संकटात असलेल्या बाईला वाचवणे हे माझे कर्तव्य आहे. मला गेलेच पाहिजे.'' व ती निघून गेली.

पुढे चार सहा दिवसांनी शरणम्मा कपडे धुण्यासाठी जवळच्याच विहिरीवर गेली होती. कपडे धूत असताना तिला कोणी तरी ढकलल्याप्रमाणे झाले व ती विहिरीत पडली. या संकटसमयी बाबांचे शब्द तिला आठवले. यांतून बाबाच आपल्याला वाचवतील म्हणून ती बाबांचे नामस्मरण करु लागली. काही क्षणातच कोणीतरी तिला उचलून वर आणून ठेवले. ती उठून व कपडे धुवून परत घरी आली. दुसऱ्या दिवशी बाबा तिच्या घरी आले व ''शरणम्मा तुला थोडयाच दिवसांत एक मोठा आजार येणार आहे. जपून रहा,'' असे म्हणाले. शरणम्मा म्हणाली, ''बाबा, तारणारे वा मारणारे तुम्हीच. मी तुम्हाला शरण आले आहे. जशी तुमची इच्छा असेल तसे करा.''

बाबांनी सांगितल्याप्रमाणे काही दिवसांतच शरणम्मा आजारी पडली. सर्वांना काळजी वाटू लागली. एके दिवशी तिची स्मृती गेली. ती आता वाचणार नाही, म्हणून सगळेजण चिंतेत पडले. शरणम्माला याचवेळी स्वप्न पडले. स्वप्नात कोणीतरी तिला पाळण्यात बसवून, वर आकाशात नेऊन परत खाली जमीनीवर आदळल्याचा भास झाला. तिने किंचाळून डोळे उघडले, तो जवळच बाबा उभे असून, ''शरणम्मा आता कसे वाटते ?'' म्हणून विचारीत होते. ''बाबा, आपल्याच कृपेने आज माझा पुनर्जन्म झाला,'' असे शरणम्मा म्हणाली. माणसाला प्रारब्धात असलेले सारे दु:ख भोगावे लागते. ते गुरुलाच नव्हे, तर प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही चुकविता येत नाही. पण हे दु:ख सुकर करुन भक्ताला संकटातून वाचविण्याचे काम मात्र सद्गुरु करु शकतात. हेच आपले जीवितकार्य आहे, असे बाबा समजतात. अहोरात्र आपल्या भक्तांचीच त्यांना चिंता लागलेली असते.

**मुकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानंद माधवम् ।।** असा एक श्लोक आहे. त्याचा अर्थ एवढाच की देव प्रसन्न झाला तर मुकाही बोलू शकतो किंवा पांगळा चालू शकतो. पण देव प्रत्यक्ष न येता गुरुमार्फत या गोष्टी करवितो.

तेलगी गावात एक मुका बाबांचा परम भक्त होता. बाबा एकदा त्याच्याशी बोलू लागले. त्याबरोबर त्यालाही वाचा फुटून एकदम तो बोलू लागला. सर्वांना आनंदा बरोबरच आश्चर्यही वाटले.

www.sadgurusadanandmaharaj.com

बाबांच्या येथील वास्तव्यात दूर दूरचे लोक बाबांच्या दर्शनाला येत. तसेच आपल्या व्याधींबद्दल बाबांना सांगत. बाबा जवळच वाहात असलेल्या पाटाचे पाणी देत. ते पिऊन रोगी बरे होत. विशषत: अस्थमा झालेल्या रोग्यांना चार सहा फर्लांगावर असलेल्या स्टेशनापर्यंत ते पळायला लावीत. रोगीसुध्दा काही विचार न करता पळत जात व येताना रोगमुक्त होऊन परत येत असत.

बाबांनी आपल्या तेलगीच्या वास्तव्यात अनेक चमत्कार करुन दाखविले. भक्तांच्या मनात भक्तीभाव निर्माण करुन तो वाढविण्याचाच या मागे उद्देश असायचा. बाबा आपल्या अद्भुत शक्तीचा उपयोग स्वत:साठी कधीच करुन घेत नसत.

गावात प्रतिवर्षी जत्रा भरवून गावभोजन घालण्याची त्यांनी प्रथा पाडली. एका वर्षी जेवणाच्या वेळी शिरा शिजविण्यासाठी एक मोठी कढई हवी होती. ती कुठेही मिळेना. विकत आणावयास तेवढे पैसेही जमले नव्हते. काय करावं ते लोकांना सुचेना. भक्तांची ही धडपड बघून बाबांनी किडप्पा चिंम्मलगी नावाच्या भक्ताला बोलावून ''तू सारवाडस्वामीच्या मठाला जा मठाच्या बाजूलाच एक बाभळीचं झाड आहे. त्यावर तुम्हाला आवश्यक तेवढे पैसे मिळतील. ते घेऊन या,'' म्हणाले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे किडप्पा चिंम्मलगीना त्या मठाजवळच्या झाडावर ६० रुपये मिळाले. ते घेऊन दोन पोती रव्याचा शिरा करता येईल एवढी मोठी कढई किडप्पा चिंम्मलगी आणि गुरुलिंगप्पा गुडदिन्नी या दोघांनी विजापूरला जाऊन बाजारातून विकत आणली. ही कढई अजूनही तेलगीत पाहावयास मिळते. तिचे छायाचित्र या पुस्तकात दिले आहे.

एकदा बाबांनी शांतय्या हिरेमठ या भक्ताला बोलावून ''तू मळयात जा, तेथे केळीच्या झाडावर ५ रुपये आहेत ते घेऊन ये.'' असे सांगितले. शांतय्याला आश्चर्य वाटले. केळीच्या झाडावर पैसे कसे असतील याचा तो विचार करु लागला. तरीपण बाबांची आज्ञा म्हणून तो मळयात गेला. त्याला बाबांनी सांगितलेल्या केळीच्या झाडावर ५ रुपये दिसले. आपल्या डोळयावर त्याचा विश्वासच बसेना. ते पाच रुपये त्याने बाबांच्याकडे आणून दिले.

बाबा कधी कधी भक्तांची चेष्टा करुन विनोद निर्माण करतात. सुरुवातीला ते एक सारखे सिगरेट ओढायचे. एके दिवशी त्यांच्याजवळ सिगरेट शिल्लक नव्हती. बाजारातही मिळाली नाही. बिडीसुध्दा मिळेना. तेव्हा बाबांनी जवळच बसलेल्या बसाप्पा मस्कताळ या गरीब भक्ताकडून १० रुपयांची नोट मागून घेऊन त्याची गुंडाळी केली, त्यात तंबाखू भरला व काडी ओढून ती पेटविली हसत हसत ती सिगरेटप्रमाणे ओढू लागले. नोट जळून खाक झाली. आपल्याजवळ दहाच रुपये होते तेही जळून गेल्याचे पाहून त्याचा चेहरा साफ पडला. त्याच्याकडे पाहात हसतच बाबा म्हणाले, ''तुझी दहा रुपयांची नोट जळाली म्हणून वाईट वाटते ना ? ही घे

www.sadgurusadanandamaharaj.com

तुझी नोट'' असं म्हणत तिथे पडलेली राख घेऊन बसप्पाच्या हातात दिली. त्याच्या हातात राखे ऐवजी त्याचीच नोट आली. तेथे बसलेल्या बसाप्पा व इतर भक्तांना ते पाहून अतिशय आश्चर्य वाटले.

एके दिवशी बाबांनी चंद्रशेखर हंडीगी आणि मल्लाप्पा अंगडगेरी या दोघा भक्तांना गावातल्या मारुती मंदिरात जाऊन प्रसाद आणायला सांगितले ''देवळाला कुलूप आहे. आपल्याजवळ किल्ल्या नाहीत मग प्रसाद कसा आणावयाचा ?'' असे त्यांनी बाबांना विचारले. बाबा म्हणाले, ''तुम्ही देवळात जा. दार ढकला. ते आपोआप उघडेल.'' त्याप्रमाणे त्यांनी जाऊन देवळाचे दार ढकलल्याबरोबर कुलूप असलेले ते दार आपोआप उघडले गेले. देवासमोरचा प्रसाद आणून त्यांनी बाबांना दिला.

प्रतिवर्षी श्रावण मासात संगमेश्वराची जत्रा भरत होती. जत्रेत येणाऱ्या लोकांना जेवण घालण्याची पध्दत. एका वर्षी एका मोठया कढईत शिरा शिजत ठेवला होता. गूळ घातलेला तो शिरा उकळत होता स्वयंपाकी लोक मोठया झाऱ्यांनी शिरा ढवळीत होते. बाबा स्वयंपाक घरांत गेले आणि त्या उकळत्या शिऱ्यात हात घालून झारा फिरवावा तसा हात फिरविला. बाबांचा हात भाजणार म्हणून स्वयंपाकी लोक घाबरले. बाबांनी हात बाहेर काढला पण काहीच झालेले नव्हते.

एकदा बाबांना संध्याकाळी एक नाग साप चावला. बाबांनीही त्याला पकडून मुळा तोडल्याप्रमाणे त्याचे तुकडे करुन फेकून दिले. चावलेल्या सापाला मारले तर विष उतरत नाही अशी एक समजूत आहे. म्हणून सर्व लोक घाबरले. त्या दिवशी रात्री न झोपण्याविषयी लोकांनी आग्रह केला. बाबांनी कोणाचेही एकले नाही. सगळे लोक काळजीत बाबांच्या जवळच रात्रभर बसून राहिले. बाबा सकाळी नेहमीप्रमाणेच उठले. सापाचे विष पचविण्याची शक्ती त्यांच्या अंगात असली पाहिजे.

भीमप्पा दोड्डमनी हा बाबांचा भक्त. एकदा तो बाबांच्या जवळच बसून होता. त्याला चिलमीचे व्यसन होते. त्याने चिलमीत तंबाखू भरला. त्यांवर कापसाचा बोळा ठेवला. पण तो पेटविण्यासाठी काडयाची पेटी किंवा चकमक मिळाली नाही. चिलीम ओढण्याची इच्छा मात्र अनिवार उत्पन्न झाली. पण नाइलाजाने चिलीम हातात धरुन गप्प बसून राहिला. ते पाहून बाबांनी त्याला गप्प का बसलास ?'' असे विचारले. ''माझ्याजवळ काडीपेटी नाही वा चकमकीचा दगड नाही.'' असे त्यांनी सांगितले. बाबांनी हसतच त्याच्या जवळ असलेला कापूस हातात घेऊन त्यावर फुंकर मारली. तत्क्षणी कापसाने पेट घेतला. भीमप्पाने चिलीम पेटवून आपली तलफ भागवली.

बाबा एकदा बसलिंगप्पा नूरंदप्पा नावच्या भक्ताला घेऊन इंडी तालुक्यातील तडवलगा गावी गेले. गावाच्या बाहेरील मळयात जाऊन तेथील मालक शंकराप्पा याला बोलावून एक तांब्याभर पाणी विहिरीतून आणावयास सांगितलें. त्याने पाणी आणल्यावर बाबांनी त्यांतील पाणी त्याच्याच हातावर ओतले तोच पाण्याऐवजी

www.sadgurusadanandamaharaj.com

त्यातून तूप पडले. शंकराप्पाला आश्चर्य वाटले. नंतर त्याला घेऊन बाबा जवळच्याच लिंबाच्या झाडाजवळ गेले. तेथे त्यांनी वाघाचे रुप धारण केले. ते पाहून घाबरुन शंकराप्पा पळू लागला. त्याला ''घाबरु नको'' म्हणून सांगून बाबांनी पुन्हा आपले रुप धारण केले. शंकराप्पाला केवळ चमत्कारच करुन दाखविले असे नव्हे. त्याला संतती नव्हती. बाबांच्या आशिर्वादाने पुढे त्याला संतती प्राप्त झाली.

साधू संत आपल्या अद्‌भुत शक्तींनी व अमृततुल्य वाणीने भक्तांचे कल्याण करतात. भक्तही त्यांची सेवा करुन मुक्ती पावतात. असल्या गुरुंना ते देवासमान मानतात. परमात्माच गुरुच्या रुपाने भूलोकात आले आहेत असे ते समजतात. अशा गुरुंना व साधू संतांना छळणारे लोकही आहेत हे जरी अशक्य वाटले तरी एक कटू सत्य आहे. ही छळणूक कोणाही अवतारी व सत्पुरुषाला चुकली नाही. रामाला वनवास मिळला. श्रीकृष्णाचा अनुग्रह असूनही पांडवांना वनवास मिळाला. सत्य साईबाबा, वा सिध्दारुढ स्वामी यांच्यावरही विषप्रयोग झाल्याचें माहीत आहे. बाबाही याला अपवाद नाहीत. त्यांच्या शक्तीवर व वाणीवर मोहित होऊन त्यांना परमेश्वर मानणारे अनेक लोक होते, तरी काही महाभाग त्यांना छळून आसुरी आनंद मिळवीत. त्यांनी बाबांना दिलेल्या कष्टांच्या गोष्टी ऐकल्या तर अंगावर शहारे येतात.

साधूसंतांची सेवा करण्याची इच्छा नसणे हे आपण समजू शकतो. पण विनाकारण त्यांना छळणाऱ्या लोकांच्या बुध्दीला काय बरे म्हणावे ?

डॉ. शांत रेड्डी तेलगी गांवात बाबांचा निंदक होता. बाबांनी अनेकांचे रोग बरे केले, परंतु या डॉ. शांत रेड्डीला खपत नसे. सर्व रोगी भक्त बाबांच्या आशिर्वादाने बरे होऊ लागले तर आपल्याकडे कुणी येणार नाही, म्हणुन त्याने बाबांच्या विरुध्द अनेक लोक उभे केले होते.

एके दिवशी तेलगी गांवी यात्रा भरली होती. बाबांनी पांढरा शुभ्र काठेवाडी घोडा बरीच वर्षे पाळला होता. तो घोडा यात्रेमध्ये एका बाजूला बांधून ठेवला. सोबत भक्तगण होते. बाबां काही अंतरावर भक्तगणांसह जत्रेमध्ये बसले होते. इतक्यात दुष्ट डॉ. शांत रेड्डीने बाबांच्या काठेवाडी घोडयाशेजारी घोडी आणून सोडली.

इकडे प. पू. बाबांच्या भक्तांनी चहाची इच्छा दर्शविली. बाबांनी चहाची आज्ञा दिली परंतु स्टोव्हमध्ये घासलेट नव्हते, ही तक्रार बाबांच्या कानी गेली. प. पू. बाबांनी पाणी घालून स्टोव्ह पेटविला. चहा तयार झाला, परंतु दूध नव्हते, बाबा अंतर्ज्ञानाने समजले दुध नाही. म्हणाले ती पहा दगडीगाय दिसते तिच्या काशेखाली भांडे ठेवा. तुम्हाला भरपूर दुध मिळेल. त्याप्रमाणे भक्तांनी केले, पातेले भरुन दुध मिळाले. भक्त चहा पिवून तृप्त झाले. मनांतून बाबांच्या या चमत्कारांचे कौतूक करु लागले. समजले की बाबा कुणी अशी तशी व्यक्ती नसुन एक महान अवतारी शक्ती आहे.

www.sadgurusadanandmaharaj.com

इकडे डॉ. शांत रेड्डीने जी घोडी आणून सोडली होती, तिच्यामागे चौफेर उधळत प. पू. बाबांचा काठेवाडी घोडा खुंटीसह मागे लागला. त्यामुळे जत्रेच्या गर्दीमध्ये काही यात्रेकरुंना मारही बसला. घोडा घोडीच्या मागुन धावताना चुकून खुंटीचा मार एका ७/८ वर्षाच्या मुलीच्या कपाळी मर्मस्थानी बसुन ती मृतप्राय झाली. त्याच अवस्थेत तिची आई आपल्या मुलीला घेऊन इतर यात्रेकरुंसोबत ती चौकशी करीत करीत, कुणी मारलं तुझ्या मुलीला ? घोडा कुणाचा ? मार कसा लागला ? वगैरे इत्यंभूत माहीतीच्या आधारें, सर्वजण प. पू. बाबांपाशी आले व म्हणाले या साधूचा घोडा. यांच्या घोडयाने मारले, असे म्हणतांच, ते कलेवर घेतलेल्या मुलीच्या आईने प.पू. बाबावर नाही नाही ते आरोप करुन शिव्या शाप देऊ लागली आणि म्हणाली तुझ्या घोडयाने माझ्या मुलीला मारलं. रडत रडत क्रोधायुक्त होऊन साधू भोंदू वगैरे अनेक दुषणे देऊ लागली, प. पू. बाबा मात्र हे सर्व शांत चित्ताने ऐकत होते. तिच्या सोबत आलेले यात्रेकरुही प. पू. बाबांना अद्वा तद्वा बोलू लागले, तसे बाबांचे भक्त ही बाबांच्या बाजूने उभे राहिले. इतक्यात बाबांनी सर्वांना शांत केले अन् त्या बाईला म्हणाले आण तुझ्या त्या मुलीला माझ्याकडे, पाहू तिला काय झाले तें ! असें म्हणताच तिने आपल्या मुलीला प. पू. बाबांच्या चरणी स्वाधीन केले. त्या मुलीच्या अंगावरचे वस्त्र काढताच तिचे रक्तबंबाळ झालेले शरीर पाहून प. पू. बाबा क्षणभर डोळे मिटून स्थिर झाले, या मागिल सुत्रधार कोण ते समजून चुकले. थोड्यावेळाने बाबांनी तोच कपडा अंगावर टाकून तिच्या शरीरावर हात फिरविला. बोलले उठ बाळे ! बाळे उठ ! तुला काहीं झाले नाही असे म्हणताच ती कन्या तात्काळ उठली, आजुबाजुला पहात तिने आपल्या आईकडे धाव घेतली, हा प्रसंग पहाताच बाबांच्या भक्तगणांनी प. पू. बाबांचा जयजयकार केला तसेच सर्व यात्रेकरुनी पुन्हा पुन्हा जयजयकार केला. हे दृष्य पाहून कन्येच्या आईने प. पू. बाबांच्या चरणी अक्षरशः लोळण घेतली. म्हणाली बाबा मला क्षमा करा, मी चुकले, मला क्षमा करा, असे म्हणून तिने बाबांचे चरण धरले.



www.sadgurusadanandamaharaj.com

# कोरवारात बाबा

बाबा कोरवारला कधी आले व किती दिवस राहिले हे निश्चितपणे सांगता येत नाही. बाबा आले तेव्हा ते एका मठात राहात असत असे दिसते. मठात लोकांकडून त्रास होऊ लागल्यामुळे बाबा साहेब गौडा नावाच्या गृहस्थाच्या घरी राहावयास गेले. कोरवारात काही दिवस गेल्यावर तेथून तीन मैलांवर असलेल्या हंदीगनूर या गावच्या भक्तांनी बाबांना आपल्या गावी नेले. तिथल्या कानडी शाळेचे मास्तर शरणय्या यांच्या घरी बाबा राहिले. हंदीगनूर येथे तीन एक महिने राहिले असावेत. या काळात अनेक भक्तांनी बाबांची सेवा करुन आशिर्वाद मिळविला.

शरणय्यांच्या भक्तीवर संतुष्ट होऊन बाबांनी त्यांना दोन इंच उंच देवीची मूर्ती निर्माण करुन आशिर्वाद म्हणून दिली. ''या देवीची पूजा अनन्य भक्तीने कर. ती वाढतच जाईल. तुला इच्छित फळ मिळून तू प्रबुध्द होशील'' असा आशिर्वादही दिला.

त्यांच्या आशिर्वादाप्रमाणे ती मूर्ती मोठी मोठी होत असून सध्या ती सहा इंच उंच झाली आहे. अजूनही हंदीगनूर यथील लोक त्या देवीचे दर्शन घेण्यास नेमाने येतात.

अशा प्रकारे हंदीगनूर येथे दोन तीन महिने राहिल्यावर गुरुंना परत कोरवारला आणण्यासाठी भोजप्पा गौड बिरादार यांनी १०१ शुभ्र बैलांना जोडून सजविलेला एक रथ, तसेच कोरवारच्या इतर काही भक्तांना सोबत घेऊन ते हंदीगनूरला आले. बाबांना सुंदराबाईच्या घरी उतरविले.

कोरवारच्या वास्तव्यात लोकांनी श्रध्देने आणि भक्तीने बाबांची सेवा केली. बाबांनी सुध्दा अनेक भक्तांच्या दुःखाचे निवारण करुन त्यांना भक्तीचा मार्ग दाखविला. अनेक चमत्कारही करुन दाखविले.

शंकराप्पा नगिनाळ यांचे थोरले बंधूसाहेब गौडा हे भगेंद्र रोगाने पछाडले होते. सात आठ वर्षे उलटली. कित्येक डॉक्टरांचे उपाय करुन हजारो रुपये खर्च केले तरी गुण येत नव्हता. हा रोग आता असाध्य आहे असा डॉक्टरांचा अभिप्राय होता. आपले उरलेले आयुष्य या रोगासहितच घालवावे लागणार म्हणून साहेब गौडा चिंतेत होते.

एक दिवस बाबा चार सहा भक्तांबरोबर दुकानात गप्पा मारीत बसले होते. ते ऐकून बाबांनी विचारले, ''तो कोण आहे ? त्याला काय झालंय ?'' ते आपले बंधू असून त्यांना एक विचित्र रोग झाला असल्याचे सांगून बाबांना त्या रोगाची कल्पना दिली. बाबांनी त्यांना बळजबरीने आत बोलावून जखमेला हात लावायला सांगून ''आता कमी वाटतंय का बघ ?'' असे तीन वेळा विचारले. त्या प्रत्येकवेळी त्याचं दुखणे कमी होत गेले. ''जा आता मल-विसर्जन करुन ये.'' असे बाबा म्हणाले. काही त्रास न होता मलविसर्जन होऊन काही दिवसांनी ते पूर्णपणे रोगमुक्त झाले.

www.sadgurusadanandamaharaj.com

लक्ष्मण घाटिगेर नावाच्या भक्ताला लग्न होऊन बरीच वर्षे झाली. तरी संतती झाली नव्हती. तो काळजीत होता. बाबांनी त्याच्या भक्तीवर संतुष्ट होऊन ''तुला एका वर्षात मुलगा होईल.'' असा आशिर्वाद दिला. त्याप्रमाणे त्याला मुलगा होऊन त्याचा संसार सुखाचा झाला.

याच स्थितीत असलेल्या शिवलिंगप्पा नगनूर यांनाही बाबांनी असाच आशिर्वाद दिला. शारदाबाई नाईकोडी नावाच्या भाविक स्त्रीला मुले होऊनही ती जगत नव्हती. बाबांनी तिला आशिर्वाद दिला. ''तुला एका वर्षात मुलगा होईल व तो दिर्घायुषी होईल.'' त्या प्रमाणे तिला मुलगा होऊन तो वाढत आहे.

बाबांनी कोरवारच्या वास्तव्यात प्रसंगानुसार अनेक चमत्कार करुन दाखविले आहेत. त्यातले काही ठळक येथे नमूद केले आहेत. असे चमत्कार करुन दाखविण्याचा उद्देश एकच. भक्तांची श्रध्दा वाढविणे. आणखी काही नाही.

एकदा बाबा अलंकृत पीठावर बसले होते. भक्त जमले होते. शहापूरचे सद्‌गुरु श्री. बसप्पय्या शरण यांचे चरित्र वाचन चालू होते. चरित्र वाचनात शरणांनी पाण्याचे तूप करुन सर्वांना जेवण घातल्याचा प्रसंग आला. कथा संपल्यावर जमलेले लोक शरणांच्या अद्‌भुत शक्तीची स्तुती करुन, असले गुरु लाभणे फार दुर्मिळ असे म्हणू लागले. तेव्हां बाबांनी एका तांब्यात पाणी आणावयास सांगितले. दहा मिनिटांत त्यातील पाण्याच्या जागी साजुक तूप तयार झाले. जिकडे तिकडे घमघम वास सुटला. असेच एकदा भक्तांच्या बरोबर गप्पा चालू होत्या. बाबा एकामागून एक पाने खात होते. थोडयावेळाने घरातली सगळी पाने संपली. बाजारात पान आणायला गेलेला मनुष्य तसाच परत आला. भक्त पेचात पडले. ही गोष्ट बाबांच्या ध्यानात आल्याबरोबर ''तुम्ही काही काळजी करु नका. परमात्मा कुठून तरी पानं आणून देईल. तिथल्या घागरीत हवी तेवढी पाने आहेत. त्यांना नमस्कार करुन पाने घेऊन या'' असे म्हणाले. एका भक्ताने जाऊन घागरीत हात घालून पाहिले तो हाताला बरीच पाने लागली. बाबांना खायला पाने मिळाल्याचे पाहून त्यांना आनंद झाला.

गंगाबाई नावाच्या भाविक स्त्रीच्या घरी बाबा एकदा गेले. बाबांसाठी चहा करावा म्हणून त्या स्वयंपाकघरांत गेल्या. चहा घेऊन येऊन पाहातात तो त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. बाबा आसनावर नव्हते. त्याजागी एक वर्षाचे लहान मूल खेळत होते. ही बाबांची लीला याची खात्री पटून तिने डोळे मिटून बाबांना नमस्कार केला. डोळे उघडून पाहाते तो परत बाबा त्या जागी दिसले.

संक्र्यांप्पाच्या घरी एकदा बाबा जमलेल्या तीस, चाळीस भक्तांसमवेत बोलत बसले होते. भक्तांची परीक्षा करण्याच्या उद्देशाने बाबांनी संक्र्यांप्पाला ''इथे बसलेल्या सर्व भक्तांना दोन-तीन तासांत पुरणपोळीचं जेवण करुन घालशील का ?'' असे विचारले. एरवी ही गोष्ट अशक्य असताही केवळ बाबांच्या शब्दाखातर तो तयार

www.sadgurusadanandamaharaj.com

झाला. स्वयंपाकाच्या तयारीसाठी उठला. दोन-तीन तासांत स्वयंपाकही तयार झाला. पण पोळी बरोबर वाढायला तूप नव्हते व एवढ्या लोकांना पुरेसे तूप त्या लहान गावात मिळणेही अशक्य होते. काय करावे याच्या विचारात पडला. ही त्याची अडचण बाबांना कळली. बाबांनी एका हंड्यात पाणी भरावयास सांगून संक्र्यांप्पाला बोलावून ''त्या हंड्यात काय आहे बघ'' म्हणाले, ''बाबा, आता तर त्यात पाणी भरले आहे'' असे सांगितले. ''तू जाऊन पाहातर खरं'' असे पुन्हा बाबा म्हणाले. त्याप्रमाणे संक्र्यांप्पानें हंड्यात पाहिले आणि थक्क होऊन गेला. हंड्यात पाण्या ऐवजी तूप भरलेले होते. असला चमत्कार परमात्मारुपी बाबाच करु शकतात हे सर्व जाणून चुकले. सर्वजण आनंदाने पोळी-तुपावर ताव मारुन तृप्त झाले.

बसाप्पा भैराडगी हे रोज बाबांची सेवा करीत. त्यांच्या सेवेवर व भक्तीवर प्रसन्न होऊन बाबांनी त्याला साक्षात सर्पधारी रुप दाखविले. ते अद्‌भुत शेषाचे रुप न पाहवता घाबरुन तो बाहेर आला आणि सर्वांना ती हकीकत सांगितली. सर्वांना आश्चर्य वाटले. आपल्याला ते ही रुप पाहाता येईल, या आशेने त्यांनी घाईघाईने आत येऊन पाहिले तो बाबा आपल्या नेहमीच्याच रुपात होते. सर्वांनाच परमात्म्याचे रुप कसे पाहावयास मिळावे ?

बाबांनी आपल्या आत्मलिंगाचे दर्शन अनेक वेळा अनेक लोकांना दाखविले आहे. असेच सुंदराबाईच्या घरी शंकराप्पा गौडा भोजप्पा गौडा आणि इतर चार सहा भक्त बाबांशी बोलत बसले होते. मधेच सुंदराबाई बाबांचे पाय धरुन ''आपण मला आत्मलिंग देतो असं म्हणाला होता. पण अजून आपली कृपादृष्टी झालेली नाही. आज आत्मलिंग दिल्याशिवाय मी इथून हलणार नाही'' असा हट्ट धरुन बसली. तिचे बोलण ऐकून बाबा हसले व सर्वांसमक्ष आपल्या हृदयातून अडीच इंच व्यासाचे व २ इंच उंचीचे आत्मलिंग काढले. नंतर एका भांड्यात पाणी आणावयास सांगून त्यात ते आत्मलिंग सोडले. ते जड असूनही पाण्यात बुडाले नाही. तिथल्या सर्व भक्तांना आपल्या जवळचे लिंग काढून पाण्यात सोडण्यास सांगितले. ते सर्व बुडाले. सर्वांना आश्चर्य वाटले. नंतर भांड्यातून ते आत्मलिंग काढून सुंदराबाईंना आशिर्वाद म्हणून देऊन त्यांचे समाधान केले.

कंदिलात किंवा स्टोव्हमधे तेलाच्या ऐवजी पाणी घालून पेटविल्याची अनेक उदाहरणे आहेत. सुंदराबाईकडे एकदा भजन चालू होते. सर्वजण भजनात तल्लिन झाले होते. एकाएकी दिवे गेले व सगळीकडे अंधार झाला. भक्त गोंधळले. घरात एका जुन्या कंदिलाशिवाय दुसरे काहीही नव्हते. तेलसुध्दा नव्हते. तेव्हा बाबा म्हणाले ''त्या कंदिलात पाणी घालुन तो पेटवून भजन चालू करा.'' हे कसे शक्य आहे ? अशी शंका येऊनही बाबांचा महिमा ठाऊक असलेल्या भक्तांनी दुसरा काही एक विचार न करता कंदिलात पाणी घालून पेटविल्यावर तो व्यवस्थित पेटला. भजन व्यवस्थित पुढे चालू झाले.

www.sadgurusadanandamaharaj.com

बाबांनी आपल्या भक्तांना त्यांच्या आराध्य दैवतेचे दर्शन देऊन आपल्या देवत्वाची प्रचीती आणून दिलेली आहे. ते एकदा साहेब गौडा यांचे घरी आंघोळ करुन पूजेला बसले होते. कसले तरी एक कापड आणावयास बाबांनी साहेब गौडाना सांगितले. साहेब गौडा वस्त्र घेऊन आत येऊन पहातात तर बाबा पाटावर नव्हतेच. तर त्यांचे जागी साक्षात गणपतीच पाटावर बसला होता. साक्षात परमात्माचे दर्शन झाले तरी ते बघण्याचा धीर न होऊन साहेब गौडा बाहेर निघाले. बाबांचा आवाज त्यांना आत बोलावीत होता. भीतभीतच देवाच्या पाया पडून पुन्हा वर पाहातात तो बाबा त्या पाटावर बसले होते. साहेब गौडाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले.

बाबांना शंकराप्पा गौड नावाच्या भक्ताला अनुग्रह घेण्याची इच्छा झाली. त्याला एक लहानसा खडा आणावयास सांगून तो त्यांनी आपल्या हातात घेतला. हातात आल्याबरोबर त्याचा आकार वाढला. तो खडा शंकराप्पाला देऊन ''याची रोज भक्तीभावाने पूजा कर हा रोज वाढत जाईल'' असं बाबांनी सांगितले. त्यांच्या आशिर्वादाप्रमाणे तो खडा मोठा होत जाऊन सध्या तो ५ इंच उंच व ४ इंच जाड झालेला आहे. असाच अनुभव कऱ्याप्पा हसमट्टी याच्याही बाबतीत आलेला आहे.

बाबा जसे भक्तांची परीक्षा करतात तसेच भक्तही बाबांची परीक्षा करतात. एकदा एक दारुडा बाबांना दारु पिण्याचा आग्रह करु लागला. ''मी कधीच दारुला शिवलो नाही.'' असे कितीही बाबांनी सांगितले तरी तो आपला आग्रह सोडीना. एका अटीवर शेवटी दारुची बाटली हातात घ्यावयास बाबा तयार झाले. आपण जे पान खाऊ ते प्रथम त्या दारुड्याने खायला पाहिजे एवढीच ती अट. या मगची गोम त्या दारुड्याला समजली नाही. तो त्या शर्तीला तयार झाला. बाबांनी त्याला एका शेतात घेऊन जाऊन रुईच्या झाडाची पाने तोडून खायला सुरुवात केली. आणि त्या दारुड्याला खाण्यास सांगितले. रुईचे पान खाल्ले तर आपण मरुन जाऊ, म्हणून तो घाबरला. ''आपण शर्तीत हरलो. आपला महिमा न समजून मूर्खाप्रमाणे आपल्याशी पैज लाविली. मला क्षमा करा,'' अशी याचना करु लागला. तेव्हा बाबा म्हणाले, ''तू जरी हरला असलास तरी मी हरलो नाही. आण ती दारुची बाटली.'' असे म्हणून बाबांनी ती दारुची भरलेली बाटली हातात घेतली. ती उपडी केली पण त्यातून काहीच बाहेर पडले नाही. दारु नाहीशी झाली होती. दारुड्याने लाजेने मान खाली घातली.

बाबा सर्वव्यापी आहेत. तसेच एकाच वेळी अनेक ठिकाणी दर्शन देणारे महात्मे आहेत. शंकराप्पांच्या दुकानात गप्पा मारीत बसले असतानाची एक गोष्ट आहे. गप्पांच्या मध्येच प्रतिदेह धारण करुन शंकराप्पाच्या घरी जाऊन ''तुझे वडील कुठे आहेत बोलावून आण.'' म्हणून त्याच्या मुलास पाठवून दिले. बाबांना त्या मुलाने पलंगावर बसवून धावतच वडिलांना बोलावण्यासाठी दुकानात आला, तिथेही बाबा

www.sadgurusadanandamaharaj.com

गप्पा मारीत बसलेले पाहून त्यांला आश्चर्य वाटले. घडलेली हकीकत त्याने तिथल्या लोकांना सांगितली. बाबा फक्त हसले.

बाबांची वाणी म्हणजे देववाणीच. त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले म्हणजे ते खरे ठरलेच पाहिजेत. आपल्या अमृतवाणीने ते असाध्य गोष्टीही सहज साध्य करुन दाखवू शकतात.

गावात चौकीमठ नावाचा एक पुरातन मठ आहे. बाबा रोज त्या मठात जायचे. शरणय्या नावाचे मास्तरही तेथे येत असत. एका वर्षी श्रावण मासात शरणय्या मास्तराकडूनच पुराण सांगून घेण्याचे बाबांच्या मनात आले. ''तू या वर्षी पुराण सांग'' असं शरणय्याला म्हणाले. बाबा आपली चेष्टाच करीत असावेत असे समजून ''बाबा, मी कधीच पुराण सांगितले नाही. मला ते कसे शक्य आहे ?'' असे शरणय्या म्हणाले, ''तू घाबरु नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. तुझ्या पूर्वजन्माच्या पुण्याईने तुला तसा आशिर्वाद झाला आहे. न घाबरता या वर्षी तू पुराण सांग'' असे बाबा उत्तरले. तेवढ्यावरच न थांबता स्वत: शरणय्यांना भगवी वस्त्रे शिवून देऊन पहिल्या वर्षी श्री. मडिवाळप्पा यांचे पुराण सांगावयास लाविले. अनुभविक पुराणिका प्रमाणे मास्तरांनी पुराण सांगितले. पुराण ऐकणाऱ्यांना आश्चर्य व संतोष वाटला. बाबांच्या आशिर्वादामुळेच आपल्याला पुराण सांगणे शक्य झाले अशी शरणय्यांची खात्री झाली. नंतरच्या वर्षी शरणबप्पांचं पुराणही शरणय्या मास्तरांनीच सांगितलं. कानडी शाळेचे मास्तर असलेले शरणय्या बाबांच्या आशिर्वादाने मोठे पुराणिक म्हणून किर्ती पावले आहेत.

१९७३ च्या श्रावण मासात कानडी शाळेचे दुसरे एक मास्तर पण्याप्पय्या यांचेकडून श्री. मौनेश्वराचे पुराण सांगून घेतले. पुराणात गोविंद भट आणि त्यांचे शिष्य शरीफ साहेब यांची गोष्ट आली. गोविंद भट अंत्य समयी आपल्या प्रिय शिष्याला जवळ बोलावून ''मला ओकारी आली आहे. ती एका भांड्यात घेऊन कुणीही त्यावर पाय देणार नाही अशा ठिकाणी टाक'' असे म्हणाले. त्याप्रमाणे त्यांची ओकारी एका भांड्यात घेऊन ते कुठे टाकावे म्हणून शरीफ साहेब विचार करु लागला. कुठेही टाकले तरी कोणाचा ही पाय पडणार व गुरुंची आज्ञा भंग होणार म्हणून कोणीही पाय देणार नाही ते स्थळ म्हणजे फक्त आपले पोट हे जाणून त्याने ती ओकारी गटा गटा पिऊन टाकली.

भक्ताची परीक्षा करण्याचीच गुरुंची इच्छा असावी. त्यांच्या परीक्षेस शिष्य उतरला. गुरु संतुष्ट झाले.

ही गोष्ट संपल्यावर बाबांनी बसलेल्या सर्वांच्या समोर कऱ्याप्पा नावाच्या भक्ताला बोलावून त्याच्या हातावर थुंकी टाकली. हातात थुंकीच्या ऐवजी शिवलिंग दिसू लागले. हा चमत्कार पाहिलेल्या सर्वांना आश्चर्य व आनंद झाला. बाबांच्या

www.sadgurusadanandamaharaj.com

आशिर्वादाने पुराण यथासांग पार पडले. पुराण-समाप्तीसाठी मुंबई, विजापूर आणि इतर ठिकाणाहून शेकडो भक्त आले होते. एका मोठ्या शृंगारलेल्या घोड्यावरुन बाबांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत हजारो स्त्री पुरुषांनी अती उत्साहाने भाग घेतला.

१९७४ च्या श्रावणमासात श्री. आल्लम प्रभूंचे पुराण वेदमूर्ती बसय्याशास्त्री बिजासपूर यांच्याकडून सांगून घेण्यात आले. १९७३ प्रमाणेच गावातल्या सर्व लोकांनी पुराण, मिरवणूकीत अधिक उत्साहाने भाग घेऊन व बाबांचा आशिर्वाद मिळवून कृतकृत्य झाले.

पुराण चालू असतानाची एक आश्चर्यकारक घटना आहे. नेहमी प्रमाणे पुराण ऐकण्यासाठी शेकडो श्रोते पुराण मंडपात जमले. बराच वेळ झाला तरी पुराणिक आलेच नाही. बाबाही पुराण ऐकण्यासाठी येऊन बसले होते. पुराणिक न आल्याने व्यवस्थापक चिंतेत होते. तेवढ्यात कोणीतरी एक पुराणिकासारखा दिसणारा माणूस मंडपात येऊन पुराण सांगून निघून गेला. तो कोण व कोठे गेला ? हे कोणालाही कळले नाही. हा केवळ बाबांचाच महिमा याबद्दल सर्वांची खात्री झाली. बाबाच पुराणिकाच्या रुपात येऊन पुराण सांगून गेले आणि स्वत: आपल्या नेहमीच्या रुपात पुराण ऐकलेही. ही घटना कोरवारात घडत असता बाबांचे दर्शन त्याचवेळी मुंबईतल्या काही भक्तांनाही घडल्याचे काही लोक सांगतात.

अशा प्रकारे एकाच वेळी पुराणिकाच्या रुपात पुराण सांगणे, आपल्या रुपात पुराण ऐकणे व दूरच्या गावी इतरांना दर्शन देणे हे केवळ सर्वव्यापी शक्ती असलेल्या दैवी पुरुषालाच शक्य आहे.

www.sadgurusadanandamaharaj.com



।। ॐ ।।

# बाबा सासनूरला

सुमारे दहा-अकरा वर्षांपूर्वी म्हणजे १९६५ साली बाबा बैलगाडीतून तेलगीला आले. येथे आल्यावर पहिल्यांदा त्या गावचे चेअरमन शंकराप्पा सिद्रामाप्पा हय्याळ यांच्याकडे उतरले. त्यांच्या घरी चारच दिवस राहून त्यांची सेवा त्यांनी स्वीकारली. एके दिवशी रात्री आठ वाजता दोड्डाप्पा करकळ्ळी व इतर सात-आठ भक्तांसमक्ष शंकराप्पाला विभूतीचा प्रसाद देऊन ''तुला आज पासून अन्न आणि वस्त्राची ददात पडणार नाही.'' असा आशिर्वाद दिला. त्याप्रमाणे त्यांना कुठल्याही प्रकारची उणीव न पडता त्यांची घरची परिस्थिती उत्तरोत्तर सुधारत गेली.

शंकराप्पाच्या घरानंतर शिवपुत्राप्पा देसाई यांच्या घरी बाबांनी कांही दिवस मुक्काम केला. त्यांनाही विभूतीचा प्रसाद देऊन विजापूरला परतले. त्यानंतर अधून मधून सासनूरला जाऊन एक-दोन दिवस राहून भक्तांना दर्शन व आशिर्वाद देण्याचा परिपाठ ठेवला.

१९७५ च्या वैशाख महिन्यांत 'श्री रेणुकाचार्य' यांचे पुराण ठेवण्यात आले होते. गावातले प्रमुख शिवपुत्राप्पा देसाई व इतर लोकांना प्रोत्साहन देऊन, बाबांनी ''तुम्ही पुराण सुरु करा, मी तुमच्या मागे आहे, तुम्ही काळजी करु नका.'' असे सांगितले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे त्या लोकांनी उत्साहाने पुराणाची व्यवस्था केली. शरणय्या हिरेमठ स्वामीनीं आपल्या अस्खलित वाणीने पुराण सांगून सर्व लोकांना मंत्रमुग्ध करुन सोडले. गावात एक नवचैतन्य निर्माण झाले. बाबांच्या आशिर्वादाने पुराण, कोणतीही अडचण न येता, निर्विघ्नपणे पार पडले. इथे सुध्दा कोरवारप्रमाणेच एक अद्‌भुत घटना घडली. काही अपरिहार्य कारणामुळे पुरोहितांना एक दिवस पुराण सांगण्यास येता आले नाही. ''आता काय करावे?'' हा प्रश्न व्यवस्थापकांना पडला. पण तेवढयात कोणीतरी एक पुराणिक येऊन त्या दिवशीचे पुराण सांगून निघून गेला.

बाबाच पुराणिकाच्या रुपाने आले असले पाहिजेत. कारण नंतर परत तो इसम कोणालाही दिसला नाही. पुराणासाठी लागलेल्या खर्चाचा भार सर्व भक्तांनी त्यागपूर्वक, भक्तीने आणि यथाशक्ती वाहिला. पुराणाच्या समाप्तीच्या दिवशी मुंबई, विजापूर, इंडी आणि इतर अनेक ठिकाणांहून शेकडों भक्त आले होते. त्यांनी पुराणाच्या सोहळ्यात उत्साहाने प्रत्यक्ष भाग घेतला.

त्या दिवशी सासनूरमध्ये उत्साहाचे उधाण आले होते आजूबाजूच्या खेडयांतून हजारो लोक आले होते. त्यावेळी 'वीर खडे भद्राचा' खेळ झाला. या खेळात मोठ

www.sadgurusadanandamaharaj.com

मोठया सळया अंग-प्रत्यंगांतून आरपार घुसवणे, शेकडो फूट लांब दोरी एका गालातून दुसऱ्या गालात आरपार घुसवणें, आदी अतिमानवी कामे ही मंडळी करुन दाखवितात. त्यांच्या अंगात वीरभद्रच संचारत असल्याने कोणताही अपाय न होता ते हे सर्व करु शकतात असे मानले जाते.

त्यानंतर शृंगारलेल्या घोडयावरुन बाबांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शेकडो सुवासिनी हातात आरती घेऊन पुढे चालल्या होत्या व मागे हजारो भक्तगण बाबांचा जयजयकार करीत चालले होते. मिरवणूक परत मंडपात येताना दुपारचे बारा वाजले. बाबांनी आपल्या गळ्यातील हार काढून टाकून हाती घोडयाचा लगाम घेतला. आता ते घोडयावरुन उतरणार असे वाटत असतांनाच बाबांनी त्या घोडयास भरधाव पळविले. बघता बघता तो घोडा दिसेनासा झाला. काहीजणांनी त्यांच्या मागे धावण्याचा निष्फळ प्रयत्न केला. सगळेजण काळजी करु लागले. बाबा परतण्याची वाट पाहाण्याखेरीज काहीच करता येण्यासारखे नव्हते. सुमारे अर्ध्यातासानंतर बाबा परत आले आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. बाबांचे घोडे सवारीचे कसब मात्र सर्वांना पाहायला मिळाले.

बाबा संतुष्ट झाले की भक्तांना निरनिराळ्या प्रकारचे आशिर्वाद देतात. रुद्राक्ष आणि विभूती बहुदा भक्तांना दिली जाते आणि हे ज्यांना मिळाले ते भक्त खरोखरच धन्य म्हणावे लागतील. कारण या दोन्हीची महती अगाध आहे. या दोन्ही शंकराच्या प्रिय वस्तू. शरणय्या स्वामींनी आपल्या पुराणात अगदी उत्तम रीतीने रुद्राक्ष आणि विभूतीचा महिमा वर्णन करुन सांगितला. तो असा :- पुराणकाळी देवदानवांत वारंवार युध्द होत असे. यज्ञ यागात विघ्नें आणून देवांना त्रास देण्याचा दानवांचा उद्योग. त्यांच्या त्रासाला कंटाळून सर्व देवलोकांनी शंकराकडे दानवापासून रक्षण करण्याची प्रार्थना केली. तेव्हां अत्यंत कोपीष्ठ होऊन शंकराने आपल्या अगाध शक्तीने दुष्ट दानवांचा संपूर्ण संहार केला. नंतर शंकरही प्रसन्न झाले, अती आनंदाने त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. प्रत्येक अश्रुंचे रुपान्तर रुद्राक्षात झाले. रुद्राक्ष म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराचे आनंदाश्रूच आहेत व त्याचा महिमा अगाध आहे. रुद्राक्षाचा आशिर्वाद देऊन बाबा भक्तांच्या संकटाचं निवारण करण्याचे आश्वासन देतात असं म्हणावयास हरकत नाही.

रुद्राक्षाप्रमाणेच विभूतीचा महिमाही अगाध आहे. भगवान शंकराच्या पत्नी पार्वतीस त्यांच्याबरोबर रानावनात भटकावे लागत असे. अंगावर आभूषणे नाही आणि नेसायला वल्कला शिवाय वस्त्र नाही. तिच्या मनांत एकदा विचार आला, ''कसलं हे जीवन ?'' देवात श्रेष्ठ असे शंकर माझे पती असूनही मला अरण्यांत अंगाला विभूती फासून हिंडाव लागत आहे. विष्णूची पत्नी लक्ष्मी मात्र अंगावर भरपूर दागिन्यानी मढलेली राजमहालात आरामात राहाते आहे. एके दिवशी तिने आपली ही व्यथा शंकराना बोलून दाखविली. तेव्हा शंकर हसले आणि तिच्या

www.sadgurusadanandamaharaj.com

हातात एक चिमुटभर विभूती देऊन म्हणले, ‘‘तू हे घेऊन कुबेराकडे जा व याच्या वजनाचं सोनं घेऊन तुला हवे ते दागिने करवून घे.’’ विभूती घेऊन पार्वती कुबेराकडे निघाली. ती येत आहे हे समजताच कुबेर थरथर कापूं लागला. येणाऱ्या संकटाची त्याला कल्पना आली. तेवढयांत पार्वती समोर आल्याचं पाहून तो म्हणाला, ‘‘देवी, आपण स्वत: का आलात, मला बोलवायचे होते. आपली मी काय सेवा करुं ?’’ तेव्हा पार्वतीने आपल्यजवळ दागिने नसल्याची व्यथा सांगून, ‘‘माझ्या जवळच्या विभूतीच्या वजनाचं सोनं दे, मी त्याचे दागिने करवून घेईन’’ असं म्हणाली ते ऐकताच कुबेर आणखीन घाबरला. पण नाईलाजाने तराजूच्या एका पारडयांत विभूती ठेऊन दुसऱ्या पारडयात आपल्या भांडारातली जडजवाहीरं ठेवण्यास सुरुवात केली. भांडारातली सर्व संपत्ती संपली तरी विभूतीचे पारडे काही उचलले जाईना. तेव्हां कुबेराला घाम फुटला व पार्वतीला म्हणाला, ‘‘देवी, विभूतीचा महिमा अति श्रेष्ठ आहे. त्रिलोकातल्या सर्व संपत्ती पेक्षा या विभूतीचं मोल अधिक आहे. विभूतीच्या मोलाचे जवाहीरे माझ्याकडं नाहीत. आपण मला क्षमा करावी.’’ पार्वतीलाही आपण शंकराकडून दागिने मागण्याची चूक केली हे लक्षात आले व शंकराची तिने क्षमा मागितली.

ब्रहत् जाबाल उपनिषदामध्ये सुध्दा विभूतीचा महिमा वर्णिलेला आहे. ऐश्वर्य प्रधान असल्याने त्याला ‘भूती’ किंवा ‘विभूती’ म्हणतात. पाप परिहार करणारा असल्याने त्याला ‘भस्म’ असे नाव आहे. भूतप्रेतादी दुष्ट शक्तीपासून संरक्षण करीत असल्याने विभूतीला ‘रक्षा’ असेही म्हटले जाते. असा महिमा असलेली ही विभूती आपल्या हातातून किंवा तळपायातून बाबा काढून काहीवेळा तेथील भक्तांना बोलवून त्यांच्या कपाळाला लावतात. काही भक्त ती विभूती घरी नेतात व स्नानानंतर किंवा रात्री निजायच्या आधी लावून घेतात. विभूतीचा आशिर्वाद मिळालेले भक्त आयुष्यात ऐश्वर्यवान होऊन, भितीमुक्त असे राहातात.

एके दिवशी गावचे संगनगौडा पाटील यांचे घरी वेळ घालवण्यासाठी देसाई शंकरप्पा चन्मलय्या वद्दोडगी आणि इतर भक्तांसह बाबा गप्पा मारीत होते. वेळ कसा जात होता ते कळत नव्हते. पहाटे तीन वाजता बाबांनी सर्व जमलेल्या भक्तांना जवळ बोलावून त्यांना आत्मलिंगाचे दर्शन दिले. सर्वांनी आवाक् होऊन त्या आत्मलिंगाचे दर्शन घेतले. पुढे कांही वेळानी बाबांनी आपल्या मांडीतूनही आत्मलिंग काढून दाखविले.

त्यानंतर जमलेल्या भक्तांपैकी काही जण बाबांच्या अद्भुत लीलांचे वर्णन करीत आपापल्या घरी निघून गेले. फक्त संगन गौडा पाटील, शंकराप्पा हैय्याळ आणि चनमलय्या वद्दोडगी एवढेच जण राहिले. पुन्हा बाबांनी आपल्या हृदयात लिंग दाखवून चनमलय्यास ते ओढून काढण्यास सांगितले. त्याने आपल्या सर्व शक्तिनिशी शेवटी कंटाळून ‘‘माझ्या हातून हे लिंग बाहेर काढणे शक्य नाही. हे गोकर्णाच्या

www.sadgurusadanandmaharaj.com

(रावण) शिवलिंगा सारखेच आहे.'' असे म्हणाले, बाबा हसले व त्यांनी परत आपल्या छातीतच ते लिंग अदृश्य केले.

शिवपूजप्पा पदशेट्टी एकदा बाबांना घेऊन फिरण्यासाठी गावाबाहेर गेले. वाटेत त्याला बाबांनी व्यंकटरमणाचे दर्शन दिले. ते पाहाताच त्याला काय करावे ते कळेना बाबांना साष्टांग नमस्कार करुन परत उठून पहातो तो बाबा परत आपल्या नेहमीच्या स्वरुपात होते. त्या दिवशी रात्री जेवण झाल्यावर जमलेल्या भक्तांपैकी एका भक्ताने ''बाबा, शिवपूजप्पाला आपण कोणता महिमा दाखविला ? त्याचा उद्धार व्हावा हीच आमची इच्छा आहे'' असे म्हटले. तेव्हा बाबा म्हणाले, ''मी व्यंकटरमणाचं दर्शन दिले असताना त्याने काहीही मागितले असते तरी ते त्याला मिळाले असते. त्याने काहीच मागितले नाही. त्याला मी काय करणार ? पण पुढच्या जन्मी तो एका विशिष्ट श्रीमंत घराण्यात जन्माला येणार आहे. त्याला तेव्हा कोणत्याही गोष्टीची वाण पडणार नाही.''

एका सामान्य शाळामास्तराला ज्याप्रमाणे बाबांनी नामांकित पुराणिक बनविला तसेच एका सामान्य माणसाला बाबांनी मांत्रिकही केला. त्याचे हे उदाहरण.

एकदा रात्री दहांच्या सुमारास मांतप्पा थेऊर यांच्या मुलाला विंचू चावला. मुलाच्या आईने त्याला बाबांच्याकडे आणून बरा करण्यासाठी आर्जवे केली, तेव्हा बाबांनी कोणतेही मंत्र तंत्र न जाणणाऱ्या हिरेगौडा मास्तराला ''तू या मुलावर मंत्र घाल तो बरा होईल.'' असे सांगितले. केवळ बाबांची आज्ञा पालन करावी म्हणून त्याने मंत्रा ऐवजी फक्त बाबांच्या नावाचा जप करावयास सुरुवात केली. आश्चर्य म्हणजे काही मिनिटांतच त्या मुलाचे दुःख नाहीसे होऊन हसतच आपल्या आईबरोबर तो घरी गेला.



www.sadgurusadanandamaharaj.com

# बाबा नाशिक येथे

बाबा १९७० ते ७२ म्हणजे सुमारे दोन वर्षे नाशिक येथे होते. श्रीरामाच्या चरण स्पर्शाने पुनीत झालेल्या पंचवटी येथे देशातील विविध भागांतून साधूसंत येतात. त्याच ठिकाणी राहाण्याचे बाबांनी ठरविले. त्यांना मराठी भाषेचा गंधही नव्हता. तरीपण त्यांच्या अद्भुत शक्तीची प्रचीती यायला तेथील लोकांना फार वेळ लागला नाही. बाबांच्या दर्शनासाठी लोक गर्दी करु लागले ''मला नाशिकच्या लोकांची भाषा येत नव्हती. एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणे मी हात जोडून बसत होतो व लोक मला नमस्कार करुन जात होते. त्यांना कोणता फायदा होत होता कोणास ठाऊक !'' असं बाबा चेष्टेने म्हणतात.

भक्तांशी जरी प्रत्यक्ष बोलले नाहीत तरी बाबा त्यांची सुखदु:खे तात्काळ जाणू शकतात व संकटांचे निवारणही करतात.

बाबांचे वास्तव्य काही दिवस एका मोठया सरकारी ऑफिसरच्या घरात होते. घरची सर्वच मंडळी बाबांची भक्ती करीत. कधी कधी बाबा भक्तांची परीक्षाही पाहात. एकदा त्यांनी घरातील भक्तांची परीक्षा करण्याचे ठरविले. परीक्षा पाहण्याची पध्दतच न्यारी !

एकादशीचा दिवस. सर्वजण उपवास करणारे. त्यादिवशी बाबांनी खाण्यासाठी अंडी मागितली. ते ऐकताच घरातील मालकिणीला विचित्र वाटले. बाबा कधीच अंडी खात नाहीत. त्यातून आजचा एकादशीचा दिवस, बाबा असे का वागताहेत ते त्यांना कळेना. त्यांनी बाबांना विचारले, ''बाबा, तुम्ही अंडी खात नाही. शिवाय आज एकादशी. बाजारातून मी अंडी कशी आणू ?''

बाबा ऐकायला तयार नव्हते. ''ते काही नाही, एकादशी असो, काही असो. मला अंडे हवे. आण बाजारातून'' असा आग्रह धरला. नाईलाजाने बाईंनी बाजारातून अंडी आणून बाबांनी सांगितल्याप्रमाणे एका पातेल्यात ती उकडत ठेवली. पाच दहा मिनिटां नंतर पुन्हा त्यावरचे झाकण काढून पाहिले तेव्हा तिचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना !

पातेल्यातील पाण्याचा पाक तयार झाला होता व अंडयांचा गुलाब जाम !!

डोळ्यांना दिसणारी प्रत्येक गोष्ट दिसते तशी नसते असे तर बाबांना दाखवून द्यायचे नव्हते ना !



www.sadgurusadanandamaharaj.com

# विजापूर येथे बाबा

तेलगीत बरेच दिवस बाबांचे वास्तव्य होते तरी अधून मधून ते इतर गावी जाऊन येत असत. असेच एकदा विजापूर जिल्ह्यातील सिंदगी या गावी गेले होते. तेथे संगाप्पा इवणी यांच्या दुकानावर जाऊन बाबांनी पैशाची मागणी केली. स्वत: संगाप्पा दुकानात नव्हते. तेथे असलेल्यांनी बाबा कोणीतरी वेडा आहे असे समजून पैसे न देता त्यांना परत पाठविले. नंतर बाबा संगाप्पांच्या घरी जाऊन भूक लागल्याचे सांगून जेवूनही गेले. संगाप्पाला यातले काही एक माहीत नव्हते. तेलगीत एक स्वामी आहेत. दिसायला वेडगळ असले तरी त्यांच्यापाशी अगाध शक्ती आहे असे त्यांच्या ऐकीवात होते व त्यांना भेटून त्यांचा आशिर्वाद घ्यावा असे त्यांच्या फार मनात होते. एके दिवशी अचानक बाबाच विजापूरला त्यांच्या घरी आले. हीच बाबांची आणि संगाप्पांची पहिली भेट.

संगाप्पाला पाहिल्याबरोबर बाबांनी त्याला कडकडून मिठी मारली. संगाप्पाला अंगात विद्युत संचार झाल्याचा भास झाला. हा काही सामान्य माणूस नव्हे याची त्यांना खात्री पटली. त्यावेळी बाबांचा अवतार एखाद्या वेडयासारखाच होता किरकोळ देहयष्टी, अंगावर धड कपडे नाहीत. थरथरणारे लुळे पडलेले हात अशा अवतारातल्या स्वामींचे पालन पोषण व सेवा करणे हे आपले कर्तव्यच आहे असे त्यांनी मानले. आणि बाबांना आपल्या मुलाप्रमाणे त्यांनी वागविले.

बाबांना कानडी भाषाही नीट बोलता येत नव्हती. जेवण म्हणजे काय, जेवायचे कसे, काही एक माहीत नव्हते. वाटेल ते व हवे तेवढे खायचे, नको असेल ते टाकून द्यायचे. रुईच्या झाडाच्या पानांवर त्यांचा फार लोभ भराभर रुईची पाने ओरबाडून ते खात असत. त्याचा काहीएक विपरीत परिणाम त्यांच्यावर होत नसे. त्याबरोबरच अत्यंत विषारी फळेही खाऊन पचविण्याची शक्ती त्यांच्या अंगात होती.

असल्या या अजब स्वामींना समाजात चार चौघांसारखे वागायला शिकविले ते संगाप्पांच्या धर्मपत्नीने. त्या साध्वीने बाबांना आईचे प्रेम दिले. लहानपणीच जन्मदात्या आईच्या प्रेमाला मुकलेल्या बाबांना फिरुन मातेचे वात्सल्य मिळाले. लहान मुलांना शिकवतात तसे तिने बाबांना जेवायला, कपडे घालायला वगैरे शिकविले. इतके असूनही बाबा विजापूरला जास्त दिवस राहात नसत. न सांगता सवरता एकदम कोठेतरी निघून जात व अकस्मातपणे कधीतरी परत येत. ''मुथ्थय्या (या नावानेच तेथील सगळे लोक बाबांना बोलावतात) इतके दिवस कोठे गेला होतास ?'' असे विचारता प्रत्येक वेळी ते वेगवेगळया गांवाची नावे सांगायचे असेच १९६७-६८ साली एके दिवशी कोणी एक गृहस्थ कारमधून बाबांना विजापूरला आणून सोडून गेले. त्यांना विचारले असता बाबा म्हणाले, ''मी मुंबईला गेलो होतो. एका स्टेशनवर उतरल्यावर तेथे कोणीच ओळखीचे नव्हते. प्लॅटफॉर्मवर एक श्रीमंत

www.sadgurusadanandmaharaj.com

गृहस्थ तोंडात सिगारेट धरुन आगपेटी शोधीत उभा होता. मी जाऊन बोटानेच त्याची सिगारेट पेटवली. त्या इसमाला काय वाटले कोणास ठाऊक त्याने मला आपल्या घरी नेऊन धोतर व शर्ट दिले. दुसरे दिवशी रेसमध्ये त्याला खूप पैसे मिळाले. त्याला फार आनंद झाला सर्व मुंबई त्याने मला हिंडवून दाखवली व आता मला येथे सोडून गेला.''

संगाप्पाची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी असली तरी कार ठेवण्याची मात्र त्याची ऐपत नव्हती. तरी बाबांसाठी म्हणून त्यांनी १८०० रुपये देऊन जुनी गाडी विकत घेतली. पेट्रोलसाठी मात्र पैसे नसायचे पण बाबा आपल्या अद्‌भुत शक्तीने गाडी पेट्रोल शिवायच चालवायचे व जिल्हाभर हिंडून यायचे.

असेच एकदा बाबा बदामी तालुक्यातील 'दक्षिणकाशी' म्हणून प्रसिध्द असलेल्या महाकूट क्षेत्री गेले. तेथे प्रचंड केवडयांचं बन होतं. केवडयाच्या बनात नाग असणारच म्हणून लोकांना तेथे जायला भिती वाटायची. पण बाबा मात्र हसत हसत त्या बनात शिरले व जवळजवळ चार तासांनी ते तेथून बाहेर आले. संगाप्पा व इतर काही भक्त मंडळी तोपर्यंत काळजीतच होती. बाबांना नागांची काय भिती ? बहुधा ते चार तास त्यांच्याशीच खेळून आले असावेत.

तिथून निघून बाबा बागलकोटला आले. तेथे २५ गॅसबत्त्या मागवून त्यांत पाणी भरुन त्या पेटवून दाखविल्या संगप्पा आणि घरातील सर्व मंडळींना बाबा म्हणजे प्रत्यक्ष देवासमान ते आपल्या पाठीशी आहेत तो पर्यंत आपल्याला कशाची काळजी नाही, असे ते समजतात. त्यांच्या आशिर्वादानेच संगाप्पांच्या पत्नीचा रोग बरा झाला. संगाप्पांच्या मुलाला लग्न होऊन चार वर्षे झाली तरी संतती नव्हती. एके दिवशी बाबांनी संगाप्पाच्या मुलाला बोलावून ''पुढच्या वर्षी तुझ्या मुलाकडूनच मी सेवा करवून घेणार'' असे सांगितले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे एका वर्षातच त्याला पुत्ररत्न प्राप्त झाले.

बाबा १९५० ते १९६२ पर्यंत अधूनमधून विजापूरला भेट देत असले तरी नियमितपणे विजापूरला भक्तांना दर्शन व आशिर्वाद देण्याचा उपक्रम १९७२ पासूनच सुरु झाला. नाशिकहून मुंबईला आल्यानंतर काही दिवस मुंबई तर काही दिवस विजापूरला राहाण्याचा परिपाठ चालू राहिला.

विजापूरला अजूनपर्यंत त्यांच्यासाठी वेगळा असा आश्रम नसला तरी इवणी वकीलांचे ऑफिस हाच आश्रम झाला आहे. सकाळ-संध्याकाळ भजन आरती चालते. बाबा विजापूरला असताना भक्त लोक येऊन त्यांचे दर्शन घेऊन आपले दुःख निवारण करुन घेतात. बाबांनी तेथल्या मुक्कामात अनेक अद्‌भुत चमत्कार करुन दाखविले आहेत. त्यांतील काही निवडक प्रसंगच येथे देणे शक्य आहे.

www.sadgurusadanandamaharaj.com

१९७३ साली गुडदिन्नी नावाचे गृहस्थ निवडणुकीसाठी उभे राहिले. ''आपल्याला यश मिळावं'' असा आशिर्वाद त्यांनी बाबांकडून मागितला. बाबांनी ''जा, तुझी टोपी पडणार नाही'' असा आशिर्वाद दिला. त्याप्रमाणे गुडदिन्नी निवडून आले. ही बाबांचीच कृपा असे ते मानतात.

एके दिवशी बाबा भक्तांबरोबर गप्पा मारीत बसले असताना, दर्शनाला आलेल्या पन्नाससाठ लोकांना पुरणपोळीचे जेवण द्यावयास चितवाड नावाच्या भक्ताला सांगितले. हा सुध्दा कोरवार प्रमाणेच घडलेला प्रसंग. बाबांवरील संपूर्ण विश्वासामुळे चितवाड पतिपत्नींनी सर्वांच्या जेवणाची तयारी केली. पुरणपोळयाही तयार झाल्या तुपाचा प्रश्न होताच-तेव्हा बाबांनी आपल्या दैवी शक्तीने तूप तयार केले. सर्व भक्त तूप-पोळी खाऊन तृप्त झाले. असेच आणखी एके दिवशी सायंकाळची आरती झाल्यावर चितवाडांना कपाटातील एक रिकामे भांडे आणावयास बाबांनी सांगितले, ते हातात घेऊन त्याकडे पाहत असतानाच ते भांडे तुपाने भरले.

दत्तात्रयाचे अवतार असलेले बाबा क्षणात कोठेही जाऊ शकतात, तसेच एकाच वेळी अनेक ठिकाणी दर्शनही देतात.

जुलै १९७५ ला एके दिवशी बाबा आश्रमात पत्ते खेळत बसले होते. तेथले काही भक्त मध्येच उठून खालच्या घरात येऊन पाहातात तो बाबा तेथे फराळ करीत बसलेले दिसले. ही किमया केवळ अवतारी पुरुषांनाच शक्य आहे.

सातोटगी गावचे कानडी शाळेचे मास्तर हे पांडेचरीचे श्री. अरविंद व माताजी यांचे भक्त. एकदा ते आपल्या मित्रांबरोबर विजापूर मार्गे बेळगावास मुलाच्या लग्नासाठी चालले होते. बाबांचा मुक्काम विजापूरलाच आहे असे कळल्यावर बाबांचे भक्त असलेले मास्तरांचे मित्र, त्यांना घेऊन बाबांच्या दर्शनासाठी आले.

दुपारची वेळ होती. बाबा विश्रांती घेत होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून लांबूनच दर्शन घेऊन शेजारच्या खोलीत बसून मास्तर ध्यान करुं लागले. तेव्हा त्यांना तेथील बाबांच्या फोटोतील प्रतिमा हलते आहे असे दिसू लागले. उन्हातून आल्यामुळे आपल्याला तसा भास होतो आहे असे क्षणभर त्यांना वाटले. ते पुन्हा ध्यानमग्न झाले तेव्हा त्यांना आठ पायऱ्या दिसल्या. बाबा वरच्या पायरीवरुन खाली उतरत आहेत असे दिसले. बाबा उठल्यानंतर मास्तर त्यांच्या पायावर डोके ठेवीत असताना त्यांना माताजींचे रुप दिसले. हे चमत्कार पाहून बाबा भक्तांच्या इष्ट देवतेचे दर्शन देऊन त्यांचा उद्धार करतात या बद्दल त्यांना शंका राहिली नाही.

हुंशिहाळ नावाच्या भक्ताला अनेक अनुभव आलेले आहेत. एकेदिवशी सकाळच्या दहाच्या सुमारास आश्रमातील सर्वांना बाहेर पाठवून फक्त हुंशिहाळना बाबांनी आंत बसवून खोलीचे दार लावले. आश्रमात एक कंदील टांगलेला होता. ''या कंदिलाची

www.sadgurusadanandamaharaj.com

किंमत किती आहे माहीत आहे का ? नसल्यास त्याच्यावर लिहिली आहे का ते पाहून ये'' असे बाबांनी सांगितले. कंदिलावर किंमत लिहिली नव्हती तरी पण त्याची किंमत दहा-बारा रुपये असावी असा त्यांनी अंदाज सांगितला. तेव्हां बाबांनी त्याला जवळ बसवून घेऊन ''तुला आता अग्नी देवाचे दर्शन देतो बघ,'' असे सांगून ''अग्निदेवा, तुझ्या या भक्ताला दर्शन दे, प्रकट हो, प्रकट हो,'' असे म्हणाले. तत्क्षणी कंदील भग्‌दिशी पेटला. त्यातून प्रज्वलित ज्वाला बाहेर पडू लागल्या. असले दिव्य दर्शन सर्वांना पहायला मिळत नाही.

भक्तीप्रमाणे फळ मिळत असते. ''माझ्यावर श्रध्दा ठेवली तर माझी विविध रुपे भक्तांना पाहायला मिळतील एरवी नाही'' असे बाबांनी सांगितले व ''येत्या एक वर्ष चार महिन्यात तुझ्या घरी एक सुंदर असा लक्ष्मीपुत्र जन्मास येणार आहे-नव्हे मीच तुझ्या घरी जन्माला येईन'' असा हुंशिहाळला आशिर्वाद दिला.

असेच एकदा दुपारी साडे अकराच्या सुमारास बाबांच्या दर्शनासाठी हुंशिहाळ आश्रमात गेले. दार बंद होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून आपली मोटार सायकल परत फिरवीत असतानाच आश्रमाचे दार आपोआप उघडत असलेले त्यांना दिसले. बाबा उठले असतील असे समजून ते वर चढून गेले. हातात भग्न झालेले शिवलिंग घेऊन बाबा कोपऱ्यात उभे होते. भक्ताला जवळ बोलावून, ''मी आंघोळ पूजा करून येताना खाली पडून हे लिंग भग्न झाले आहे. बाजारातून एक नवीन लिंग घेऊन ये'' म्हटले. भक्ताला काय करावे ते समजेना. पण कसे तरी धीर करुन ''बाबा, आपणच ईश्वररुप असताना, आपल्याला या दगडाच्या लिंगाची आवश्यकता काय ? माझी तुमच्यावर पूर्ण श्रध्दा आहे असे आपल्याला वाटत नाही आणि म्हणूनच मला भग्न झालेल्या लिंगाचे दर्शन घडविले'' अशी व्यथा त्याने बोलून दाखविली.

तेव्हा बाबा म्हणाले, ''नाही, तसं नाही तुझ्या भक्तीची मला पूर्ण कल्पना आहे. पण आज तुझ्यावर गंडांतर येणार होते त्याचे आज निवारण झाले आहे. आता काळजी करु नकोस'' असे बाबांनी म्हणताच ते भग्न शिवलिंग एकदम अभंग झाले बाबांनी त्यानंतर त्याला जवळ बसवून घेऊन आपला तळहात आपल्या गालावर घासून ''धर धर'' असे म्हणत एक रुद्राक्ष काढून देऊन त्याला गळ्यात घालण्यास सांगितले.

त्यांनाच एकेदिवशी बाबांनी आपल्या आत्मलिंगाचे दर्शन दिले. छातीवर सुमारे पाच-सहा इंच मोठे, विभूती आणि कुंकवाने मढलेले लिंग पाहून भक्ताला धन्यता वाटली. काही मिनिटांतच ते लिंग अदृश्य झाले.

या भक्ताला ज्या प्रमाणे अनेक चमत्कार करुन दाखविले त्याचप्रमाणे त्याच्यावरील संकटाचे निवारणही केलेल्याची उदाहरणे आहेत. त्याच्या पत्नीला बरीच वर्षे सर्दीचा त्रास होता. पाण्याशी नुसता संपर्क झाला तरी पडसे व्हावयाचे. अनेक

www.sadgurusadanandamaharaj.com

औषधोपचार करुनही गुण येत नव्हता. त्यांनी गुरुंजवळ आपली व्यथा सांगितली. बाबा हसले व आपलेही नाक पुशीत ''बघ, मलाही सर्दी झाली आहे'' असे म्हणाले. त्या दिवसापासून भक्ताच्या पत्नीचे पडसे मात्र साफ नाहीसे झाले.

स्वत: भक्ताला सरकारी कामासाठी हिंडावे लागत असे ऊन, पाऊस थंडी यांची पर्वा न करता हिंडायचे. हवा तेवढा चहा प्यायचा हा उद्योग. यामुळे अंगात उष्णता खूपच वाढली होती व त्याचा त्यांना फार त्रास होत असे. जेव्हा बाबांना ही गोष्ट सांगितली तेव्हा बाबा म्हणाले ''काही काळजी करु नकोस, जो पर्यंत मी तुझ्या पाठीशी आहे तो पर्यंत तुला काही होणार नाही.'' त्या दिवसापासून त्यांचा त्रास नाहीसा झाला.

बाबा भक्तांच्या भक्तीवर प्रसन्न झाले की त्यांनी मागितलेले मागणें मुक्त हस्तांनी देतात. १९७५ साली विजापूर भागात खूप पाऊस पडला. बाबा भक्ताला म्हणाले, ''तू तुझ्या मळयात ऊस लाव'' पाऊस जास्त पडला होता तरी ऊसास पुरेसे पाणी विहीरीत नसल्याने ऊस कसा लावावा ते काही त्याला कळेना. तेव्हा बाबा म्हणाले ''तू दुसरा कोणताही विचार न करता मी सांगतो तसा ऊस लाव'' त्याप्रमाणे भक्ताने ऊस लावला आणि आश्चर्य म्हणजे अपुरे पाणी असूनही ऊसाचे अमाप पीक आले. हे जेव्हा बाबांना सांगण्यात आले तेव्हा बाबा म्हणाले, ''मोजता मोजता तुझे हात दुखतील एवढे याचे पैसे तुला मिळतील'' बाबांची वाणी अशी फलद्रूप झाली.

बाबांच्या वल्लभ नावाच्या श्वानाला Anti Rabis इंजेक्शन मिळविण्यासाठी हुंशिहाळला मोटर सायकल वरुन खूप हिंडावे लागले. ''तू किती रे कष्ट घेतोयस'' असे बाबा त्याला म्हणाले. या संदर्भात त्याला एक आश्चर्यकारक अनुभव आला.

ते आपल्या मोटर सायकलीत दर तीन-चार दिवसांनी पाच लिटर पेट्रोल घालीत असत. पण जवळजवळ १५ दिवस पेट्रोल घालण्यास तो विसरले होते. गाडी मात्र व्यवस्थित चालू होती. रिझर्वमध्ये सुध्दा कधी आली नाही. ''हे कसे शक्य आहे?'' असा विचार करुन ते टाकी उघडून पहातात तो पंधरा दिवसापूर्वी जेवढे पेट्रोल घातले होते तेवढेच अजूनही शिल्लक होते.

बाबांच्या कृपेशिवाय हे अशक्य आहे याची त्यांना खात्री पटली.

श्री. मुकुंदा हंचाटे हे ताळीकोटचे (विजापूर) कपडयाचे व्यापारी. विजापूरचा आश्रम स्थापन झाल्यानंतर भक्तांची रीघ वाढत गेली, भक्तांचे प्रश्न जसजसे सुटत तशी गर्दी वाढत गेली. त्यातलेच एक श्री. मुकुंदा हंचाटे ! डोईवर कपडयांचे गाठोडे घेऊन ते तालीकोटच्या बाजारात जात ! परंतू विक्री होत नसे. निराशेने ते घरी परत येत आणि प. पू. बाबांच्या दर्शनाला येऊन प्रत्येकवेळी तक्रार करीत व म्हणत, माझा कपडयाचा धंदा चालत नाही बाबा ! काय करु ? बाबा त्याला म्हणत तू

www.sadgurusadanandamaharaj.com

तिथेच धंदा कर कपडयाचा ! बस एवढच यापेक्षा प. पू. बाबा त्याला काहीच बोलत नसत असें जवळ जवळ वर्षभर चाललं. श्री. मुकुंदा हंचाटेची तीच तक्रार अन् बाबांचं तेच उत्तर तू तिथेच धंदाकर कपडयांचा ! असे करतां करतां हंचाटे तोचतोच प्रश्न करुन कंटाळला ! परिस्थितीने कफल्लक झाला, कर्जाऊ झाला. त्याचे सर्व उपाय वाया गेले परंतू धंदा काही चालेना. बाबांवर असलेल्या श्रध्देमुळे शब्द मोडवेना. घरी मोठे कुटुंब, सर्व एकत्र रहात होते. कुटुंबाचा सर्व भार मुकुंदा वडीलभाऊ असल्यामुळे त्याच्या वर होता. काय करावे काही सुचेना. प. पू. बाबासुध्दा आपल्याला मार्गदर्शन करित नाहीत. तिथेच धंदा कर कपडयांचा म्हणतात, तरीही धंदा काही चालत नाही याच विवंचनेत असताना प. पू. बाबांच्या दर्शनाला पुन्हा निश्चय करुन निघाला, आतां बाबांना काहीच विचारायचं नाही, गप्प बसुन राहायचं असा निर्धार केला आणि प. पू. बाबांच्या दर्शनाला विजापूरला आला, दर्शन घेतले पण एक शब्दही बाबांशी बोलला नाही. गप्प राहीला, थोडा वेळ गेला मुकुंदा बोलत का नाही ! बोलत का नाही ! म्हणुन प. पू. बाबा त्याच्याकडे एकसारखे टक लावून पहात राहीले आणि हसुन म्हणाले मुकुंदा तुझे ग्रहमान बदलले, जा उठ उद्यापासुन तूं जोरात कपडयांचा धंदा कर, तू लखपती होशील. दुसऱ्या दिवशी श्री. मुकुंदा कपडयांचं गाठोडे डोक्यावर घेऊन बाजारात निघाला. गेल्यावर अर्ध्या तासांत सर्व कपडयांची विक्री झाली. हंचाटे पुन्हा घरी आला. गाठोडे घेऊन पुन्हा निघाला त्याचीही विक्री झाली. अशा तऱ्हेने एका महीन्यांत मुकुंदाच्या कपडयाची विक्री एक लाखाची झाली आज मुकुंदाचा कपडयाचा धंदा जोरात चालू असुन त्याने बाजारात काही दुकानेंही विकत घेतली असुन १०/१२ वर्षांत मुकुंदा कोटींचा मालक आहे. सद्‌गुरु सदानंद बाबांनी त्याची परिक्षा पाहिली आणि श्रध्देचे फळ आज मुकुंदाला मिळाले आहे.

दर वर्षाच्या श्रावण महिन्यात गोकुळ अष्टमीला गं. भा. रंगुताई अनिखिंडी ही विजापूरच्या कृष्णमंदिरात जात असे, परंतू १९९४ च्या श्रावण महिन्यात तिच्या कानावर प. पू. सदानंद बाबांच्या आगमनाची व त्यांच्या साक्षात्कारी प्रसंगांची बातमी काही बाबांच्या भक्तांकडून मिळाली. गोकुळ अष्टमीच्या आदल्या दिवशी तिच्या स्वप्नात प. पू. बाबा फेटा-भस्म-गंधटीळा अशा अवस्थेत आले व गुप्त झाले. नंतर तत्काळ एक पाळणा व त्यात लहानसे बाळ हसत खेळत आहे असे दिसले. जसा कांही श्रीकृष्ण बाळच. सकाळी उठताच तिला रात्रीच्या स्वप्नाची आठवण झाली. त्या विचारातच सारा दिवस गेला. तिला काय वाटले कुणास ठाऊक. संध्याकाळ झाली तसे तिला जाणवले आज गोकुळ अष्टमीचा दिवस पाऊस मुसळधार पडत होता, विचार केला आजची रात्र सदानंद बाबांच्या आश्रमातच घालवावी म्हणून प्रथमच संध्याकाळी तिन्ही सांजा विजापूरच्या आश्रमात भक्तांसोबत बाबांच्या दर्शनाला आली. भजन चालू होते थोडया वेळाने प. पू. बाबा आले व गादीवर विराजमान झाले.

www.sadgurusadanandamaharaj.com


रंगुताई बाबांना पहाताच रात्रीच्या स्वप्नाची आठवण झाली आणि आपण स्वप्नांत पाहिलेले बाबा ते हेच. आपण बाबांना कधीही पाहिले नसताना अशीच बाबांची मुर्ती जशीच्या तशी स्वप्नात कशी आली ? का आली ? यामागचे गुढ काय आहे ? वगैरे अनेक विचार डोक्यात थैमान घालू लागले ! अन निश्चय केला की काहीही असो यापुढे रोज आपण याच आश्रमात येवून बाबांचे दर्शन घ्यायचे हा नित्यक्रम चालू ठेवला.

काही दिवसांनी तिच्या घरी एक अघटीत व चमत्कारीक घटना घडली. रंगुताई ही रोज पहाटे उठत असे. एके दिवशी पहाटे हातात तेलाचा दिवा घेवून (त्यावेळी विद्युत वाहिनी नेमेप्रमाणे बंद होती) स्वयंपाक घरात जात असताना आतील घराच्या पायरीवर पाच सहा फुट लांब व जाड दोरखंड काळसर धुरकट रंगाचा दिसला. ती विचार करु लागली, की हा एवढा जाड दोरखंड कुणी ठेवला ? मुलाने नाही ना ठेवला ? म्हणून तिने आपल्या मुलाला, शशीकांत अनिखिंडी यास उठवलं व म्हणाली आपल्या घरातल्या पायरीवर जाड दोरखंड कुणी व का ठेवला ? तू ठेवलास का ? म्हणून विचारु लागली. शशी म्हणाला कसला दोरखंड, मी नाही ठेवला. कुठे आहे, चल दाखव म्हणून तो आईसोबत दोरखंड पहायला आला. आई पहाते तर त्या जागी दोरखंड वगैरे काही नाही. रंगुताई चकित झाली व म्हणाली आता इथे होता, मी पाहीला अन असं कसं झालं ? इतक्यात शशी बॅटरी आणण्यास गेला व थोडया वेळाने त्या जागी बॅटरी मारुन पहातो तर तिथे पायरीवर खरोखरच कांही नाही, म्हणून आजुबाजूला बॅटरी मारुन पाहु लागला, एका अडगळी सारख्या जमिनी लागत असा बोहला - एक दोन फुट खोलवर असून त्यात एक चंदनाची बऱ्याच वर्षाची ओबडधोबड एक फुट लांबीची फांदी होती, त्या ठिकाणी शशीने बॅटरी मारली अन पहातो तर तो दोरखंड नसून त्या फांदीला विळखा मारुन बसलेला जातीवंत नागोबा होता. तो दोघांनी पाहिला व बॅटरी मालवून, बाजुला होवून दोघेही घाबरुन गेली. शशी बोलला आई मी काठी घेवूंन येतो, तू लक्ष ठेव ? आई बोलली नको रे बाबा ! तू त्याला मारु नकोस ! कुणी तरी-कुणाच्या तरी रुपाने आपल्या घरी आला आहे. तो आला तसा परत जाईल. तू त्याला मारु नकोस ! असे बोलताना शशीने पुन्हा बॅटरी मारली व पहातो तर तिथे फक्त चंदनाची फांदी - नागोबा अदृष्य झाले होते. दोघांनाही विचार आला की आता आपण करायचं काय ? नागोबा गेले कुठे ! की घरातच आहेत या भ्रमिष्ट अवस्थेत घाबरतच वेळ कधी केव्हा निघून सकाळ झाली ते त्यांना कळलेसुध्दा नाही. मात्र आता करायचं काय या विचारात असताना रंगुताईला वाटलं की कुणीतरी नागोबाच्या रुपाने अवतारी पुरुष घरी येवून गेले असणार.

संध्याकाळ झाली तशी रंगुताई नित्याप्रमाणे विजापूर बाबांच्या आश्रमात महिलांच्या गर्दीमध्ये येवून बसली. भजन चालू असताना प. पू. बाबा आपल्या

www.sadgurusadanandmaharaj.com

गादीवर विराजमान झाले. प. पू. बाबांचा एक होरा असायचा. गादीवर बसल्यानंतर सर्व भक्तांमध्ये एक नजर टाकायची, त्याप्रमाणे त्यांची नजर रंगुताईंवर गेली. तीला बोलावून उभी केली. भजन थांबलं. ज्याप्रमाणे ईश्वर व भक्त वेगळे असू शकत नाही, त्याप्रमाणे ईश्वर निर्गुण असल्यामुळे त्याला देहभाव असलेल्या भक्ताशी बोलता येत नाही, म्हणून तो आपल्या कार्यब्रम्हांड भक्ताची गांठ घालून देतो, त्या कार्यब्रम्हालाच गुरु असे म्हणतात. म्हणजेच गुरुच्या रुपाने तोच बोलत असतो. या सिध्दांतानुसार बाबांनी तीला विचारले, तुझ्या घरी आज पहाटे कोण आलं होतं तिच्या ते काही लक्षात येईना. पून्हा बाबा मोठयाने बोलले तुझ्या घरी आज पहाटे कोण आलं होतं ? हे ऐकताच रंगुताई भांबावून गेली व घाबरली, मनांत म्हणाली माझ्या घरी कोण आला होता, हे बाबांना कसं समजलं ! मला किंवा माझ्या मुलालाच माहीत. मुलगा घरी आहे वगैरे विचार तिच्या मनात क्षणात थैमान घालून गेले. तत्काळ दुसरा विचार आला की प. पू. बाबा ही साधी व्यक्ती नसून एक अजात शक्ती आहे. त्यांच्या लीला फक्त ऐकल्या होत्या, परंतु प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळे ती धीट बनली व हात जोडून म्हणाली बाबा तूम्हीच माझ्या घरी आलात, मला दर्शन दिलेत ! मी आणि माझा मुलगा भाग्यवान ठरलो, कृतार्थ झालो. कुणीतरी कुणाच्या रुपाने आला असेल ही माझी वाणी खरी ठरली, असे म्हणून रंगुताई बाबांच्या चरणी लीन झाली. बाबांनी तुझे कल्याण होईल असा आशिर्वाद दिला. त्यानंतर आज या क्षणाला रंगुताईंचे घर व आजुबाजूचा त्यांचा परिसर पावन होवून भरभराट झाल्याचे दृष्य दिसते ही प. पू. बाबांचीच किमया.



www.sadgurusadanandamaharaj.com

# सिंदगीस भेट

बाबा असेच भटकत एके दिवशी दुपारी सिंदगी गावात आले. गावात शिरल्याबरोबर पहिले घर मखदुमा नावाच्या मुसलमान स्त्रीचे होते. उन्हातून आल्यामुळे बाबांना तहान लागली होती. मखदुमाच्या दारात उभे राहून बाबांनी पाणी मागितले. ''दुपारच्या वेळी ही कसली कटकट'' असे म्हणत तिने पाणी न देता दार बंद करुन घेतले. बाबा दाराजवळच्या खिडकीपाशी आले आणि म्हणाले ''ताई, उन्हामुळे मला फार तहान लागली आहे. पाण्याला नाही म्हणू नये. मला प्यायला पाणी दे'' मखदुमाला जास्तच राग आला, पण पाणी दिल्यास एकदा ही पीडा जाईल असा विचार करुन स्वयंपाक घरातील माठातील गार पाणी आणून बाबांच्या पुढे आपटले व म्हणाली ''पी पाणी आणि पुढे हो'' बाबा हसले व म्हणाले ''ताई हे पाणी तर गरम आहे. कसे पिऊ ? मला दुसरं गार पाणी आणून दे.''

मखदुमाचा कोप अनावर झाला. तिला वाटले. याचे डोके बिघडलेले दिसतेय. पण याच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही, म्हणून परत स्वयंपाक घरातून दुसरे पाण्याचे मडके आणून त्यांच्यापुढे आदळले. बाबा पुन्हा हसून म्हणाले ''ताई, पाणी अजून गरमच आहे कसे पिणार ?'' तेव्हा हा म्हणतोय तरी काय ते पहावे म्हणून तिने पाण्यात हात घालून पाहिले तर खरोखरच हात भाजण्याइतपत ते पाणी गरम झाले होते. तिला अतिशय आश्चर्य वाटले. हा सामान्य माणूस नव्हे असे वाटून तिने ''मी मडक्यातून थंड पाणी आणले असता ते गरम कसे झाले सांग'' म्हणून विचारले. तेव्हा बाबा म्हणाले, ''ताई, तू माझ्यावर रागावल्यामुळे तुझे डोके गरम झाले आहे आणि म्हणूनच तू आणलेले थंड पाणी सुध्दा गरम झाले आहे. तू शांत झालीस तर पाणी सुध्दा थंड होईल.''

नंतर त्या मखदुमाला आपली चूक लक्षात आली. ती शांत झाली तसे ते पाणी सुध्दा गार झाले. तिने बाबांच्या पायावर डोके ठेवले आणि त्यांची क्षमा मागितली. बाबा, तिला आशिर्वाद देऊन व पाणी पिऊन निघून गेले. त्या दिवसापासून बाबांची ती परमभक्त झाली रोज दर्शनासाठी येऊ लागली.

गोषातील एका मुसलमान स्त्रीने एका हिंदू स्वामींच्या दर्शनाला जाणे तेथील मुसलमान लोकांना, विशेषत: तिच्या नवऱ्याला, मुळीच आवडले नाही. तिला बाबांच्या दर्शनाला जाण्याची बंदी करण्यात आली. मखदुमाला अतीव दु:ख झाले. ''कोणत्यातरी रुपाने का होईना आपण मला रोज दर्शन द्या.'' अशी तिने घरीच बाबांची प्रार्थना केली.

बाबांनी तिची प्रार्थना ऐकली ''मी तुझ्याकडे रोज सर्प रुपाने येईन'' असा तिला स्वप्नात दृष्टांत दिला. त्याप्रमाणे रोज बाबा सर्प रुपात तिच्या घरी येऊन, दर्शन देऊन, तिने ठेवलेले दूध पिऊन जात असत.

www.sadgurusadanandmaharaj.com

एके दिवशी तो असाच सर्प आलेला असतानां त्याला मखदुमा दूध देत असल्याचे पाहून तिच्या नवऱ्याचा राग अनावर झाला. त्या सर्पाला मारण्यासाठी म्हणून त्याने काठी उगारली पण त्याचा वर गेलेला हात तसाच राहिला व हातातील शक्तीच नाहीशी झाली. ''तू मला ओळखलं नाहीस काय ?'' एवढे बोलून तो सर्प अदृश्य झाला. नवऱ्याला कांहीच कळेना. हा ''कसला विचित्र प्रकार ?'' म्हणून त्याने बायकोला विचारले, तिने घडलेली सर्व हकीकत नवऱ्याला सांगून, आपल्या नवऱ्याच्या हातातील गेलेली शक्ती परत यावी म्हणून बाबांचा धावा केला. त्याबरोबर त्याची शक्ती परत येऊन हात खाली आला.

त्याला आपली चूक कळून आली. तेव्हा पासून तो बाबांचा एकनिष्ठ भक्त झाला.

या अद्‌भुत घटनेने, देव जातिभेद मानीत नाहीत अशी खात्री पटून त्या गावातले अनेक मुसलमान लोक बाबांचे भक्त झाले. बाबांचा फोटो अजूनही त्या गावच्या मशिदीत पाहावयास मिळतो.



www.sadgurusadanandamaharaj.com

# बाबा बेंगळूर येथे

के. जी. चनबसाप्पा हे बाबांचे भक्त आहेत. बाबा एकदा त्यांच्या घरी गेले असताना त्यांना आपला फोटो लावलेला दिसला. तो फोटो हातात घेऊन बाबा हसत म्हणाले, ''हा काही नवीन नाही. फार जुना आहे.'' नंतर तो फोटो परत त्यांच्या हाती देत असताना त्या फोटोच्या काचेवरुन सळसळ आवाज करीत दोन रुद्राक्ष बाबांच्या हातात आले. ते आशिर्वाद म्हणून चनबसाप्पाला देऊन ''हे गळयात घाल तुझे कल्याण होईल,'' असे सांगितले.

आणखी एकदा असेच चनबसाप्पा आपल्या एका पाहुण्याला घेऊन बाबांच्या दर्शनाला गेले होते. बोलता बोलता गळयात घालण्याच्या लिंग पेटीचा विषय निघाला. (लिंगायत लोकांत अशी पेटी वापरण्याची पध्दत आहे.) बाबा म्हणाले, ''मी लिंग पेटी फक्त विजापूरच्या भागात गेलो तरच घालतो. काण तिथले लोक त्याबद्दल विचारतात. तेव्हा चनबसाप्पा ''बाबा, तुमच्यात आत्मलिंग असताना या लिंगाची आवश्यकता काय ?'' असे म्हणत असतानाच गुरुनी अंगात घातलेल्या पांढऱ्या तलम शर्टाच्या आत शुभ्र चांदीची पेटी दिसू लागली. काही मिनिटांतच लिंग स्वरुपात देव बाबांच्या छातीवर दिसून पुन्हा चांदीच्या पेटीत अदृश्य झाले. भक्ताला आत्मलिंगाचे दर्शन झाले.

चनबसाप्पाच्या मुलीचे लग्न ठरले होते. लग्नासाठी मंगळसूत्र व हार करण्यासाठी त्यांच्या पत्नीने सोन्याची सहा नाणी एका चामडयाच्या पिशवीत घालून सराफांच्या दुकानात जाण्यासाठी चनबसाप्पाच्या हातात दिली. सराफाच्या दुकानात जाईपर्यंत काळोख पडला होता. दुसऱ्या दिवशी आलात तर याविषयी जास्त बोलू असे सराफाने सांगितले म्हणून दुकानातून परत येऊन दुसऱ्या दिवशी पाहातात तो त्या पिशवीत सहा ऐवजी तीनच नाणी दिसली. त्यामुळे घाबरुन जाऊन दोघे पतीपत्नी अनेक तर्क करु लागले. त्यांच्या घरातल्या गडयावरही संशय घेण्यात आला. तपासासाठी त्याला पोलिसांच्या हवाली करण्यात आले.

मंगलकार्यासाठी मुद्दाम ठेवलेले सोने हरवले म्हणून सर्वांना अतिशय वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी चनबसाप्पाची पत्नी कुठेतरी नाणी पडली असतील काय म्हणून घरीच शोधत असता त्यांच्या अंगावरुन तीन सोन्याची नाणी खाली पडली. या धक्कादायक घटनेने तिच्या अंगावर काटे उभे राहिले. या घटनेमागे बाबांचाच अनुग्रह आहे याची खात्री पटून ते सर्व त्यांच्यापायी नतमस्तक झाले.

डॉ. हेबळ्ळींची पत्नी सौं. डॉ. आशा हेबळ्ळी हिला बरीच वर्षे एका जर्जर रोगाने पछाडले. कांही केल्या गुण येईना औषधे व गोळ्या घेवून बेजार झाली. डॉ. श्री. हेबळ्ळीनाही आपल्या पत्नीची अवस्था पाहून किव येई व म्हणत तू

www.sadgurusadanandmaharaj.com

माझ्यासोबत प. पू. सद्‌गुरु सदानंद महाराजांच्या दर्शनाला चल त्यांच्या दर्शनाने - आशिर्वादाने तुला गुण येईल मला त्यांनी प्रत्यक्ष विश्वरुप दर्शन दिले आहे. ते जर्जर रोगाने पिडीत लोकांना बरे करतात, तू पण चल, त्यांचे दर्शन घे. डॉ. आशा हेबळ्ळी म्हणे माझा साधू लोकांवर विश्वास नाही ! तुम्ही ठेवा ! माझा मात्र साधूसंत रोगनिवारण करु शकतात मग डॉ. कशाला हवेत, माझा यावर मुळीच विश्वास नाही, अशा तऱ्हेने आणखी काही महिने गेले. डॉ. सौ. आशा देवीची स्मरण शक्ती, नजर आस्ते आस्ते कमी होऊ लागली म्हणुन तीने डॉक्टरकडून औषधांचा फरक केला. दवा आणि ८० रुपयाची रोज एक गोळी याप्रमाणे काही दिवस गेले परंतू रोग मात्र बळावत चालला नजर-दृष्टी कमी होऊ लागली औषधें चालू, परंतू गुण काहीच नाही. अशा तऱ्हेने तिचे रोजचे दुखणे वाढत जायचे.

एके दिवशी पुन्हा डॉक्टर आपल्या पत्नीला कळकळीनें म्हणाले की तू माझ्याबरोबर प. पू. बाबांकडे जाऊ चल. त्यांच्या चरणी लीन होऊ. एक वेळ तरी तू माझ्या सोबत ये आणि पहा, औषध आणि ८० रु. एक गोळी घेऊन तुला गुण नाही ना ? मग निदान हा बाबांच्या दर्शनाचा शेवटचा उपाय म्हणून तरी माझ्या सोबत ये ! तूं औषधें गोळ्या घेऊन कंटाळलीस ! निदान माझ्या सोबत बाबांचे दर्शन घेण्यास कंटाळू नकोस. मला वाटते खात्रिने तुझा रोग निघून जाईल श्रध्दा ठेवून माझ्या सोबत चल. त्याप्रमाणे ती बिचारी मनापासून नाही परंतू पतिच्या इच्छेनुसार स्वत:च्या मनाविरुध्द बाबांच्या दर्शनासाठी आश्रमी निघाली. आश्रमात भजन चालू होते, डॉ. सौ. आशाने आश्रमात पाऊल ठेवले आणि काय योगा योग प. पू. बाबांची नजर आणि तीची नजर एक होताच तिच्या दृष्टीत चांगला फरक जाणवू लागला. तात्काळ दोघेही उभयतां प. पू. बाबांच्या चरणां जवळ येऊ लागली तस तशी बाबांची दृष्टी क्रोधीत होत गेली. दोघांनी प. पू. बाबांच्या चरणांचें दर्शन घेतानां तिच्याकडे पाहून प. पू. बाबा एकदम मोठयाने गरजले बंद कर ती ८० रुपयाची गोळी घेण्याचे, आणि दर गुरुवारी इथे मंदीरात सकाळ संध्याकाळ येत जा. पहा काय चमत्कार होतो तो. अशा तऱ्हेने सौ. आशा समजुन गेली की ही शक्ती कुणीतरी अवलिया असुन वैद्यांचा वैद्य असावा असे अनेक विचार एकदम डोक्यात येऊन गेले. तत्काळ दोघांनीही पुन्हा बाबांचे दर्शन घेतले हलके हलके तिची प. पू. बाबांवर श्रध्दा बसली अशा तऱ्हेने तिने प. पू. बाबांच्या शब्दाला जागून गोळ्या बंद केल्या आणि २ महिन्यांच्या नित्य गुरुवारच्या मंदीराच्या हजेरीनें तिला चांगला गुण आला. आज ती व तिचे पतिराज डॉ. हेबळ्ळी, त्यांचे पुत्र आणि सूना वगैरे संपूर्ण कुटुंब डॉक्टर असुन प्रत्येकाचे निरनिराळे दवाखाने असुन हे संपूर्ण कुटुंब बाबांच्या आश्रमांत वेळेवर हजेरी लावतात व प्रत्येक दत्त जयंती, गुरुपौर्णिमा, महाशिवरात्री अशा उत्सवात त्या प्रामुख्याने भाग घेतात असे हें कुटुंब प. पू. सदानंद सद्‌गुरु रुप झाल्याचा आनंद लुटतात.

www.sadgurusadanandmaharaj.com

सौ. उमाताई नाडीगेर ही बेंगलोर मध्ये प. पू. बाबा असतानां रोज गायन भजनांत दंग होई. ती स्वत: बाबांच्या जीवनातील अद्‌भूत प्रसंगावर गीत रचना करुन स्वत: संगीत चाली लावून स्वर पेटीवर गात असे, तिच्या गीतरचनांचे पुस्तकही तेलगू भाषेत छापलेले आहे. अशी ही सौ. उमाताई नाडिगेर प. पू. बाबा मुंबई, रायापूर, विजापूर करत एका शुभमुहूर्तावर बेंगलोरला आले. भजन गायनादि कार्यक्रम संध्याकाळचा नित्याप्रमाणे प. पू. बाबांच्या समोर चालू होता, आरती आणि प. पू. बाबांचे दर्शन झाल्यानंतर सौ. उमाताई, सौ. पुरोहीत, सौ. जागीरदार, सौ. गंगूताई या स्वयंपाकघरात बाबांना जेवण घालण्यात गर्क असतानां एकाएकी अकस्मात उमाताई चक्कर येऊन जमिनीवर कोसळली, भक्त भगिनी घाबरुन गेल्या काय करावे काही सुचेना, भक्त महिलांची गर्दी वाढू लागली, कुणी वारा घालू लागले, कुणी पाणी घेऊन तिला शुध्दीवर आणण्याचा प्रयत्न करु लागल्या. शेवटी कुणीतरी ही बातमी बाबांच्या कानी घातली आणि प. पू. बाबा तत्काळ उठले आणि स्वयंपाक घरांत आले त्यावेळी सौ. उमा नाडीगेर शुध्द हरपलेल्या अवस्थेत निचेष्ट पडली होती, तीची नजर आकाशात टक लावून पाहातात तशी स्थिर होती, नजर हालेना, शरिराची हालचालही कमी होऊ लागली, हें सर्व पहाताच प. पू. बाबांनी तिच्या कपाळावरुन डोळ्यावरुन आपला हात फिरविला आणि म्हणाले उमा उठ उमा उठ बाळे, असें म्हणताच सौ. उमा तत्काळ उठून बसली. पहाते तर प. पू. बाबा तिच्या समोर, ती भानावर आली आणि बाबांचे चरण धरले. सर्वांनी प. पू. बाबांचा जयजयकार केला अशा तऱ्हेने प. पू. बाबांच्या आशिर्वादाने सौ. उमा नाडीगेर च्या जीवावरचं गंडांतर टळलं ! धन्य ती सौ. उमा आणि धन्य ते भक्त.

डॉक्टर हेब्बल्ली हे बेंगलोर आश्रमात १९९३ साली गुरुपौर्णिमेला हजर राहिले. ते मुळचेच बेंगलोरचे. बाबांचा आश्रम बाबा तिथे असेपर्यंत तुडुंब सतत भरलेला असे. गुरुपौर्णिमेनंतर आठव्या दिवशी नित्याप्रमाणे संध्याकाळी भरदरबारात भजन चालू असता परम पूज्य बाबा डॉक्टरांना तू एक भजन बोल असे म्हणाले. त्यावर डॉक्टर बोलले, बाबा मी दातांचा डॉक्टर, मला भजन वगैरे काही माहीत नाही. त्यानंतर पुढील संवाद झाला.

बाबा : माझी दाढ दुखतेय ! बघ जरा.

डॉक्टर : इथे नको बाबा ! आतल्या खोलीत तपासल्यानंतर पाहू काय झाले तें.

भजनानंतर बाबा भक्तांसह आपल्या खोलीत गेले. मागुन भक्तांना येत असलेले पाहून सर्वांना बोलले, इथं कुणी नको फक्त डॉक्टर असू द्या. बाकीच्यांनी इथं राहू नका. त्याप्रमाणे सर्व बाहेर निघाले, फक्त डॉक्टर होते. बाबा डॉक्टरांना बोलले दरवाजा बंद कर, डॉक्टरांनी दरवाजा बंद केला बाबाजवळ आले व म्हणाले, ''बाबा, पाहू तुमची दाढदुखी''. बाबांनी ही पहा असे म्हणून तोंड उघडले.



www.sadgurusadanandamaharaj.com

त्याबरोबर बाबांच्या मुखात सुवर्णाच्या गोल कडयामध्यें वर्तुळाकार अशी पृथ्वी फिरत असलेलें, ब्रम्हांड बाबांच्या मुखात पाहताच, डॉक्टर थोडावेळाने भ्रमिष्ट अशा अवस्थेतून शुध्दीवर आले. तेव्हा त्यांचा आपल्या डोळयांवर विश्वासच बसेना ! तात्काळ ते म्हणाले बाबा मला क्षमा करा. मी चुकलो, असे म्हणून त्यांनी बाबांचे पाय धरले. बाबांनी डॉक्टरांना उठवून आशिर्वाद दिला व म्हणाले तुझे कल्याण होईल :

गुरुंनी वदन उघडले म्हणे पहा दंत दुखी ।
पाहू जाता डॉक्टरांना दिसले ब्रम्हांड मुखी ।।

बेंगलोरचे वकील नाईक आर. एम. हे बाबांचे थोरभक्त बेंगलोरच्या आश्रमात दर सोमवार गुरुवार संध्याकाळी भजन आरतीच्या वेळी बाबांचे दर्शन घेऊन ते एका बाजूला डोळे मिटुन नामस्मरणांत दंग असत. त्यानंतर त्यांना भानच रहात नसे. श्रध्दा ठेवून ते नामात तल्लीन होत. खरी श्रध्दा ही अत्यंत सुक्ष्म व तरल अशा आत्म्याच्या अनुभवावर आणि शुध्द अंत:स्फुर्तीकडून मिळणाऱ्या आदेशावर अधिष्टीत असते. खरी श्रध्दा हा दिव्यदृष्टीचा किंवा जागृतीचा प्रकार आहे हें श्रीयुत नाईक यांना आलेल्या अनुभवावरुन स्पष्ट होते. भजन संपल्यानंतर ''दयाघन दत्तराज मुर्ती, आरती जय जय त्रैमुर्ती'' ही सुरु होताच. श्रीयुत वकिल नाईक यांच्या अंगात संचार सुरु झाला, बसल्या जागीच ते थरथरु लागले, प्रकार वाढत गेला अन् ते बसल्या अवस्थेतच अक्षरशा वर खाली उडत राहीले. हा प्रकार बाबांच्या नजरेतुन सुटला नाही. त्यांनी बाजुला असलेल्या श्री. डॉ. वझीरकर यांच्या दृष्टीत हा प्रकार दिसला. डॉक्टर म्हणाले, ''बाबा, वकीलनाईक पहा कसे थरथरताहेत !'' ते ऐकुन बाबा म्हणाले, ''मला माहीत आहे, ते सारं ?'' ''असे कां करतात ते ?'' पुन्हा डॉक्टरांनी बाबांना प्रश्न केला. तेव्हा बाबा म्हणाले, ''जा ! जाऊन त्यांनाच विचार''. डॉक्टर श्री. वकील नाईक यांच्याकडे गेले व म्हणाले - बाबा समोरुन तुम्हाला पाहात आहेत, तुम्ही असे काय करता ? शांत बसा ! तरीही वकील थरथर उडतच राहीले व म्हणाले, बाबांनाच विचार ! त्यांना सर्व काही माहीत आहे ! त्यांनीच हे निर्माण केले आणि निवारणही तेच करणार ! मी काहीच करु शकत नाही. त्याप्रमाणे डॉक्टर प. पू. बाबांपाशी आले आणि बाबांना सर्व वृत्तांत निवेदन केला त्यावर प. पू. बाबांनी आपल्याकडील विभूती भस्म, डॉक्टरकडे देऊन ते भस्म श्री. वकिलांना लावायला सांगितलं. त्याप्रमाणे डॉक्टरांनी भस्म लावताच वकिल शुध्दीवर आले. हा अद्‌भुत प्रकार बेंगलोर येथील आश्रमांत जमलेल्या हजारो भक्तांनी पाहीला. सद्‌गुरु बाबांनी वकिलांना बोलावुन घेतलं. वकिल प. पू. बाबांच्या चरणी लीन झाल्यावर प. पू. बाबांना त्यांनी ॐकार रुपांत कृष्ण आणि गजाननाचं रुप पाहील्याचं सांगितलं ! नंतर बाबा बोलले नाईक तू जज्ज होणार, तु दर सोमवार-गुरुवार मंदिरात ये ! तु लवकर जज्ज होणार असा आशिर्वाद दिला ! तद्‌नंतर एका

www.sadgurusadanandamaharaj.com

महिन्यातच नाईक हे बेंगलोर हायकोर्टचे जज्ज झाले. अशीच ३/४ वर्षे गेल्यावर, त्यांची हैद्राबाद येथे बदली होऊन त्यांना जस्टीस ही, वाढीव पदवी देऊन सरकारने त्यांचा योग्य मान राखला. आज सरकारने त्यांना भव्य बंगला, पहारा, सरकारी गाडया, ड्रायव्हर वगैरे यंत्रणा त्यांच्या सेवेसाठी सतत दिली असून हा कशाचा परिणाम. तर त्यांनी आतापर्यंत सद्‌गुरु म्हणजेच सर्व कांही, असाच त्यांच्या मनाचा दृढ विश्वास ! हेच त्यांचे फळ. सद्‌गुरुंशी सदा नम्र !

॥ गुरु परमात्मा परेशू, ऐसा ज्याचा दृढ विश्वासु ॥

प. पू. सदानंद बाबा हे बेंगलोरला आश्रमात वास्तव्य करीत होते. तेथील भक्तांमध्ये सालीमठ हे प्रसिध्द गृहस्थ, सालीमठाच्या आजोबांना शिर्डीला परमपूज्य साईबाबांच्या दर्शनाला जाण्याची इच्छा झाली. ते रोजच्या प्रमाणे प. पू. सदानंद बाबांचे दर्शन घेवून, त्याच दिवशीच्या गाडीने शिर्डीला जायला निघाले. सोबत सालीमठ कुटुंब, दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी ते सकाळी शिर्डीला पोहचले. येणेप्रमाणे त्यांनी स्नान-मुखमार्जन करुन ते साईबाबांचे दर्शन घेवून नास्ता करुन लॉजींगमध्ये विश्रांती घेवून संध्याकाळी आपल्या कुटुंबासोबत भजन-आरतीला साई मंदिरात हजर राहिले, भजन आरतीकडे कान व साईबाबांच्या मुर्तीकडे एक सारखे टक लावून स्थिर चित्ताने पहात राहिले. भजन आरती ऐन रंगात आली असताना सालीमठ यांच्या आजोबांना डोळ्यावर विश्वास बसणार नाही असे दृष्य दिसले. प. पू. श्री साईबाबांच्या समाधीत प. पू. सदानंद बाबा दिसू लागले, पुन्हा साई दर्शन, पुन्हा प. पू. सदानंद बाबा. त्यांचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्यांना वाटलं प्रत्यक्ष माझे सदानंद बाबाच साई असताना, बेंगलोरहून इथे शिर्डीला येण्याचा मुर्खपणा केला त्याबद्दल त्यांना दुखः व पश्चाताप झाला. त्या दर्शनिय आनंदाच्या भरात त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. सहजपणे त्यांचे दोनही हात क्षमायाचनेने एकत्र झाले, म्हणाले बाबा मला क्षमा करा, मी तुम्हाला ओळखू शकलो नाही. माझा साई प्रत्यक्ष बेंगलोरला असताना, मी इथे शिर्डीला आलो. तसं पाहिलं तर गुरु तत्व एकच, सर्व गुरु जरी बाह्यत: स्थुल देहाने वेगवेगळे असले, तरी आतून ते एकच असतात, ज्याप्रमाणे गाईच्या कोणत्याही आचळातून सारखेच शुध्द व निर्मळ दुध येते, त्याप्रमाणे प्रत्येक गुरु मधील गुरुतत्व एकच. पाण्याच्या टाकीला लहान मोठया बऱ्याच तोटया असल्या, तरी प्रत्येक तोटीतून टाकीतलेच पाणी येते. विजेचे दिवे कितीही निरनिराळ्या आकाराचे असले तरी वहाणाऱ्या विजेमुळे निर्माण होणारा प्रकाशच त्यातून बाहेर पडतो. तसेच गुरु बाह्यता निरनिराळे दिसले तरी त्यांच्यातील गुरुतत्व म्हणजे ईश्वरीतत्व एकच असते.

www.sadgurusadanandamaharaj.com

# इंडी मुक्कामात बाबा

विजापूर जिल्ह्यात इंडी हे एक गाव आहे. १९७४ च्या मार्चमध्ये बाबांनी इंडीला भेट दिली. तिथले नानासाहेब पाटील नावाचे बाबांचे भक्त आहेत. त्या गावाचेच प्रसिध्द डॉक्टर कावी हे नानासाहेबांचे मित्र. नानासाहेब कावीना म्हणाले, ''मी सांगितलेले सत्पुरुष येथे आले आहेत. चला त्या सत्पुरुषाचे दर्शन घडवितो'' असे म्हणून बाबांकडे घेऊन गेले.

बाबांचे दर्शन घेऊन डॉ. कावी एका कोपऱ्यात बसले. बाबांनी डॉक्टरांबद्दल चौकशी करुन एक नारळ आशिर्वाद म्हणून दिला. व ''भक्तीने आणि आत्मसंतोषाने याची पूजा कर'' असे म्हणाले, डॉक्टरांना तो शुभ दिवस वाटला. गुरुंच्या सांगण्याप्रमाणे मी करीत असून आपल्याला मन:शांती लाभलेली आहे असे ते सांगतात.

आणखी एकदा बाबा इंडीला गेले होते. डॉक्टरांनी बाबांचे दर्शन घेतले व गळ्यात हार घातला. नंतर ते एका कोपऱ्यात बसले. भक्त लोक शिस्तीने आत येऊन बाबांचे दर्शन घेऊन जात होते. त्यांत स्त्री-पुरुष, म्हातारे, लहान मुले आदींचा समावेश होता. त्यानंतर थोडया वेळाने बाबांनी डॉक्टरांना जवळ बोलावून हसतच त्यांना आपला हात पुढे करण्यास सांगितला. त्यांनी तसे करताच बाबा त्यावर थुंकले. सगळीकडे सुगंध दरवळला. बाबा म्हणाले ''आता तुला दत्ताचा पूर्ण आशिर्वाद झाला आहे. यापुढे तुझं सर्व कांही चांगलं होईल.'' त्या दिवशी आपण कृतकृत्य झालो असे डॉक्टर समजले. बाबांच्या सांगण्याप्रमाणे ते वागतात. परम मंगलदायक गुरु आपल्या कृपा कटाक्षाने सर्व अरिष्टांचा नाश करुन मंगल करतो अशी त्यांची दृढ भावना आहे.

जी. ओ. रुगी नावाचे सरकारी अधिकारी आहेत. ते विज्ञान शाखेचे पदवीधर आहेत. संसारातील प्रत्येक गोष्ट आपल्याला प्रयोग शाळेत सिध्द करता आली पाहिजे असे समजणारे ते गृहस्थ. देवांवर श्रध्दा, भक्ती, हे विषय काही प्रयोग शाळेत सिध्द करता येत नाहीत म्हणून या गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. अशा या विचारांच्या विज्ञान पदवीधरालाही बाबांनी भक्ती मार्गाला लावले.

रुगींना १९६६ मध्ये छातीत दुखणे सुरु झाले. घरातील मंडळींना काळजी वाटू लागली. मोठमोठया नामांकित डॉक्टरांना दाखविण्यात आले. या सर्वांनी वेगवेगळे निदान केले. त्यांच्या कोणत्याही उपचाराला गुण आला नाही. चार-सहा वर्षे अशीच गेली. १९७२ साली त्यांची विजापूरला बदली झाली. त्यांना संगीताची फार आवड. त्यासाठी ते निडगुंदी नावाच्या संगीत शिक्षकाकडे जाऊ लागले. १९७३ च्या फेब्रुवारीस बाबांचे वास्तव्य विजापूरला होते. काही भक्तांबरोबर शिवरात्रीस गाणगापूरला जाण्याचा बेत ठरला.

www.sadgurusadanandmaharaj.com

श्री. एम. आर. पाटील व संगीत शिक्षक यांनी आपल्याबरोबर गाणगापूरला येण्याचा रुगींना आग्रह केला. त्यांच्या आग्रहाखातर रुगीं गाणगापूरला गेले. बाबा आधीच तेथे पोचले होते. संध्याकाळी सहा वाजता संगमावर बाबांची आरती झाली. त्यानंतर भक्त लोक बाबांचे दर्शन घेऊ लागले. बाबांच्या दर्शनाच्या वेळी आपल्या छातीच्या दुखण्याबद्दल विचारावे असे ठरवून रुगींनी बाबांना त्याबद्दल विचारले. लगेच बाबा, ''ते काय करणार ? बरे होईल'' असे म्हणाले. आश्चर्य म्हणजे त्या दिवसापासून ते दुखणे कमी होत जाऊन काही दिवसांतच ते पूर्ण बरे झाले. आता तीन वर्षे होऊन गेली तरी त्यांचे दुखणे पुन्हा आले नाही. बाबांची भक्ती केली तर कोणतीही असाध्य गोष्ट सहजपणे साध्य होऊ शकते अशी रुगींची भावना झाली व त्यांची श्रध्दा वाढत गेली.

१९७५ च्या एका मंगळवारी सकाळी नऊच्या सुमारास रुगी बाबांच्या दर्शनाला गेले. दर्शन झाल्यावर ''एक लहान खडा आण'' अशी गुरुंनी आज्ञा केली. खडा का मागतात हे न कळून त्यांनी सुमारे दोन ग्राम वजनाचा खडा आणून बाबांच्या हातात दिला. बाबांनी तो खडा आपल्या ओंजळीत ठेऊन भक्ताला त्याच्याकडे पाहत राहण्यास सांगितले. तो पहात असतानाच खडा मोठा मोठा होत जाऊन ओंजळ भरण्या इतपत तो खडा मोठा झाला. ते पाहून भक्ताच्या अंगात विद्युत संचार झाल्याप्रमाणे झाले. त्या मोठया खडयाची मूर्ती करुन रुगींच्या हातात देऊन ''तू याची रोज पूजा कर, दगड जसा वाढत जाईल तसा तुझ्या घराण्यातही वाढ होत जाईल'' म्हटले. त्यांच्या आशिर्वादाप्रमाणे आपली सर्वोन्नती चालली आहे असे रुगी सांगतात. कोणी आजारी पडले तर बाबांनी दिलेल्या त्या दगडास त्याच्या अंगावरुन फिरविले असता त्याला बरे वाटू लागते व मनालाही समाधान मिळते. एवढेच नव्हे तर दगडात आता गणपतीची मूर्तीही उमटू लागली आहे. तेव्हापासून आपल्या घरी सुखसमाधान नांदत असल्याचे हे भक्त सांगतात.



www.sadgurusadanandmaharaj.com

# बाबा रायचूर भागात

रायचूर भागात बाबा काही दिवस राहिल्याची शक्यता आहे. त्या भागात त्यांना कुदरी स्वामी असे म्हणतात. त्यांना असे नांव पडायला एक घटना कारणीभूत झाली.

बाबांच्या जवळ देवीने दिलेला एक मोठा घोडा होता. त्याच्यावर बसून फेरफटका मारणे हा बाबांचा छंद. असेच एकदा घोडयावरुन जात असताना रस्त्याच्या बाजूनेच असलेल्या रुळावरुन आगगाडी जात होती. बाबा शर्यतीप्रमाणेच त्या गाडीबरोबरच आपला घोडा पळवू लागले. थोडे अंतर गेल्यावर वाटेत एक नदी लागली. नदीला पूर आलेला होता. नदीवर बांधलेल्या पुलावरुन गाडी धावू लागली घोडयाला नदी ओलांडायला रस्ता नव्हता. पण बाबांनी घोडयावरुन नदीच्या या तीरा वरुन त्या तीरावर उडी मारली व परत आगगाडीच्या बरोबर शर्यत सुरु केली. गाडीतल्या लोकांनी हे पाहिले. त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. मुक्तकंठाने ते बाबांची स्तुती करुं लागले. त्या दिवसापासून त्यांना कुदरी-स्वामी या नावाने हाक मारु लागले. (कानडीत कुदरी म्हणजे घोडा) नदीच्या तीरावर ज्या जागेवर बाबांच्या घोडयाने उडी घेतली तेथे एक चौथरा बांधण्यात आला आहे. त्याला कुदरे-कट्टी असे म्हणतात.



www.sadgurusadanandamaharaj.com

# मुंबईत बाबा

बाबा पहिल्यांदा मुंबईला आले ते १८ फेब्रुवारी १९७२ मध्ये हा केवळ एक योगायोग होता. श्री. गोठे नावाचे मुंबईचे लेखाधिकारी डिसेंबर १९७१ ला सरकारी कामा निमित्त नाशिकला गेले होते. त्यावेळी बाबा नाशिकलाच होते. एका मित्राकडून बाबांचा महिमा त्यांना कळला. ते स्वत: सद्‌वर्तनी, देव पूजा, भजन आदींमध्ये आसक्ती असलेले. पण त्यांची कोणत्याही साधू पुरुषाशी वा संताशी भेट झाली नव्हती. बाबांचा महिमा ऐकताच त्यांच्या दर्शनाची ओढ लागली व एके दिवशी ते बाबांच्या दर्शनास गेले. पहिल्या भेटीतच ते बाबांकडे आकर्षिले गेले व बाबाही त्यांच्या भक्तीवर प्रसन्न झाले. गुरु-शिष्यांची गाठ पडली.

मुंबईला येण्याबद्दल त्यांनी बाबांना विचारले. त्यांच्या आमंत्रणाप्रमाणे बाबा मुंबईला गोठेंच्या घरी आले. सुरवातीला मुंबईस आले की फक्त तीन-चार दिवसच राहात. गोठेंच्या घरी एक सत्पुरुष आल्याची बातमी गोठेंच्या काही मित्रांना व आप्तांना कळतांच ते रोज दर्शनाला येऊ लागले. दहा-वीस मंडळी जमू लागली व भजनही सुरु झाले.

थोड्याच दिवसांत त्या लोकांना बाबांच्या अद्‌भुत शक्तीचा अनुभव आला. त्यांचा महिमा सगळीकडे पसरला. शेकडो लोक नंतर भजन-आरतीला येऊ लागले. भक्तांची संख्या वाढू लागली त्याचबरोबर बाबांचे वास्तव्यही वाढत गेले.

बाबा फेब्रुवारी १९७२ रोजी प्रथम गोठे यांच्या घरी आले, हे आधी सांगितलेच आहे. त्यांच्या घरी २२ मे १९७३ पर्यंत म्हणजे सुमारे दीड वर्षे राहिले. गोठे यांचा परिवार मोठा. आई, पत्नी व पाच मुले बाबासुध्दा त्या कुटुंबातील एक झाले. दिवस रात्र बाबांची सेवा घरातील सर्वांनीच अतीव श्रध्देने आणि भक्तीने केली.

बाबा प्रथम आले तेव्हा गोठे यांचे काही मित्रच केवळ त्यांच्या दर्शनास आले. पुढे बाबांचा महिमा कळल्यावर भक्तांची संख्या वाढत जाऊन शेकडो लोक दर्शनासाठी येऊ लागले. गोठेंचे घर जणू मंदिरच बनले. रोज सकाळी आरती, सायंकाळी भजन व आरती चाले. लोक सकाळपासून रात्रीपर्यंत एकसारखे येतच राहायचे. बाहेर गावचेही भक्त दर्शनास येत. यामुळे संसारातील दैनंदिन जीवनात अडचणी असूनही गोठेंच्या घरची सर्वच मंडळी हसतमुखाने येणाऱ्या प्रत्येक भक्ताचे स्वागत करीत.

सौ. गोठे या बाबांना प्रत्यक्ष परमेश्वर मानून त्यांची सेवा करीत. इंडीला संगाप्पांच्या पत्नीने जसे बाबांना लहानपणी आपल्या मुलाप्रमाणे सांभाळले त्याचप्रमाणे सौ. गोठे यांनीसुध्दां बाबांना मातेचे वात्सल्य दिले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांच्या त्या ताई झाल्या होत्या. त्यांनी केलेली सेवा व केलेले कष्ट पाहिले तर कोणीही त्यांच्या सात्विकतेपुढे नतमस्तक

www.sadgurusadanandamaharaj.com

झाल्याशिवाय राहणार नाही. तसल्या सात्विक देवीची आवश्यकता परलोकातही लागली की काय कोणास ठाऊक, त्यांना १९७४ च्या डिसेंबर महिन्यात एका दुर्घटनेत अकाली मृत्यु आला. घरातील सर्व अनाथ झाली. आपल्या ताईला मुकल्या बद्दल अनेक भक्तही शोकमग्न झाले. परमात्माचे अवतार असलेल्या बाबांनाही तो विरह सहन झाला नाही. ते हमसून रडले. अजूनही गोठे ताईंची 'शांत नागु' ही आरती इतर भक्त म्हणताना बाबांचा नेहमी कंठ दाटून येतो. डोळे पाणावतात.

गोठे यांचा मोठा मुलगा प्रवीण बाबांची सेवा मनापासून करीत असे. १५ ऑगस्ट १९७२ च्या रात्री बाबा झोपले असता प्रवीणला त्यांनी हात चेपायला सांगितले. बाबांची सेवा करण्यास मिळाली म्हणून आनंदाने त्याने पाय चेपण्यास सुरवात केली. काही वेळाने बाबांचा आकार आणि रुप पालटत असलेले दिसले. रामभक्त मारुतीचे रुप त्याला दिसू लागले आणि त्याच्या हाताला झुपकेदार केसाळ शेपटीही लागली. तो अतिशय घाबरला. त्याने हात जोडले. डोळे मिटले. पुन्हा काही क्षणांतच बाबांनी आपले मूळरुप धारण केले.

गोठे यांची ऐंशी वर्षाची वृध्द आई सुध्दा बाबांची भक्त. त्यांचे पूर्व आयुष्य अतिशय हाल अपेष्टात गेल्यामुळे त्यांना आता तरी मन:शांती मिळावी म्हणून गोठे यांनी बाबांची प्रार्थना केली. एके दिवशी घरातील सर्व मंडळी प्रभादेवी येथील सिध्दिविनायकाच्या दर्शनाला गेली होती. वय झालेले-दृष्टी थोडी अधू म्हणून गोठेंच्या आईला घरीच राहावे लागले. सिध्दिविनायकाचे दर्शन मिळणार नाही म्हणून त्यांना वाईट वाटले. बाबा घरीच होते. त्यांनाही या वृध्देचे दु:ख समजले. तिला जवळ बोलावून "तुला सिध्दी विनायकाचं दर्शन मिळालं नाही म्हणून वाईट वाटतंय का ? हे बघ, इथेच तुला दर्शन घडवितो" असे सांगून आपण टेकून बसलेली उशी बाजूला ठेवून त्यांत तिला सिध्दी विनायकाचे दर्शन दिले. त्यानंतर तिला नागराजाचेही दर्शन दिले. घरीच साक्षात परमात्म्याचे दर्शन घडल्याने आपण धन्य झालो असे त्या वृध्देस वाटले असल्यास नवल ते कोणते ?

सौ. गोठे यांनाही बाबांचे अनेक चमत्कार पाहाण्यास मिळाले. १९ डिसेंबर १९७२ रोजी त्यांना बाबांनी बाल रुप दाखविले. बाबांनी त्यांना दिलेल्या रुद्राक्षाचे रुपांतर गुरु-खडयात झाले असून ते त्यांच्या मोठया मुलांने आपल्या अंगठीत बसविले आहे.

त्यांनी एकमुखी रुद्राक्षही श्री. गोठे यांना दिला असून, "तो धारण करणाऱ्यांना कोणत्याही गोष्टीची वाण न पडता जन्म जन्मांतरी त्यांचे कल्याण होते" असे बाबांनी सांगितले आहे.

असेच एके दिवशी दुपारी भक्त जमले होते. सौ. देशपांडे यांनी आपल्याला कसलाच वास येत नाही अशी तक्रार केली. तेव्हा बाबांनी एक मोकळा डबा घेऊन

www.sadgurusadanandamaharaj.com

त्यात पिकदाणीतील थुंकी ओतून ''यात काय आहे ते सांग'' म्हणाले. त्यात तूप तयार झाले होते व सौ. देशपांडे यांना त्याचा सुरेख वास आला. नंतर पुन्हा तो डबा हातात घेऊन आपल्या हाताने तो झाकून व परत काढून, ''आता यात काय आहे ते बघ.'' असे म्हणताच त्यांत तुपाऐवजी तपकीर तयार झाली होती. सर्वांना आश्चर्य वाटले. सर्वांनी ती तपकीर हातात घेऊन व वास घेऊन ती तपकीरच असल्याबद्दलची खात्री करुन घेतली. पुन्हा बाबा ''कोण म्हणतोय, यात तपकीर आहे ? बघा बघा'' म्हणत असतानाच त्यात परत तूप तयार झाले होते. त्या तुपानेच संध्याकाळच्या आरतीतले निरंजन लावण्यात आले.

स्टोव्हमध्ये रॉकेल ऐवजी पाणी घालून पेटविल्याचे उदाहरण मागे सांगितलेच आहे. मुंबईच्या भक्तांनाही हा चमत्कार पाहण्यास मिळाला. एकदा बाबा काही कारणाने चिडले होते. त्यांनी रागाच्या भरात पुढयातील स्टोव्ह हातात घेऊन बाहेर बागेत जाऊन त्यातील तेल ओतून टाकले. नंतर त्यांत नळातील पाणी भरले आणि तेथील एका भक्ताला तो पेटविण्यास सांगितले. बाबा रागात काहीतरी सांगताहेत असे वाटून कोणीच उठेना तेव्हा आणखी चिडून बाबांनी तो स्टोव्ह पुन्हा पेटविण्यास सांगितले. नाईलाजाने एकाने तो स्टोव्ह पेटविला तेव्हा तो व्यवस्थित पेटला. त्याच्यावरच बाबांना चहा करुन देण्यात आला.

एके दिवशी रात्री साडेआठच्या सुमारास गोठे यांच्या घरची मंडळी व सौ. माहुलीकर आणि त्यांचा मुलगा हे गप्पा मारीत बसले होते. जवळच असलेला एक नारळ आणावयास सांगून तो हातात घेऊन बाबांनी त्याला आपली थुंकी लावली व आपल्या नाकावरुन हात फिरवून त्या नारळाला शेंबूड फासल्यासारखे केले. नंतर ''छे, किती दुर्गंध येतो आहे बघ'' म्हणत बाबांनी तो नारळ भक्तांच्या हातात दिला. त्याला घमघम असा सुगंध येत होता. सौ. माहुलीकरांनी नारळाची शेंडी काढून पाहिले तो त्यालाही सुवासिक वास येत होता. ती त्यांनी आपल्या घरात आणून देव्हाऱ्यात ठेवली आहे. दोन तीन वर्षे झाली पण तो सुगंध अजूनही येतो आहे असे सौ. माहुलीकर सांगतात.

आपल्या पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळेच बाबांचे दर्शन घडले. चालणाऱ्यालाच ठेच लागते सामान्य माणसाला सत्पुरुषाचे गूढ आकलन होणे अशक्य आहे. आपले अनंत अपराध बाबांनी पोटात घातले आहेत. आहे या परिस्थितीत बाबांना सोडून दिले तर आपल्याला आत्मीय आधार असा कोणी नाही असे श्री. गोठे सांगतात.

माहुलीकर नावाचे एक सरकारी अधिकारी हे गोठे यांचे मित्र सात्विक वृत्तीचे, हे सद्गृहस्थ ऑफिसच्या वेळे व्यतिरिक्त इतर वेळ ते भजन कीर्तनात घालवितात. बाबा मुंबईला आलेल्या दिवसापासून ते बाबांच्या दर्शनाला येतात एवढेच नव्हे तर रोजच्या भजनाचे ते सूत्रधारच आहेत त्यांच्या धर्मपत्नी व मुलेही बाबांचे भक्त आहेत.

www.sadgurusadanandmaharaj.com

बाबांचे सानिध्य व त्यांची सेवा करण्याची संधी लाभल्यापासून संसारातील अनेक अडचणींचे निवारण झाले असून आपला संसार आनंदात चालला आहे असे ते सांगतात. बाबांचे अनेक चमत्कार त्यांना व त्यांच्या पत्नीला पाहायला मिळाले आहेत.

एका श्रावण मासाच्या पहिल्या सोमवारी गोठेंच्या घरी काही भक्त जमले होते. बाबांनी त्यांना काही गोष्टी सांगितल्या. नंतर बाकीच्या स्त्रियांना सत्यनारायणाच्या फोटोकडेच पाहाण्यास सांगून फक्त श्री. माहुलीकरांना आपल्या तोंडाकडे पाहाण्यास सांगितले. तोंडात बोट ठेवून व तोंड उघडून त्यातील एक लखलखणारा मणी दाखवून तो नेहमीच त्यांच्या तोंडात असतो असे त्यांनी सांगितले.

एके दिवशी दुपारी नेहमीप्रमाणे स्त्री भक्त जमले होते. बाबांनी एक सफरचंद कापावयास सांगून त्याचा एक तुकडा आपल्या मुठीत झाकून सौ. माहुलीकर यांना ''यात काय आहे ?'' असे विचारले. आपल्या समोरच सफरचंदाचा तुकडा हातात घेतल्याचे पाहून ''त्यात काय सांगायचं ? तो तर सफरचंदाचा तुकडा'' असे सौ. माहुलीकर म्हणाल्या. ''सफरचंदच आहे का बघ.'' असे म्हणत सौ. माहुलीकरांना जवळ बोलावून दाखविले तेव्हा त्या सफरचंदाच्या तुकड्याऐवजी तेथे रुद्राक्ष होते. सौ. माहीकरांना आश्चर्य वाटले. बाबांनी मूठ बंद करुन पुन्हा उघडून ''आता काय आहे, बघ'' असे म्हणून त्यांना दाखवताच त्यांच्या मुठीत आधी दाखविलेल्या एका रुद्राक्षाऐवजी तीन रुद्राक्ष दिसले. बाबांनी पुन्हा मूठ बंद करुन उघडल्यावर एकच रुद्राक्ष दिसून आला. ''तुझ्या पतीला दिलेला रुद्राक्ष हाच काय ?'' असे विचारल्यावर सौ. माहलीकरांनी ''होय.'' अशी कबुली दिली. नंतर एक दोन मिनिटांतच मूठ बंद करुन उघडल्यावर ते रुद्राक्ष अदृश्य झाले होते.

बाबा एकदा माहुलीकरांकडे जेवावयास गेले होते. त्यांच्या बरोबर कांही भक्तही होते. बाबा भक्तांसह गप्पा मारीत बसले असताना माहुलीकरांना जवळ बोलावून ''मुक्ती कोण देतो, सांग ?'' असे विचारले. ''बाबा, आपण गुरु, आपणच मुक्ती देऊ शकता'' असं माहुलीकरांनी दिलेले उत्तर ऐकून बाबांनी आपल्या मानेवर हात फिरवून एक वस्तू काढून ती माहलीकरांना आशिर्वाद म्हणून देऊन, ''कोणालाही सांगू नकोस, तुम्ही दोघेही पतीपत्नी याची रोज पूजा करा, तुमचं कल्याण होईल'' असे बाबांनी म्हटले. आशिर्वाद मिळाल्या पासून त्यांची उत्तरोत्तर अभिवृध्दी होत आहे.

स्वत: माहुलीकरांना हृदयविकार होता. त्याची तीव्रता खूपच कमी झाली असून ते आपला दैनंदिन व्यवहार विनासायास करु शकतात. त्यांच्या मुलींचे शिक्षण पुरे होऊन लग्नही होऊन अत्यंत अनुरुप अशी स्थळे त्यांना मिळाली आहेत. एकुलता एक मुलगा एम. एस्सी. झाला असून त्याला उत्तम नोकरी मिळाली आहे. त्याचे

www.sadgurusadanandamaharaj.com

सुशिक्षित आणि सुसंस्कृत मुलीशी लग्न झाले आहे. माहुलीकरांना ऑफिसमध्ये वरची जागा मिळून योग्य वेळीं ते निवृत्त झाले आहेत. हे सर्व बाबांच्या कृपेनेच झाले आहे असे ते समजतात. उरलेले आयुष्य बाबांच्या सेवेतच घालविण्याची त्यांची इच्छा आहे.

सरकारी कॉलनीतील गोठे यांचे घर आता भक्तांना बसायला-उठायला अपुरे पडू लागले. एक स्वतंत्र आश्रम असावा असे भक्तांना वाटू लागले. त्यादृष्टीने निरनिराळे विचार पुढे येऊ लागले. आश्रमासाठी पैसा कसा उभा करावयाचा याचा विचार सुरु झाला. निश्चित रुपरेखा ठरत नव्हती. बाबांना त्यांच्या मनातील ही रुखरुख समजली असावी. त्यांनीच हे कार्य पूर्ण करण्याचे ठरविले. अर्थात्‌च ते स्वत:हून काही न करता भक्तांकडूनच इच्छित कार्य करवून घेत.

याच सुमारास सुंदर शेट्टी या नावाचे गृहस्थ बाबांच्या दर्शनास आले. लहानपणापासूनच साधु संतांचे आकर्षण. यांना वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच साधू संताचा दर्शन घेण्याचा हव्यास. कोणाकडूनही कोणी साधू संत आल्याचे समजताच ते तेथे धाव घेत व आपल्यापरीने त्यांची सेवा करीत. तद्वत ते बाबांच्या दर्शनास आले असताना बाबांच्या दिव्य तेजाने ते दिपले व त्यांना संपूर्ण शरण गेले. गळयात हार घालून त्यांच्या पायावर मस्तक ठेवताच त्यांना दत्त दर्शन घडले. कानात काही विचित्र ध्वनी ऐकू आले. त्यांनी मनातच ‘‘तुम्ही खरोखरच कोण आहात ते सांगा’’ असे विचारुन परत उठून बाहेर आले. त्या दिवशी रात्री सुंदर शेट्टींना स्वप्नात एकदा दत्तात्रय, तर पुन्हा त्याच जागी बाबा, असे दिसू लागले. तेवढ्याने समाधान न होता ‘‘तुम्ही कोण आहात?’’ अस त्यांनी परत विचारताच पुन्हा दत्ताची मूर्ती दिसू लागली. बाबा सामान्य पुरुष नसून ते दत्ताचे अवतार आहेत याची त्यांना खात्री पटली. त्यावेळी बाबा पार्थसारथी यांच्या घरी राहत होते. बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या शेकडो भक्तांना उभे राहाण्यासही जागा नव्हती. शिवाय भक्तलोक केव्हाही बाबांच्या दर्शनाला येत असल्यामुळे प्रापंचिक भक्तालाही अडचण भासत असावी.

या अडचणी लक्षात येताच बाबासाठी एखादा लहानसा आश्रम व प्रवासासाठी एखादी गाडी देऊन तेवढीच त्यांची सेवा करावी असे सुंदर शेट्टींच्या मनात आले.

एके दिवशी बरीच भक्त मडळी बसली होती. त्यांत सुंदर शेट्टी सुध्दा होते. बाबांनी एकदम सुंदर शेट्टीला उद्देशून ‘‘माझ्यासाठी एक लहान झोपडी आणि गाडीची व्यवस्था कर’’ असे सांगितले. आपल्या मनातील गोष्टच बाबांच्या तोंडून ऐकून सुंदर शेट्टीना अतिशय आश्चर्य वाटले. गुरुंच्या आशिर्वादाने हे काम नक्की होणार असा विश्वास वाटला. आपल्या काही गुरुबंधुंच्या साहाय्याने आश्रमासाठी जागा पाहाण्यास त्यांनी सुरुवात केली. अनेक जागा पाहून झाल्या. शेवटी, सध्याची चुनाभट्टीतील जागा बाबांच्या संमतीने निश्चित करण्यात आली. पण ती विकत घेणे

एकट्या सुंदर शेट्टींना अशक्य होते. कुप्पण्णा शेट्टी, वृंदावन शेट्टी व इतर अनेक भक्तांनी त्यांना सक्रीय साहाय्य केले आणि अशा प्रकारे सर्व भक्तांच्या प्रयत्नांनी स्वतंत्र आश्रम उभा राहिला.

१९७२ साली बाबा आल्यापासून भक्तांची संख्या दिवसेंदवस वाढत असून हजारो लोक बाबांचे दर्शन घेण्यास येतात. त्यात सर्व धर्माचे व सर्व भाषिक व सर्व थरांतील लोक आहेत. त्यांत जसे मोठमोठे व्यापारी आहेत तसेच सामान्य कामगारही आहेत. बाबांना सर्व भक्त आपल्या मुलांसारखेच. त्यांना कोणताच भेदभाव नाही. ज्याच्या त्याच्या भक्तींप्रमाणे त्यांना आशिर्वाद देऊन त्यांना भक्तीमार्गाकडे बाबा वळवीत असतात. बाबांना कानडी शिवाय इतर भाषा येत नसली तरी भक्तांच्या मनातली सुखदु:ख ओळखून त्यांना ते मार्गदर्शन करतात. बाबा, कोणी तपस्या, जपतप करुन झालेले संन्यासी नाहीत. योग साधना करणारे योगी नाहीत - पुराण सांगणारे पुरोहित नाहीत. मंत्रतंत्र करणारे मांत्रिक नाहीत. भाषण देणारे पंडितही नाहीत. भक्तांच्या संकटांचे निवारण करणे हेच आपले काम असे मानणारे ते एक अवतारी पुरुष आहेत. साक्षात दत्तात्रयाचे अवतार आहेत. ''गुरु कोठेही असला तरी तो नेहमी भक्तांच्या ठायीच असतो'' असे नेहमी बाबा सांगतात. अशा या देव पुरुषांचे दर्शन मुंबईतल्या शेकडो लोकांनी घेतलेले आहे. त्यांनी केलेले अनेक चमत्कार येथील भक्तांना पाहायला किंवा अनुभवायला मिळाले आहेत. गुरुंच्या आशिर्वादाने दु:खनिवारण झालेले अनेक भाग्यवंत भक्त येथे आहेत. ते सर्व लिहायला शेकडो पाने अपुरी पडतील. त्यातले काही प्रसंगच येथे देणे शक्य आहे.

भक्तांच्या सोयीसाठी चुनाभट्टी येथे नवीन आश्रम सुरु करण्यात सुंदर शेट्टी यांनी खूपच कष्ट घेतले. आश्रमाच्या दररोजच्या व्यवस्थेतही तेच जातीने लक्ष घालतात. एके दिवशी बाबांनी आपल्या खोलीत बसले असताना सुंदर शेट्टीला बोलावून ''तुला काय पाहिजे ते सांग'' असे विचारले. सुंदर शेट्टी म्हणाले, ''बाबा, मला कशाचीही आशा नाही. काही द्यायचेच असेल तर मला मुक्ती द्या.'' ''तुला आणखी तीन जन्म मुक्ती मिळणार नाही. मी सांगेन त्याप्रमाणे वाग. मी तुझ्या पाठीशी आहे. तीन जन्मानंतर मात्र तुला निश्चित मुक्ती मिळेल. सध्या तुझ्या गावी एक व मुंबईला एक अशी दत्त मंदिरे बांध आणि तुझी सर्व संपत्ती तुझ्या बायकोच्या व मुलांच्या नावावर करुन टाक.'' असे बाबा म्हणाले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सुंदर शेट्टीने सर्व व्यवस्था केली.

त्याच्या पडबिद्री येथील मळ्यात अननस, सुपारी व नारळ लावलेले आहेत. तेथल्या अननस किंवा नारळांचा आकारही विचित्रच आहे. अननसाचे आकार फणा काढलेल्या नागाप्रमाणे दिसतात म्हणून त्या जमीनीला त्यांनी 'नागराज इस्टेट' असे नाव दिले आहे.

इथेच बाबांच्या आज्ञेप्रमाणे एक दत्त मंदिर व आश्रम बांधलेला आहे.

www.sadgurusadanandmaharaj.com

१९७४ साली बाबांनी कुपण्णा शेट्टीसह या आश्रमाला भेट दिली. रम्य वातावरणातल्या 'नागराज इस्टेट' मध्ये बाबा खूपच रमले. झाडावर सहज चढणे किंवा नागांच्या बिळांत हात घालून जमलेल्या भक्तांना भिती दाखविणे, आदी बाबांच्या लीला पाहून पडबिद्रीच त्यांचे जन्मस्थळ असावे की काय अशी शंका उत्पन्न झाली.

एकदा बाबा असेच अननसांच्या बागेत भटकत होते. मध्येच ते एका मोठया झाडावर चढले. जरा लांबवर उभे असलेल्या भक्तांना बोलावून आपल्या उजव्या हातातून त्यांनी रुद्राक्षांचा वर्षाव केला. पण त्यातले एकेकच रुद्राक्ष प्रत्येकाला घेण्यास सांगितले. थोडया वेळाने झाडावरुन खाली उतरुन बाबा भक्तांशी गप्पा मारीत बसले व आपल्या मांडीतून नामांकित मोठे शिवलिंग काढून कुप्पण्णा शेट्टी यांस दिले. आणि सुंदर शेट्टीलाही पंचधातूची मूर्ती उत्पन्न करुन देऊन रोज त्याची पूजा करण्यास सांगितले.

एकदा सुंदर शेट्टींच्या स्वप्नात येऊन बाबा म्हणाले, "तू पाच हजार लोकांना जेवण घाल.'' त्याला काही कळेना. मुंबईसारख्या ठिकाणी अनेक नियंत्रणे असताना पाच हजार लोकांना जेवण घालणे म्हणजे अशक्य गोष्ट होती. बाबा आपली परीक्षाच पाहात असतील तर त्यांचीही परीक्षा करण्यास ही संधी चांगली आहे असे मनात आणले. दुसऱ्या दिवशी आरती झाल्यावर बाबांचे पाय चेपीत असताना त्यांनी हळूच विचारले "ते कुठे करायचे ?'' "कोरवारात'' बाबा चटकन् म्हणाले.

आपल्या स्वप्नात खरोखरच बाबांनी येऊन सांगितले याबद्दल त्यांना शंका उरली नाही.

कोरवारच्या पुराण-समाप्तीच्या दिवशी तेथे आलेल्या पाच-सहा हजार लोकांना जेवण घालून सुंदर शेट्टींनी बाबांची इच्छा पूर्ण केली.

बाबांची सेवा करणे आपले परम कर्तव्य आहे असे सुंदर शेट्टी मानतात. गुरुंच्यावर नितांत श्रध्दा आहे आणि बाबांनीही त्यांना अनेक संकटातून वेळोवेळी वाचविले आहे.

गुरुंच्यापाशी त्यांची एकच मागणी आहे, ती म्हणजे, आश्रमात येणाऱ्या सर्व सद्भक्तांना सद्बुध्दी, आयुरारोग्य देऊन बाबांनी त्यांचे रक्षण करावे व आपली सेवा निरंतर स्वीकारावी.

बाबा आश्रमात असताना किंवा भक्तांच्या घरी जातात तेव्हा विशेष बोलत नाहीत. आपल्या गळयातील हारांच्या-फुलांचा वास घेत जमलेल्या भक्तांकडे टकलावून पहाणे ही त्यांची सवय. दिसायला हे कसेतरी वाटले तरी समोर बसलेल्या भक्ताला बाबा आपल्या अंतरंगात डोकावून तर पाहात नाही ना ? असे वाटत राहते.

www.sadgurusadanandamaharaj.com

असेच बसले असतानाच एखादेवेळी त्यांची समाधी लागते किंवा एखाद्या सुदैवी भक्ताला त्यांच्याकडून आशिर्वादही मिळतो. आणि कधी चमत्कारही पाहावयास मिळतात.

मुंबईला आले असता एकदा बाबांनी श्रीमती राव या वयस्कर महिलेच्या घरास भेट दिली. अनेक भक्तांना बाबा तसे नवीनच होत. यथा प्रकारे आरती झाली. बाबा विशेष काही न बोलता फुलांचा वास घेत टक लावून पाहात बसले. कोणीच बोलत नव्हते. एकदम बाबांच्या तोंडातून डोळे दिपविणारा प्रकाश बाहेर पडतो आहे असे श्रीमती रावांना दिसले. त्यांनी घाबरुन खाली मान घातली. परत वर पाहातात तो त्यांना ती ज्योत दिसेना पण बाबांचे असामान्यत्व त्यांना दिसून आले. त्यानंतर त्यांची श्रध्दा उत्तरोत्तर वाढतच गेली. पुढे त्यांच्या घरातील सर्वच मंडळी बाबांची भक्त झाली.

रावांच्या घरी सामान्यत: दर शनिवारी रात्री येऊन काही ठराविक भक्तांच्या संगतीत रात्र घालविणे हा बाबांचा क्रम. बाबांच्या सान्निध्यात किंवा त्यांच्या सेवेत पाच-सहा तास घालविता येताता म्हणून भक्त स्वत:ला धन्य समजतात.

असेच एका शनिवारी भक्तांसहित बाबा रावांच्या घरी बसले होते तो वैकुंठ एकादशीचा दिवस होता. बोलता बोलता राव म्हणाल्या ''आज वैकुंठ एकादशी असूनही मला व्यंकटरमणाच्या दर्शनाला जाता आले नाही.'' त्यांची ती व्यथा ऐकून बाबा म्हणाले, ''इथेच तुला मी व्यंकटरमणाचे दर्शन घडवितो.'' तेथे असलेल्या इतर भक्तांना आपल्याकडे न पाहाण्याची सूचना करुन फक्त श्रीमती रावांना आपल्याकडे पाहाण्यास सांगितले. तेव्हा श्रीमती रावांना बाबांच्या मुखांत सोनेरी रंगाचे, शिवलिंग त्याभोवती फणा काढलेला नाग दिसला. तिने हात जोडले. पुढे ते शिवलिंग अदृश्य झाले.

पुन्हा गप्पा सुरु झाल्या. एकदोन तास असेच गेल्यावर ''तू स्यमंतक मणी पाहिला आहेस काय ?'' असे बाबांनी श्रीमती रावांना विचारले. ''मी फक्त त्याबद्दल पुराणातच ऐकले आहे'' असे सांगितल्यावर बाबांनी ''हा बघ येथेच आहे स्वमंतक मणी'' असे म्हणत हातात एक फूल घेऊन त्यावर बाबा थुंकले. श्रीमती रावनी पाहिले तो त्या फुलात गुलाबी रंगाचा मणी गोल फिरत होता. रावांना झालेला आनंद व आश्चर्य वर्णनातीत आहे. काही क्षणांतच तो मणी अदृश्य झाला.

आणखी एका शनिवारची रात्र. भक्तांबरोबर गप्पा रंगात आल्या होत्या. एकाएकी घरभर खूपच सुवास सुटला. तो येतो कुठून हे काही कळेना. सगळेजण बाबांकडे पाहू लागले. बाबा सुध्दा हसतच ''अरे कुठून येतो आहे हा वास ?'' असे विचारु लागले. तेव्हा भक्त म्हणाले, ''बाबा, हा तुमचाच चमत्कार असला पाहिजे.'' त्यावेळी तेथील एका भक्ताला जवळ बोलावून त्याला आपली मांडी दाखविली. आश्चर्य म्हणजे अत्तरात भिजून काढावी अशी त्यांची मांडी ओली झाली होती व तो सुगंध तेथूनच

www.sadgurusadanandmaharaj.com

येत होता. प्रत्येक भक्ताला बोलावून त्यांच्या शर्टाला किंवा हात रुमालाला त्यांनी तो सुगंध लावला. जवळ जवळ अर्धातास हा कार्यक्रम चालू होता. बाबांनी लावलेला सुगंध पुढे कित्येक दिवस तसाच राहिला असे सारेच भक्त सांगतात.

सप्टेंबर महिन्यातील एका रात्री असेच भक्त बसले होते. कुळकर्णी बाबांना विडा करुन देत होते. राव नावाच्या भक्तांने विचारले, ''विडयात घालण्याची सुपारी बारीक करु का ?'' ''एवढे पुरे आणखी बारीक नको'' असे कुळकर्णी म्हणाले. त्यांचा संवाद ऐकून बाबांनी विचारले ''काय चाललंय ?'' तेव्हा रावनी ''सुपारी आणखी बारीक करु का ? असे विचारीत होतो,'' असे सांगितले तेव्हा बाबा हसले आणि म्हणाले ''अख्या सुपारीचे तुकडे कोणीही करुं शकतो. पण तुकडयांची अख्खी सुपारी कोणी करु शकतो काय ?'' तेव्हा कुळकर्णी म्हणाले, ''बाबा, ते फक्त तुम्हालाच शक्य आहे.'' ती गोष्ट तेवढयावरच थांबली. नंतर थोडया वेळाने कुळकर्णींनी बाबांना एक विडा तयार करुन दिला. बाबांनी पान हातात घेऊन त्यातले अर्धे पान तोंडात टाकून व अर्धेपान मुठीत धरुन ''यात बघ काय आहे'' असे दाखवताच तो त्यांच्या हातात सबंध सुपारी तयार झालेली होती. भक्तांनी बाबांना नमस्कार केला नंतर ती सुपारी एच्. एस्. एस्. राव यांना आशिर्वाद म्हणून दिली.

पुढे काही वेळाने बाबांनी त्या रावांना विचारले ''बघ त्या सुपारीला काहीतरी लागले आहे काय ?'' राव पाहतात तो आधी नसलेले हळद व कुंकू त्या सुपारीला लागलेले होते. सर्वांना अतिशय विस्मय वाटला.

बाबांच्या अनुमतीने श्रीमती राव पशुपतीच्या यात्रेला जाऊन आल्या. पशुपतीच्या मंदिरात देवाचे दर्शन घेत असता त्यांना सगळ्या दिशांना बाबांचाच चेहरा दिसू लागला. यात्रेहून परतल्यावर ''पशुपतीला काय पाहिलंस ?'' असे बाबांनी विचारले असता ''तिथे सगळीकडे आपणच दिसत होतात'' असे म्हणून तेथून आणलेली रुद्राक्षांची माळ आणि पशुपतीची मूर्ती बाबांना देत त्या म्हणाल्या, ''यात फक्त पशुपतीचं दर्शन झालं बाबा, दत्तात्रयाचं झालं नाही'' तेव्हा बाबांनी त्या मूर्तीत रावांना पाहायला सांगितले असता श्रीमती रावांना त्या जागी दत्तात्रयाची मूर्ती दिसली.

चव्हाण नावाचे रोज बाबांकडे येणारे भक्त. काही दिवसांतच त्यांना आशिर्वाद मिळाला होता. नेहमीप्रमाणे बाबांच्या पायावर त्यांनी एक फूल ठेवले. ते उचलून बाबांनी चव्हाणांना देऊन त्याची पूजा करण्यास सांगितले. भक्ताने ते फूल हातात घेतल्याबरोबर त्या फुलाऐवजी सुपारी तयार झाली.

बाबा एकदा त्यांच्याकडे जेवायला गेले होते. जेवण झाल्यावर वामकुक्षी करीत असताना बाबांचा धक्का लागून खिडकीतील थुंकदाणी बाबांच्या अंगावरच पडली. चव्हाण एक फडके घेऊन ते पुसण्यासाठी धावले. तेव्हा बाबांनी त्यांना थांबवून

www.sadgurusadanandamaharaj.com

कपाटातले भारी कपडे आणावयास सांगितले. चव्हाणांनी कपाटातील किंमती कपडे आणले. बाबांनी त्या कपडयांनी आपल्या अंगावर सांडलेली थुंकी पुसली. भारी कपडे खराब होणार असे चव्हाणांना वाटत असतानाच चोहीकडे सुगंध पसरला. कपडयावर थुंकी ऐवजी जणू उत्तर लागले होते. बाबांचा महिमा न जाणून उगाचच आपण कपडयाची चिंता करीत होतो म्हणून त्यांना फार वाईट वाटले.

एके दिवशी दुपारी आरती झाल्यावर चव्हाण, ठाकूर यांच्या गाडीतून बाबा वज्रेश्वरीला जाण्यासाठी निघाले. वाटेत ठाकुरांनी ''बाबा, आज चव्हाण आपल्याबरोबर आहे तेव्हा आपण मोठया महालक्ष्मीला जाऊ या'' ''आज उशीर झाला आहे. पुन्हा कधी तरी जाऊ'' असे बाबांनी म्हटल्यावर सुध्दा ठाकूरांनी आग्रह धरला. मनात नसताही बाबांनी संमती दिली. गाडीने रस्ता धरला. थोडे पुढे गेल्यावर गाडीचे चाक पंक्चर झाले. ते दुरुस्त करुन आणखी पुढे जाता तो ब्रेक बिघडले. बाबांच्या मनांत नसल्यानेच अस होत असावे असे वाटून ''आता महालक्ष्मीला नको जायला. आपण वज्रेश्वरीलाच जाऊ या,'' असे ठाकूर म्हणाले. बाबा ''ठीक आहे'' म्हणाले. वज्रेश्वरीहून परत येताना. आरे कॉलनीतल्या बागेत थोडावेळ विश्रांतीसाठी सगळे जण बसले. ठाकूर व चव्हाण या दोघांनाही एकेक खडा आणायला बाबांनी सांगितले. ठाकूरांनी आणलेला खडा बाबांनी चव्हाणांच्या हाती दिला. आश्चर्य म्हणजे त्या खडयाऐवजी त्यांच्या हातात साडेतीन इंच लांब व दीड इंच उंच देवीच्या पादुका तयार झाल्या.

महालक्ष्मीला जाता आलं नाही. तरी देवीच्या पादुका मिळाल्याने चव्हाणांना अतिशय आनंद झाला.

'सद्‌गुरु विना मुक्ती नाही' असे आपल्या ग्रंथात सांगितले आहे. पण गुरु भेटणे हेही आपल्या पूर्वजन्मीच्या पुण्याईवरच अवलंबून आहे. भिकाभाई नावाचे गृहस्थ गुरु न भेटल्याने सदा चिंतेत होते. पण बाबांची भेट झाली व त्यांची चिंता दूर झाली. गोठे यांच्या घरी कोणी स्वामी आले आहेत असे समजल्यावर आपल्या पत्नीबरोबर ते बाबांच्या दर्शनाला आले. प्रथम दर्शनातच ते बाबांना संपूर्ण शरण गेले.

एकदा गुरुंना त्यांनी आपली व्यथा सांगितली. त्यांच्या परदेशी गेलेल्या मुलाला लग्न होऊन चार वर्षे झाली, तरी संतती नव्हती. ''त्यांच्या नशिबात काय आहे कोणास ठाऊक ?'' तेव्हा बाबांनी सांगितले, ''त्याला या चौदा महिन्यात संतती होईल.'' त्यांचा आशिर्वाद फलद्रुप झाला. गुरु शिष्यांचे संबंध दृढ होत गेले. चुनाभट्टी येथे आश्रम होण्यापूर्वी बाबांचे वास्तव्य काही दिवस भिकाभाईकडेच होते.

त्यांना बाबांची सेवा करण्याची तसेच अनेक चमत्कार पाहण्याची संधी मिळाली.

एके दिवशी रात्री बाबा बोलत बसले होते. भिकाभाई बाबांसाठी पान तयार करीत होते. गुरुंचे लक्ष तेथे पडलेल्या पानांवर गेले. त्यातली चार-पाच पाने मुठीत

www.sadgurusadanandamaharaj.com

घेऊन ''एवढीच पाने रात्रभर पुरणार नाहीत'' असे म्हणून त्यांनी आपली मूठ सोडल्यावर त्यांत भरपूर पाने तयार झाली.

महाशिवरात्रीच्या दिवशी नेहमीप्रमाणे आश्रमात आरती झाली. उपवासाचा दिवस. स्त्रियांची विशेष गर्दी होती. आरती झाल्यावर सर्वांना आश्रमातील आतल्या खोलीतील ''भीमाशंकराचे'' दर्शन घ्यायला बाबांनी परवानगी दिली. श्रीमती भिका आत जाऊन दर्शन घेत असता ते शिवलिंग हलत असलेले दिसले व त्यावर फणा काढलेल्या प्रत्यक्ष भीमा शंकराचे दर्शन त्यांना झाले. त्या फण्यावर बाबांचा चेहराही दिसत होता. श्रीमती भिकांना ते दृष्य पाहणे अशक्य झाले. त्यांचा तोल जाऊन या पडू लागल्या पण इतर महिलांनी त्यांना सावरले.

अगदी अलीकडची म्हणजे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयातील घटना. बाबा आश्रमातच सुंदर शेट्टी, कुपण्णा शेट्टी, रमेश शेट्टी, आदी अनेक भक्तांसहित रात्रभर पत्ते खेळत बसले होते.

भिकांच्या घरी रात्री अकराच्या सुमारास दारावरची बेल वाजली-भिकाभाई घरी नव्हते. त्यांचा दुसरा मुलगा व पत्नी घरात होते. सौ. भिकांनी दार उघडले तो बाबा उभे. ते आत आले तासभर गप्पा मारल्या व नंतर निघून गेले.

दुसरे दिवशी सौ. भिकांनी आश्रमात जेव्हा बाबा आपल्या घरी आल्याचे सांगितले तेव्हा सर्वांना अतिशय आश्चर्य वाटले. बाबा एकाच वेळी आश्रमात व आपल्या घरी कसे असतील ? अवतारी बाबांना मात्र ही गोष्ट सहज शक्य होती.

बाबांच्या दर्शनाला येणाऱ्यांनी आपले सुख दुःख बाबांना सांगायलाच हवे असे नाही. भक्तांची सुखदुःख व त्यांच्या इच्छा बाबा तत्काळ आपल्या अंतर्ज्ञानानेच ओळखतात.

बाळकृष्ण शेट्टी या भक्ताला हा अनुभव आला आहे. ते १९७२ साली एके दिवशी संध्याकाळी बाबांच्या दर्शनाला गोठे याच्या घरी आले. त्यांचे सामान्य रुप पाहून ते कोणी अवतारी पुरुष आहेत, हे मानायला ते तयार झाले नाहीत. तरी पण त्यांनी नमस्कार केल्याबरोबर ''तुझं दुकान तुला परत मिळेल'' अस बाबा म्हणाले. आपल्या मनातील प्रश्न बरोबर ओळखून आशिर्वाद दिल्याचे पाहाताच ते सामान्य पुरुष नाहीत असे त्यांना वाटू लागले. रोज ते बाबांच्या दर्शनाला येऊ लागले.

त्यांच्या एका नातेवाइकाने अन्यायाने त्यांच्या शीव येथील हॉटेलाचा कब्जा घेतला होता. प्रकरण कोर्टात गेले होते. त्या नातेवाइकाने संबंधित लोकांना आमीष दाखवून शेट्टींच्या विरुध्द पुरावा गोळा केला होता म्हणून खटल्याचा निकाल आपल्या बाजूने लागणारच नाही, असे त्यांना वाटत होते. फक्त बाबांच्या शब्दाचा काय तो आधार होता.

www.sadgurusadanandmaharaj.com

एका गुरुवारी खटल्याचा निकाल लागणार होता. त्या दिवशी सकाळी बाबांच्या दर्शनासाठी शेट्टी पार्थसारथी यांच्या घरी गेले. त्यांना पाहिल्याबरोबर ''तुला तुझ्या हॉटेलची चावी आज मिळणार.'' असे बाबा म्हणाले. ''आपलाच आशिर्वाद बाबा,'' असे म्हणत त्यांनी बाबांच्या पायावर डोके ठेविले आणि खरंच खटल्याचा निर्णय शेट्टींच्या बाजूने लागला. त्यांना झालेल्या आनंदाचे वर्णन करता येणार नाही. हे केवळ बाबांच्या आशिर्वादानेच शक्य झाले याची त्यांना पूर्ण खात्री झाली. तेव्हांपासून परम पुज्य बाबांवरील श्रध्दां आणि भक्ती आणखीच वाढत गेली.

एकदा बाबांनी बाळकृष्ण शेट्टीच्या भक्तीवर प्रसन्न होऊन आपल्या गालातून रुद्राक्ष काढून त्यांना आशिर्वाद म्हणून दिला. सुंदर शेट्टी यांच्या पडबिद्री या गावी गेले असताना बाळकृष्ण शेट्टी सुध्दा तिथे गेले होते. तिथे बाबांनी त्यांना एक शंख निर्माण करुन दिला. ते स्वीकारीत असता त्यातून ॐकार ऐकू येत होता.

यांनाच आणखी एक विस्मयजनक अनुभव आला आहे, १९७१ साली त्यांना हृदय विकाराचा झटका आला. होता. बाबांनी त्यांना सिगरेट ओढण्याची मनाई करुन सुध्दा त्याचे व्यसन वाढतच गेले. ६ ऑक्टोबर १९७५ रोजी त्यांना हृदयविकाराचा पुन्हा झटका आला. यावेळी तो खूपच मोठया प्रमाणात असल्याने त्यांना लगेच के. इ. एम्. हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. रोगी वाचणे अशक्यच आहे असा डॉक्टरांनी अभिप्राय दिला. शेट्टी शेवटी बाबांनाच शरण गेले. त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवल्याची बातमी बाबांना सांगायला गेलेल्या भक्ताला ''त्याला काही अपाय होणार नाही, जा.'' असे बाबांनी सांगितले. तेवढयावरच ते न थांबता रोज त्याच्या तब्बेतीची आस्थेने ते चौकशी करीत होते. काही वेळा भक्तांना हॉस्पिटलमध्ये पाठवून किंवा फोन करुन वरचेवर चौकशी करीत. त्यांची ही कळकळ पाहून वाटावे कोणी त्यांच्या घरातीलच आजारी आहेत.

बाबांच्या आशिर्वादाने त्यांची प्रकृती सुधारत जाऊन ते हॉस्पिटलमधून बाहेर पडले. हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले. हे कोणत्या तरी दैवी शक्तीमुळेच शक्य झाले असे त्यांना वाटले असणार. बाबांनी आपल्याला पुनर्जन्म दिला असे शेट्टी समजतात आणि ''ऊर्वरित आयुष्य बाबांच्या सेवेत जावो.'' अशी ते प्रार्थना करतात.

हॉस्पिटलमध्ये असताना घडलेली एक घटना. एके दिवशी संध्याकाळी कोणी एक माणूस शेट्टींना भेटायला आला. त्याला कोठेतरी पाहिल्यासारखे शेट्टींना वाटत होते. गरीब दिसतो म्हणून त्यांनी बायकोला त्याला पाच रुपये देण्यास सांगितले. ते पैसे घेऊन ''शेट्टींना लवकर बरं व्हावं'' अशी प्रार्थना करुन तो निघून गेला. काही दिवसानंतर ''मला शेट्टीने पाच रुपये बक्षिस दिले'' असे बाबांनी सांगितल्याचे ऐकून, त्या दिवशी बाबाच त्या सामान्य माणसाच्या रुपात आले होते याबद्दल

www.sadgurusadanandamaharaj.com

शेट्टीची खात्री झाली. दुर्दैवाने आपण त्यांना ओळखू शकलो नाही, असे ते सांगतात.

गिरिअप्पा एस्. कोटीयन् नावाच्या भक्ताला आपल्या मुलाच्या प्रकृतीविषयी खूप काळजी होती. त्याचे नाव दयानंद. त्याला कित्येक वर्षांपासून छातीत दुखत होते. नामांकित डॉक्टरांनी त्याला तपासले व ऑपरेशन शिवाय दुसरा उपाय नाही असे त्यांचे मत पडले. ऑपरेशन केले तर कदाचित मुलगा दगावण्याचीही शक्यता आहे, असेही डॉक्टरांनी सांगितले होते. ऑपरेशन न करताच कोटीयन् यांनी मुलाला घरी आणले. आता त्याच्या प्रकृतीबद्दल परमेश्वराजवळ प्रार्थना करण्याखेरीज दुसरा कोणताच उपाय नव्हता.

याच सुमारास गिरिअप्पा कोटीयन्, आपल्या एका मित्राच्या सांगण्यावरुन बाबांच्या दर्शनाला आले. बाबांच्यावर पूर्ण श्रध्दा ठेवून त्यांनी एके दिवशी बाबांना आपल्या मुलाच्या हृदयविकाराबद्दल सांगून ''या संकटातून मुक्त करा'' अशी प्रार्थना केली. तेव्हा बाबांनी ''जा, काही काळजी करु नकोस, ऑपरेशनची गरज नाही.'' असे सांगितले.

गुरुंच्या आशिर्वादाने दयानंदची प्रकृती चार वर्षे चांगली आहे. बाबांचीच ही किमया अशी त्यांची खात्री पटली आहे. संकट समयी गुरु विविध रुपांनी स्वप्नात दर्शन देऊन त्यांची चिंता दुर करतात, असे कोटीयन यांचे म्हणणे आहे.

त्यांना बाबांचे अनेक चमत्कारही पाहावयास मिळाले आहेत. एकदा बाबांनी आपल्या उजव्या मांडीतून शिवलिंग काढून त्यांना दाखविले. तसेच एका भक्तांने घातलेला हार आपल्या ओंजळीत घेऊन त्यांत कोटीयन यांना स्यमंतक मण्याचे दर्शन दिले. त्या अभूतपूर्व दर्शनाने आपण धन्य झालो असे गिरिअप्पा सांगतात.

गोविद नारायण सारंग नावाच्या भक्ताला बारा वर्षे पोटदुखीचा विकार होता. मुंबई येथील अनेक मोठया डॉक्टरांना दाखवून आणि हजारो रुपये खर्च करुनही काही उपयोग झाला नव्हता. ''एक्स रे'' काढल्यावर पोटाच्या उजव्या बाजूस एक खडा असल्याचे दिसून आले. दुखणे कमी झाले नाही म्हणून ऑपरेशन करण्याचे ठरले. पण त्यांच्या डॉक्टरांनी ऑपरेशन करण्यास विरोध दर्शवून त्याऐवजी एक नवीन औषध दिले. काही दिवस दुखणे कमी झाल्याप्रमाणे वाटले तरी पुन्हा ते वाढतच गेले. दुखणे असह्य होऊन त्यांना अंथरुण धरावे लागले. अशा चिंतेत असतानाच त्यांच्या एका मित्राने त्यांना बाबांकडे आणले. बाबांना त्यांनी आपली व्यथा सांगून त्यांचा आशिर्वाद मागितला. ''नऊ महिन्यात रोग बरा होईल.'' असा बाबांनी आशिर्वाद दिला. त्या दिवसापासून दुखण्याचा जोर कमी होत होत एक दिवस पोटातील खडा मूत्राशयामार्गे बाहेर पडून त्या दुखण्यापासून पूर्ण मुक्त झाले.

www.sadgurusadanandamaharaj.com

रमेश शेट्टी हे भक्त रोज बाबांचे दर्शन घेऊन आपल्या शक्यतेनुसार ते बाबांची सेवा करतात. त्यांना अनेक अडचणी असूनही बाबांना त्या सांगण्यास ते संकोच करीत. पण बाबांना त्यांच्या अडचणींची कल्पना आली. त्यांची आई वयाच्या तेराव्या वर्षापासूनच आजारी होती. कितीही औषधोपचार केले तरी गुण आला नाही. भक्तावर संतुष्ट होऊन बाबांनी त्यांच्या आईचा रोग सहा महिन्यांतच पूर्ण बरा केला. १९७५ च्या एप्रिल महिन्यात बाबांचे वास्तव्य सासनूरला होते. त्याच वेळी रमेशची बहीण आजारी पडली. आजार वाढतच जाऊन ती वाचण्याची आशाही नाहीशी झाली. आपल्या बहीणीचे रक्षण करा अशी त्याने बाबांना पत्राद्वारे प्रार्थना केली. ''काही काळजी करु नकोस,'' असे बाबांचे उत्तर आले. त्याप्रमाणे त्याच्या बहिणीचा आजार हळूहळू नाहीसा होऊन ती पूर्ण बरी झाली.

नागू धर्मा टेंबूलकर नावाच्या भक्ताला बाबांच्या कृपेमुळेच आपल्या घरात आनंदी वातावरण असून कशाचीही कमतरता नाही असे वाटते.

गेली तीन-चार वर्षे ते नियमितपणे दर्शनाला येतात. त्यांच्या पत्नीला अनेक वर्षांपासून डोकेदुखीचा त्रास होता. कित्येक ठिकाणी उपचार करुन घेतले तरी उपयोग झाला नाही. बाबांच्या दर्शनाला यायला लागल्यापासून त्यांची डोके दुखी कमी होत जाऊन सध्या ते पूर्ण रोग मुक्त होऊन आरोग्य संपन्न झाले आहेत.

स्वत: टेंबूलकरांना डोळ्यांचा विकार होता. रात्रीच्या वेळी डोळे दिपत असत व रस्ता दिसत नसे. बाबांच्या आशिर्वादाने आपणहि रोगमुक्त होऊन आनंदाने संसार करीत आहोत असे ते सांगतात.

सातपुते नावाचे गृहस्थ बाबांचे भक्त आहेत. ते आश्रमाच्या बागेत काम करतात. हे काम करणे म्हणजे एक प्रकारे बाबांची सेवाच करण्यासारखे आहे असे ते मानतात. आश्रमातच बराच वेळ जात असल्याने त्यांना बाबांचे चमत्कार बघायला व अनुभवायला मिळाले आहेत.

एके दिवशी बागेत ते काम करीत असताना, त्यांच्या मागून 'सळ सळ' असा आवाज झाला. ते घाबरुन मागे वळून पाहतात तो पिंपळाच्या झाडावरुन नागदेव बाहेर पडून क्षणार्धात दिसेनासे झाले. ते घाबरुन सात-आठ दिवस कामावर आले नाहीत. तेव्हा बाबा म्हणाले, ''नाग देवता काही करणार नाही, तू घाबरु नकोस.''

नंतर आश्रमात एकदा आरती झाल्यावर बाबा काही भक्तांना उपदेश करीत बसले होते. सातपुते यांना कानडी भाषेचा गंध नसूनही एकाग्रचित्ताने ते बाबांचे बोलणें ऐकत होते. थोडया वेळाने बाबांनी आपल्या तोंडातून विभूती काढून तिथे असलेल्या भक्तांना दिली. सातपुतेनाही विभूतीचा प्रसाद मिळाला. त्यांना अतिशय आनंद होऊन त्यांनी ती विभूती कागदात बांधून घेतली व घरी नेऊन सर्वांना लावली. त्या

www.sadgurusadanandamaharaj.com

विभूतीला एवढा सुगंध येत होता की, विभूती ठेवलेल्या पाकिटाला सुध्दा पुढे चार महिनेपर्यंत वास येत होता. बाबांच्यावर त्यांची पूर्ण श्रध्दा आहे. गुरुंचे नामस्मरण करुन कुठल्याही कामाला सुरुवात केली तर ते निर्विघ्नपणे पार पडते असा त्यांचा दृढ विश्वास आहे.

आपण परीक्षेत पास झालो हेच ते उदाहरणा दाखल सांगतात.

संजीव शेट्टी व त्यांची पत्नी दोघेही बाबांचे भक्त आहेत. सौ. संजीव शेट्टींनी बाबा मुंबईस आल्यावर काही दिवसांतच त्यांचे दर्शन घेतले. प्रथम दर्शनाच्या वेळी आपल्यासमोर साक्षात् परमात्माच बसला आहे असे त्यांना वाटले. आरती झाल्यावर सर्व लोक आपापल्या घरी गेले सौ. संजीव शेट्टींनी आपल्या संसारातली सुखदु:खे बाबांना सांगितली. तेव्हा बाबांनी त्यांना केवळ धीर दिला एवढेच नाही तर आपल्या मुखांतून लखलखीत माणिक त्यांना दाखविले. प्रथमदर्शनातच बाबांचा आशिर्वाद मिळाला त्यांची पूर्वजन्मीची पुण्याई असली पाहिजे.

एकदा संजीव शेट्टींना पोट दुखी सुरु झाली. पुढे फारच त्रास होऊ लागला तरी ते डॉक्टरांकडे न जाता बाबांकडे आले. आणि त्यांना पोटदुखीबद्दल सांगताच ''काही काळजी करु नकोस त्याला काय होतंय ?'' असे बाबा म्हणाले. ते घरी येऊन झोपले. पहाटे पाच वाजेपर्यंत पोट दुखतच होते. त्यानंतर मात्र दुखणे एकदम थांबले. दुसऱ्या दिवशी आश्रमात आल्यावर पहाटे पाच पासून पोटदुखीमुळे बाबा झोपले नाहीत हे कळताच त्यांना आश्चर्य वाटले. भक्ताचे दुखणे त्यांनी आपल्या अंगावर घेतले होते यात शंका नव्हती.

असलेच आणखी एक उदाहरण. आश्रमाच्या वरच्या मजल्यावर एक गुजराती कुटुंब राहाते. घरचे सर्वजण बाबांचे भक्त आहेत. घरातील कर्त्या बाईला बऱ्याच वर्षांपासून कंबर-दुखीचा त्रास होता. औषधोपचाराचा काही उपयोग झाला नव्हता. ''तुझं दुखणं मी दूर करीन'' असे बाबांनी तिला आश्वासन दिले. एके दिवशी बाबांची कंबर एकाएकी दुखू लागली व त्याच वेळेपासून त्या बाईचे दुखणे मात्र कायमचे नाहीसे झाले.

संजीव शेट्टी ज्या जागेत व्यापार करीत असे ती जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात जाण्याची परिस्थिती निर्माण झाली तेव्हा त्यांना बारा हजार रुपयांची अतिशय जरुरी होती. आपल्यासारख्या गरीबाला एवढे पैसे कुठून मिळणार याची ते चिंता करु लागले. बाबांनी भक्ताचे ते संकट ओळखले. त्यांनी भक्तांपैकीच एका श्रीमंत माणसाकडून संजीव शेट्टींच्या अडचणींचे निवारण केले. अनेक वेळा सौ. संजीव शेट्टीं लोकांच्या उपस्थितीत आपले दु:ख बाबांना सांगता येत नाही म्हणून हळहळत घरी येऊन झोपतात, तेव्हां बाबा स्वप्नात येऊन व दृष्टांत देऊन त्यांना धीर दिल्याची उदाहरणे आहेत.

www.sadgurusadanandmaharaj.com

कुटुंबातली मोठी माणसं देवाची किंवा गुरुची सेवा करुं लागल्यावर त्याची लहान मुले सामान्यपणे त्यांचे अनुकरण करतात. पण पटवर्धन कुटुंबाच्या बाबतीत एक मात्र अपवाद आहे.

पटवर्धनांचा मुलगा कुमार हा जवळ जवळ दहा वर्षे आजारी होता. त्याच्या एका मित्राच्या सांगण्यावरुन कुमार एक दिवस बाबांच्या दर्शनाला आला. आरती झाल्यावर बाबांचे दर्शन घेत असताना ''तुझी प्रकृती बरी दिसत नाही. किती दिवस आजारी आहेस ?'' असा प्रश्न बाबांनी विचारला. आपल्याला दहा वर्षापासून बरे नसल्याचे त्याने सांगितल्यावर ''तू चार महिन्यांत बरा होशील. रोज दर्शनाला येत जा.'' असे बाबांनी सांगितले. हे ऐकून त्याला आनंद झाला. डॉक्टरांच्या अनेक दिवसांच्या औषधांनी कांही गुण आला नाही पण गुरुंच्या कृपेने आपण बरे होऊ या दृढ विश्वासाने तो रोज बाबांच्या दर्शनाला येऊ लागला. गुरुवरची श्रध्दा जसजशी वाढत गेली तसतसा त्याचा आजार बरा होत गेला. ''मी एका स्वामींच्या दर्शनाला जातो. त्यांच्या दर्शनाने मला बरे वाटू लागले आहे; तू पण त्यांच्या दर्शनाला चल'' असे सांगून त्याने आपल्या आईलाहि बाबांच्याकडे आणले. अशा प्रकारे मुलाच्यामुळे आईला गुरुंचे दर्शन झाले.

त्या रोज दर्शनाला येऊ लागल्या. दिवसेंदिवस बाबांवरची त्यांची भक्तीही वाढत गेली. पण चार सहा महिने रोज दर्शनाला येऊनही बाबा त्यांच्याशी चकार शब्दही बोलले नाहीत. बाबा बहुधा भक्ताची परीक्षा करीत असावेत. श्री. पटवर्धनांचा साधू-संतांवर तसा विश्वास नव्हता. तरी मुलाची प्रकृती सुधारल्याचे पाहून ते सुध्दा बाबांच्या दर्शनाला अधूनमधून येऊ लागले. मुलाची प्रकृती बरी झाल्यावर बाबांची पाद्यपूजा करण्याचा संकल्प त्यांनी मनात केला होता. चार महिन्यांतच मुलाची प्रकृती सुधारली तेव्हा आग्रह करुन बाबांना आपल्या घरी नेऊन त्यांनी पाद्यपूजा केली. त्यावेळी बाबांनी श्री. पटवर्धनांना आशिर्वाद दिला. अशा प्रकारे कुटुंबातले सगळेजण बाबांचे भक्त झाले.

पटवर्धन एक लॉजिंग चालवित होते. ते त्यांच्याकडून जाऊन प्रकरण न्यायालयात गेले होते. बाबांच्या कृपेने ते परत मिळून त्यांचा व्यवसाय वाढत गेला. पटवर्धनांना ईसबही झाले होते. औषधाने बरे होईना. याबद्दल बाबांना विचारल्यावर ''कांही काळजी करु नकोस'' असे बाबा म्हणाले. हळूहळू ईसब कमी होत होत पूर्ण नाहीसे झाले.

सौ. पटवर्धनांनाही पायाचे दुखणे अनेक वर्षापासून सतावीत होते. बाबांनी ''कुठे दुखते ?'' म्हणून विचारले. दुखण्याची जागा कोणती ते दाखविताच पुन्हा तोच प्रश्न. तीन वेळा असा प्रश्न विचारीत असताना क्रमाक्रमाने आपले दुखणे कमी होत आहे असे त्यांना वाटू लागले. सध्या सौ. पटवर्धन त्या दुखण्यातून पूर्णपणे मुक्त झाल्या आहेत.

www.sadgurusadanandamaharaj.com

रोज आरतीला जायच्या आधी घरी ग्लासामध्ये दिवा लावून जाण्याचा त्यांचा नेम होता. एकदा त्या चुकून दिवा न लावताच आश्रमात गेल्या. त्यांना चुटपुट लागुन राहिली. आरती आटोपल्यावर घरी परतल्या व पाहातात तो ग्लासामध्ये दिवा लागलेला होता. घरातील सर्वांन विचारता कोणीही दिवा लावल्याचे कळले नाही. बाबांनीच दिवा लावून आपला नेम चालू ठेवला असे सौ. पटवर्धनांना वाटले.

बाबांचे दर्शन झाल्यापासून घरातील दुःख कमी झाले आहे. बाबांनी आपल्याला संकटातून वाचविले आहे. वेळोवेळी स्वप्नात दृष्टांत देऊन आपल्याला ते मार्गदर्शन करतात असे सौ. पटवर्धन सांगतात.

शामा शेट्टी नावाचे गृहस्थ आर्थिक अडचणीत होते. शिवाय घरच्या अनेक समस्या त्यांच्यासमोर उभ्या होत्या. यातून आपली सुटका कशी होईल या विवंचनेत असतानाच आपल्या एका मित्राच्या सांगण्यावरुन ते बाबांच्या दर्शनाला आले.

बाबांना आपल्या अडचणी सांगितल्यावर ''तुझं सगळं चांगलं होईल, रोज दर्शनाला ये'' असे बाबा म्हणाले. ते रोज दर्शनाला येऊ लागले. श्रध्दा वाढत गेली. एकेक प्रश्न सुटत गेला.

एकदा ते कुप्पण्णा शेट्टींच्या घरी बाबांनी अनुग्रह केलेल्या शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेसाठी गेले होते. तिथे बाबांनी शामा शेट्टींना विचारले ''तुला आशिर्वाद झाला आहे का ?'' त्यांनी नाही म्हणताच बाबांनी आपल्या गालातून रुद्राक्ष काढून आशिर्वाद म्हणून दिला. असेच आणखी एकदा आश्रमात बाबांनी सुपारीचा एक तुकडा त्यांच्या हातात देऊन परत आपल्या हाती घेऊन पुन्हा शामा शेट्टींच्या हातात देताना त्याची अखंड सुपारी झाली होती. रोज त्याची पूजा करण्यास बाबांनी सांगितले.

शामा शेट्टींची पत्नी आणि कन्या दोघीही बाबांच्या भक्त आहेत. एके दिवशी बाबांनी आपल्या तोंडातून पंचधातूचे शिवलिंग काढून सौ. शामा शेट्टींना दिले. आणखी एकदा एक जांभूळ त्यांच्या हाती देऊन ते जपून ठेवण्यास त्यांना सांगितले. काही दिवसांनंतर त्यांच्या घरी गेले असता त्यांनी ते जांभूळ आणावयास सांगितले. ते सौ. शामा शेट्टींच्य हातात परत देत असताना त्याचे रुद्राक्षात रुपांतर झाले होते. शामा शेट्टींच्या मुलीला बाबांनी रुद्राक्षाचा आशिर्वाद दिला आहे.

श्रीमती कुलू शेट्टी या बाईला क्षय रोग झाला होता. अनेक वर्षे औषधोपचार करुन करुन त्या कंटाळल्या होत्या. शेवटचा उपाय म्हणून डॉक्टरांनी तिचे ऑपरेशन करण्याचे ठरविले. ऑपरेशनच्या आदल्या दिवशी त्या बाबांच्या दर्शनाला आल्या व आपले दुःख त्यांनी बाबांना सांगितले. ''आता पाच महिन्यांत तुझा रोग बरा होईल. तू रोज दर्शनाला येत जा.'' असे बाबांनी सांगितले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे त्या रोज

www.sadgurusadanandamaharaj.com

दर्शनाला येऊ लागल्या. पाच महिने संपण्याच्या आठ दिवस आधी त्यांना एकाएकी ताप येऊ लागला. आठ दहा दिवस झोप लागली नाही. त्यांनी कसेबसे कॉटच्या खाली उतरुन जवळ असलेला गॅस पेटविला व बाबांचे नामस्मरण करु लागल्या. एकदम त्यांना पदराला आग लागल्याचा भास झाला. दचकून त्यांनी मागे वळून पाहिले तेव्हा त्यांना प्रकाशाचे दोन तेजोगोल दिसले. त्यांचे डोळे दिपले. बाबांचे नामस्मरण करीत बाजूचीच उशी घेऊन त्यावर डोके ठेऊन झोपल्या. त्यांना झोप केव्हा लागली ते कळलेच नाही. पण त्या दिवसापासून त्यांची प्रकृती सुधारत जाऊन सध्या त्या क्षय रोगापासून पूर्ण मुक्त झाल्या आहेत.

सौ. कुलू शेट्टीच्या मुलाला शाळा सोडून एक वर्ष झाले. तरी नोकरी मिळाली नव्हती. त्यांना ती एक काळजी लागली होती. एकदा त्या बाबांच्या फोटोसमोर उभ्या राहून ''माझ्या मुलाला कुंठतरी नोकरी मिळवून द्या.'' अशी विनवणी केली. त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. त्याचवेळी सबंध घरभर सुगंध दरवळला. शेजारची मंडळीसुध्दा येऊन विचारु लागली की कोणती उदबत्ती लावली आहे ?

दुसऱ्याच दिवशी मुलाला नोकरी मिळाली. हे सर्व बाबांच्या कृपेमुळेच असे त्या समजतात.

एके दिवशी आश्रमात भजन चालू होते. सौ. शेट्टी हातात हार घेऊन दर्शनासाठी आल्या. बाबा आसनावर दिसले नाहीत. ते बहुधा अजून बाहेर आले नसावेत असे समजून आसनालाच नमस्कार करुन उठून पाहातात तो समोर बाबा बसलेले दिसले. त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. या घटनेविषयी बाबांना विचारल्यावर ''आता तुझी सर्व पीडा नष्ट झाली'' असे ते म्हणाले. परमात्मा स्वरुप असलेले बाबा आपले नेहमीच रक्षण करतात अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे.

अविनाश राऊळ नावाच्या भक्ताला साधू संतांचे भारी आकर्षण. कोणाच्या तरी सांगण्यावरुन ते बाबांच्या दर्शनाला आले व पहिल्या दर्शनातच ते आकर्षित झाले. पुढे एकदा बाबा राऊळ यांच्या आप्तांच्या घरी गेले असताना त्यांना बोलावून एक मणी निर्माण करुन आशिर्वाद म्हणून राऊळना दिला. थोडया वेळानें शेजारच्या खोलीत जाऊन ''तो मणी पहा'' असे बाबा म्हणाले. राऊळनी मणी शेजारच्या खोलीत नेला. त्यात पाहिले तो साक्षांत बाबाच त्या मण्यात दिसले. बाबांनी विचारल्यावर त्यांनी पाहिलेला चमत्कार सांगितला. तो मणी बाबांनी पुन्हा हातात घेऊन त्याला देताना मणी बरोबरच एक रुद्राक्षही तयार झाला होता. बाबांच्या दर्शनाला येऊ लागल्यापासून आपल्या व्यापारातही वाढ झाली आहे असे ते सांगतात.

व्यंकटेश नावाचे भक्त ''बाबांनी आपले दु:ख दूर केले आहे.'' असे मोठया अभिमानाने सांगतात.

www.sadgurusadanandmaharaj.com

त्यांच्या तीन नंबरच्या मुलाला सातव्या महिन्यापासूनच दम्याचा विकार होता. दम्यांमुळे तो मुलगा अगदी कृश झाला होता. कित्येक डॉक्टरांचे उपचार करुनही काही उपयोग झाला नव्हता. त्यामुळे निराश होऊन बाबांच्या दर्शनाला गेले असताना भीतभीतच त्यांनी आपली व्यथा सांगितली. बाबांनी त्यांना धीर देऊन ''तू काही काळजी करुं नकोस. सगळं चांगलं होईल'' असे म्हणाले. त्यामुळे आनंदित होऊन घरी येऊन आश्रमातून आणलेला प्रसाद मुलाला खाण्यास दिला. त्या दिवसापासून मुलाचा दमा कमी होत गेला. आई वडिलांना झालेला आनंद वर्णनातीत आहे.

बाबांना पाहिल्याबरोबर आपल्या अंगात विद्युत संचार झाल्यासारखे झाले व त्या दिवसापासूनच आपल्यात करुणा, प्रीती, वात्सल्य अशा चांगल्या गुणांची वाढ होत आहे असे ते सांगतात.

वारेकर नावाचे भक्त आश्रमांतले दत्त मंदिराचे पूजारी आहेत. बाबांच्या आज्ञेवरुनच त्यांनी पुजेची जबाबदारी स्वीकारली. श्री दत्तात्रेयाचे अवतार म्हणूनच समजलेल्या बाबांच्या आश्रमात दत्तात्रेयाची पूजा करण्याची संधी आपल्याला केवळ पूर्वजन्मीच्या पुण्याईने व बाबांच्या आशिर्वादाने मिळाली असे ते समजतात.

देवाची पूजा ते मनोभावे करतात. त्यामुळे त्यांना मन:शांती मिळाली आहे असे ते सांगतात. बाबांच्या निकट सान्निध्यामुळे आणि त्यांच्यावरील अतूट श्रध्देमुळे वारेकरांना बाबाचे अनेक चमत्कार पहायला व अनुभवायला मिळाले आहेत. बाबांनी त्यांना अनेक संकटांतून वाचविले आहे. त्यातील कांही किस्से खाली नमूद केले आहेत.

वारेकरांचा मुलगा चंद्रहास हा लहानपणापासूनच मंदबुध्दीचा होता. तो वेडयाप्रमाणे वागायचा व लहान सहान गोष्टींवरुन चिडून लोकांना त्रास द्यायचा. यामुळे घरचे सर्वजण अगदी वैतागलेले होते. याला कसे सुधारायचे ही त्यांना काळजी होती. याच सुमारास श्री. सदानंद महाराजांचे वास्तव्य मुंबईत असून ते आपल्या अद्‌भुत शक्तीनी भक्तांचे कोणतेही दु:ख निवारण करु शकतात, म्हणून त्यांच्या दर्शनास जाण्याविषयी एका मित्राने सल्ला दिला.

चंद्रहासची आई सौ. निर्मलाताई ही रोज मुलाला घेऊन बाबांच्या दर्शनासाठी येऊ लागली. एके दिवशी त्यांनी चंद्रहासच्या संबंधीचे दु:ख बाबांना सांगून त्यांचा आशिर्वाद मागितला. तेव्हा बाबा आशिर्वाद देऊन म्हणाले, ''तू रोज माझ्या दर्शनाला येतेस, तुझ्या पतीला पण दर्शनाला यायला सांग. सगळं चांगलं होईल.'' त्यानंतर श्री. वारेकर बाबांच्या दर्शनाला येऊ लागले. बाबांच्या आशिर्वादाने चंद्रहास सुधारु लागला आहे. त्याच्यातला पोरकटपणा व रागीटपणा नष्ट होऊन तो आपल्या शिवणकामातही लक्ष घालू लागला आहे.

www.sadgurusadanandmaharaj.com

स्वत: वारेकरांनाही बऱ्याच वर्षांपासून मुळव्याधीचा त्रास होता. वरचेवर रक्त पडून अशक्तपणा येऊ लागला. खूप त्रास व्हायचा त्यांना उठणेही अवघड व्हायचे. एकदा बाबांना त्यांनी या आपल्या रोगाबद्दल सांगितले तेव्हा ''सगळं चांगलं होईल. काळजी करु नकोस.'' असा बाबांनी आशिर्वाद दिला. त्याप्रमाणे रक्त जाण्याचे थांबले.

बाबा मुंबईत असताना रक्त जायचे थांबायचे व बाहेर गेले की पुन्हा सुरु व्हायचे असे सहा महिने चालले. एके दिवशी पहाटे साडेतीनच्या सुमारास रक्त पडण्यास सुरुवात होऊन वारेकर अगदी गर्भगळित झाले डॉक्टरांना बोलावून उपचार केला पण या रोग्याचे आयुष्य कांही तासांपुरतेच असल्याचा अभिप्राय डॉक्टरांनी दिला. सौ. वारेकरांनी बाबांच्या नावाचा जप करण्यास सुरुवात केली. आश्चर्य म्हणजे त्याचवेळी बाबांनी वासुदेव नावाच्या भक्ताला स्वप्नात येऊन ''त्या शिंप्याच्या (वारेकर) घरी सगळे घाबरले आहेत. तू जाऊन त्याला धीर देऊन सांग की काही काळजी करु नकोस तुला बरे वाटेल.'' सकाळीच नाईक वारेकरांच्या घरी जाऊन पाहातात तो वारेकरांची परिस्थिती बिकट झाली होती. सगळेजण चिंतेत होते.

बाबांनी स्वप्नांत येऊन त्यांना सांगितलेल्या गोष्टी वारेकरांना सांगितल्या. सर्वांना थोडा धीर आला. जिवाची आशा सोडलेल्या वारेकरांची प्रकृती सुधारु लागली. थोडयाच दिवसांत ते पूर्ण बरे झाले. बाबांनी आपल्याला पुनर्जन्म दिला असे ते सांगतात.

बाबांच्या आज्ञेप्रमाणे वारेकर रोज दत्ताची पूजा करु लागले. पण एकदिवस अचानक त्यांच्या गुदद्वाराचं अंग बाहेर येऊन त्यांना उठता येईना. त्या दिवशी आपली पूजा चुकणार म्हणून चिंता वाटू लागली. सौ. वारेकरांनी आश्रमात येऊन बाबांना ही हकींकत सांगितली तेव्हा ''त्याला बरे वाटेल. घरी जा आणि मुलाबरोबर त्याला पाठवून दे'' असे बाबा म्हणाले. खरोखरच सौ. वारेकर घरी पोचण्याच्या आत वारेकरांना बरे वाटू लागले होते. आंघोळ करुन वारेकर आश्रमात आले. बाबांनी त्यांना आश्रमातच ठेवून घेतले. पण त्यामुळे ''शिवण्याच्या धंद्याचे काय ?'' अशी काळजी घरच्या इतर मंडळींना पडली. दुसरा मुलगा लहान असून त्याला शिवण कामाचे ज्ञान नव्हते. बाबांना ही अडचण सांगितल्यावर त्यांनी दुसऱ्या मुलाला, हेमंतला ''तू शिवणाचे काम सुरु कर पुढं मी पाहातो.''असं सांगितले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे तो काम करु लागला. आश्चर्य म्हणजे वडिलांपेक्षाही त्याचा धंदा चांगला चालला आहे. हे बाबांच्या कृपेमुळे शक्य झाले, असे ते समजतात.

बाबांनी वारेकरांना जसे अनेक वेळा संकटांतून वाचविले आहे तसेच त्यांना बऱ्याच वेळा आशिर्वाद दिला आहे. बाबांनी एके दिवशी सकाळी आठ वाजताच वारेकरांना बोलावून समोरच्या दत्ताच्या फोटोकडे हात दाखवून एक रुद्राक्ष निर्माण

www.sadgurusadanandamaharaj.com

करुन दिला. पुढे काही दिवसांनी बाबांनी स्वत:च्याच खोलीत स्थापन केलेल्या भीमाशंकराची पूजा करण्याची संधीही दिली. बाबांचे नाव घेत ते रोज भीमाशंकराची पूजा करु लागले. एकदा मध्यरात्री ज्योतिर्लिंगापैकी एका शिवलिंगाचे दर्शन दिले. आणखी एकदा भीमाशंकराकडे हात करुन रुद्राक्ष निर्माण करुन दिला. वारेकरांनी भीमाशंकराची पूजा करायला लागून एक वर्ष पुरे झाल्यावर एकदा बाबांनी शिवलिंगासमोर उभे राहून आपल्या छातीतून आत्मलिंग काढून आशिर्वाद म्हणून त्यांना दिले. त्या लिंगाला आनंदेश्वर असे नाव देऊन कुटुंबांतील सर्वजण त्याची पूजा करतात. घरात रोज संध्याकाळी आरती होते तेव्हा शेजारचे लोकही तेथे जमतात. त्यांनाही आपापल्या भक्तीप्रमाणे फळ मिळाले आहे.

कृष्णाजी वारेकर हे घरुन येताना रोज सकाळी एक हार व फुले घेवून येत आणि बाबांच्या गळयात घालीत असत व बाबांचा आशिर्वाद घेऊन दत्तपूजा आरती रोज करीत. असेच एके दिवशी श्री. वारेकर सकाळी रोजच्या प्रमाणे मंदिरात आले. प. पू. बाबांच्या बैठकीच्या खोलीत जाण्यासाठी हार हातात घेऊन आले. पहातात तो बाबांची खोली बंद होती. कुणीतरी भक्त बाबांच्या दर्शनाला आला असेल असे समजून बंद दरवाजापाशी हार घेऊन उभे राहिले, बराच वेळ गेला तरी, दार कुणी उघडत नाही म्हणून श्री. वारेकरांनी तो हार सद्भावनेने दरवाजाच्या कडीला अडकवुन परत जाण्यासाठी वळले, तोच दरवाजा उघडला. श्री. वारेकर कडीला लावलेला हार घेण्यासाठी परत फिरले. श्री. वारेकरांनी ते दृष्य पाहिले अन् चकीत झालें, त्यांचा आपल्या डोळयावर विश्वासच बसेना. प. पू. बाबांचे ते विराट रुप पाहून अक्षरश: त्यांची बोबडीच वळली. ''अबब ! काय हे बाबा'' अशी किंकाळी मारुनच ते बेशुध्द होऊन दरवाजातच कोसळले. प. पू. बाबांनी पूर्व रुप धारण केले, इकडे भक्त लोक आवाज कसला झाला म्हणुन आतल्या खोलीत धावले. पहातात तो प. पू. बाबा श्री. वारेकर यांना शुध्दीवर आणण्याचा प्रयत्न करताहेत. भक्तगणही बाबांसोबत श्री. वारेकरांना शुध्दीवर आणण्यास मदत करु लागले. थोडयावेळाने श्री. वारेकर शुध्दीवर आले. इकडे तिकडे पहात असताना प. पू. बाबांकडे दृष्टी गेली तोच श्री. वारेकर हात जोडून एखाद्या भ्रमीष्ट माणसाप्रमाणे बरळू लागले. भयंकर ! अवाढव्य ! विराट ! विश्वरुप ! बाबा ! बाबा ! म्हणून प. पू. बाबांचे चरण धरले. प. पू बाबा फक्त हसले, इतर भक्तांना जाण्यास सांगितले. नंतर वारेकरांना म्हणाले, ''तु माझी सेवा चांगली करतोस, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला काय हवं ते माग !'' वारेकर क्षणभर काहीच बोलले नाही. ते त्याच भ्रमीष्टावस्थेत होते. त्यांचा स्वत:वर विश्वासच बसेना. प. पू. बाबांनी त्यांना हलवून शुध्दीवर आणले व म्हणाले, ''तुला काय पाहिजे ते माग !'' तू माझा निष्ठावंत भक्त आहेस, तु काय हवं ते माग. शुध्दीवर आल्यानंतर वारेकरांनी बाबांचे चरण धरुन बोलले बाबा मला काही नको, जीवनाच्या शेवटपर्यंत या चरणांची सेवा घडावी. ''लोक

www.sadgurusadanandmaharaj.com

स्वतः हवे ते मागून घेतात मग तुला का काहीच नको ?'' असे तीन वेळा बाबांनी विचारले. तिसऱ्यांदा विचारल्यावर त्यांचे पाय धरुन वारेकर म्हणाले, ''माझ्या कुटुंबाला, मुलीला जावयाला आणि नातवांना सुखी ठेव, त्यांना तुमच्या चरणापासुन दूर जावु देवु नका, मला धन दौलत काही नको, तुमची चरणसेवा हीच माझी धनदौलत'' अशी इच्छा प्रकट करुन पुन्हा त्यांनी बाबांचे चरण धरले. त्यानंतर बाबांनी आपल्या हातात दोन विडयाची पाने घेऊन त्या सर्वांची नावे विचारली. आपले स्वतःचे नाव पत्नीचे नाव व तीन मुलांची नावे सांगितल्याबरोबर बाबांच्या हातातील दोन पानांची पाच पाने झाली. त्यानंतर मुलीचे व जावयाचे नाव सांगितल्यावर सात पाने तयार झाली. ती सर्व पाने आशिर्वाद म्हणून वारेकरांना दिली. बाबांच्या कृपेने घरातील सर्वजण सुखी आहेत. तसेच बाबांची भक्ती म्हणजे परमेश्वराची भक्ती अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे. तुमच्या कुटुंबाचे कल्याण होईल असा प. पू. बाबांनी आशिर्वाद दिला.

दिनांक ३ फेब्रुवारी १९९४ रोजी श्री. वारेकर यांच्या पत्नी सौ. निर्मलाताई ह्या प. पू. बाबांचे नामस्मरण करत आपल्या पतीची सेवा करीत होत्या. श्री. वारेकरांनी आपली सुकन्या सौ. संगीता सुर्वे (बेबी) हीस प. पू. बाबांच्या हस्ते तिर्थ आणायला सांगितले. ते तिर्थ तिच्याच हातुन प्राशन केले आणि ते सदानंद चरणी विलिन झाले. त्यावेळी ते ७८ वर्षांचे होते.

बाबांनी वारेकरांसारख्या भक्तांना दिलेला आशिर्वाद आणि त्यांना अनेक संकटांतून वाचविल्याची उदाहरणे पाहिली म्हणजे भक्तीचा महिमा किती श्रेष्ठ आहे ते कळून येते. आपल्या पुराणातील गोष्टीसुध्दा परमात्मा भक्तांच्या भक्तीवरच प्रसन्न होतो हीच गोष्ट सिध्द करुन देतात. भक्तांचे रक्षण करण्याचा भार गुरु आपल्या शिरावर घेतात. प्रसंगी भक्तांचे गुलाम होऊनही त्यांची सेवा करतात. बाबांना सर्व भक्त मुलासमान. भक्तांचे समाजातील स्थान, त्यांची आर्थिक परिस्थिती त्यांची जात किंवा त्यांची भाषा याबाबत बाबांना अजिबात स्वारस्य नाही. त्यांना भक्तांच्या भक्तीतच स्वारस्य आहे आणि सदैव त्यांचे कल्याण करण्याची चिंता त्यांना लागलेली असते. या आधीच सांगितल्याप्रमाणे बाबांना कानडीशिवाय इतर भाषांतून बोलता येत नाही. तरी मुंबईसारख्या शहरात सर्व जातींचे, सर्व भाषांचे व विविध स्तरांतील अनेक लोक बाबांची श्रध्दापूर्वक भक्ती करतात. आपली भाषा बाबांना येत नाही म्हणून त्यांना कधीच वाईट वाटत नाही.

जयण्णा शेट्टी हे आपल्या एका मित्राच्या सांगण्यावरुन प्रथम बाबांच्या दर्शनाला आले. त्यांचा प्रथमपासूनच साधू संतांवर विश्वास. रोज येऊन दर्शन घेऊन जात. त्यांना एकच चिंता होती. लग्न होऊन बरीच वर्षे झाली तरी संतती नव्हती. नंतर एके दिवशी बाबांनी ''तुला येत्या चौदा महिन्यांत मुलगा होईल.'' असा आशिर्वाद दिला.

www.sadgurusadanandmaharaj.com

बाबांचा आशिर्वाद खरा ठरला. त्यांना नुकतेच पुत्ररत्न प्राप्त झाले आहे. आता जयण्णा शेट्टी सुखी आहे. पती-पत्नींचा बाबांवर अढळ विश्वास आहे. ते न चुकता दर्शनाला येतात. बाबांनी रुद्राक्षाचा आशिर्वादही दिला आहे.

गुरुवार दि. १९ फेब्रुवारी १९७६ च्या रात्रीची गोष्ट. बरीच भक्त मंडळी आश्रमात बसली होती. बाबांनी कोटीयन व इतर भक्तांना त्या रात्री आश्रमातच राहावयास सांगितले. पत्ते खेळून झाल्यावर सर्वांना झोपावयास सांगून बाबा आपल्या खोलीत गेले. बहुतेक सर्वजण झोपले. कोटीयन्, रमेश शेट्टी व पालघर यांना मात्र झोप येईना. थोडया वेळाने आतले दार उघडले गेले. हे तिघे जण आ वासून तिकडे पाहातच राहिले. दारात मशाल घेतलेली देवी उभी होती. बावरलेल्या त्या तिघानी नमस्कार केला. देवी अदृश्य झाली. काही वेळान बाबा बाहेर येऊन विचारु लागले, ''झोप येत नाही काय ? झोपा आता.'' आणि ते परत आत गेले. या तिघांना झोपच येईना. बाबा आणखी काय चमत्कार दाखवतात, याचा विचार करीत राहिले. त्यांना परत फार वेळ वाट पाहावी लागली नाही. काही क्षणांतच दार उघडले गेले. दारात शुभ्र दाढी असलेले ऋषी हातात प्रज्वलित मशाल घेऊन उभे होते. तिघांनीही त्यांना साष्टांग प्रणिपात केला. परत ते ऋषी अदृश्य झाले. कोटीयन यांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. ते विचार करीत व बाबांचे नामस्मरण करीत असतानाच बाबा आपल्या नेहमीच्या रुपात आले. तिघांनी त्यांच्या पायावर डोके ठेवले. बाबा म्हणाले, ''मला झोपच येईना. कोणी एक म्हातारा माझ्या स्वप्नात आला आणि त्याने मला उठविले.'' त्यानंतर बाबा बाहेरच्या आपल्या आसनावरच येऊन झोपले. गुरुवारची रात्र त्या तिघांना बाबांचे अद्‌भुत रुप पाहायला मिळाल्याने चिरस्मरणीय झाली. विशेष म्हणजे त्यावेळी तिथे अनेक मंडळी असूनसुध्दा त्यांना झोप लागल्याने केवळ तिघांनाच बाबांचे चमत्कार पाहावयास मिळाले. सर्वांनाच देवाची रुपे दिसावित कशी ?

पालघर शेट्टी नावाचे एक सद्‌गृहस्थ आहेत. ते सध्या बाबांच्या सेवेत त्यांच्या बरोबरच राहातात. पालघर शेट्टी बाबांकडे आले आणि त्यांच्या सेवेत राहिले हा योगायोगच होय.

शेट्टींना पहिल्यापासूनच साधू संतांची सेवा करण्याची आवड. सुमारे पंधरा सोळा वर्षापूर्वी सदानंद नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. ते डोबिवली येथे असत. त्यांच्या मृत्युसमयी ते जवळजवळ नव्वद वर्षांचे होते. त्यांची अनेक प्रकारे सेवा शेट्टींनी केली आहे. सदानंद निवर्तल्यावर शेट्टी आपल्या उद्योगात अधिक लक्ष घालू लागले. त्यांचा व्यापारही उत्तम चालला होता. पण १९७३-७४ साली व्यापारात मंदी येऊन त्यांना सुमारे चाळीस-पन्नास हजारांचा फटका बसला ते काळजीत पडले. मार्ग-तर काहीच सुचेना याच सुमारास त्यांच्या एका मित्राने, ''सरकारी वसाहतीत सदानंद महाराज नावाचे एक सत्पुरुष आले आहेत. त्यांच्या दर्शनासाठी चला'' असा आग्रह धरला.

www.sadgurusadanandmaharaj.com

सदानंदांचे नाव ऐकल्याबरोबर त्यांना त्यांनी पंधरा-सोळा वर्षापूर्वी सेवा केलेल्या सदानंद महाराजांची आठवण आली. तरी पण त्यांना बाबांच्या दर्शनास जावे असे वाटले नाही.

काही दिवसांनंतर मित्राच्या आग्रहाखातर ते बाबांच्या दर्शनाला आले. अंगात रेशमी कपडे. बोटात सोन्याच्या आंगठया व तोंडात सिगरेट घेतलेल्या बाबांना पाहून, ''हे कसले स्वामी ?'' असा विचार त्यांच्या मनात आला. बाबांचे दर्शन घेऊन गेले ते पुन्हा तीन-चार दिवस आलेच नाहीत. बाबांनी मात्र शेट्टी न आल्याचे कारण त्यांच्या मित्रांला विचारले. शेट्टींची सेवा वृत्ती व सध्या त्यांना लागलेल्या विवंचनेची कल्पना बाबांना आली असावी. मित्रांच्या आग्रहामुळे पुन्हा एक दिवस ते बाबांच्या दर्शनाला आले. त्या दिवशी बाबांनी त्यांना आशिर्वाद देऊन ''तू रोज दर्शनाला येत जा. तुझं कल्याण होईल.'' असे म्हणाले. बाबांच्या विषयी मग भक्ती उत्पन्न होऊन ती वाढतच गेली. दर्शनाला येऊ लागले व त्यांना सेवा करण्याची इच्छाही उत्पन्न झाली.

एके दिवशी शेट्टींना आपल्या भावाबरोबर बाबांचे दर्शन घेऊन आपल्या व्यापारात झालेल्या नुकसानीबद्दल सांगून आपल्याला या आपत्तीतून सोडवावे अशी प्रार्थना केली. तेव्हा बाबांनी ''तुम्ही काही काळजी करु नका. तुम्ही अमूक एका दिशेला जाऊन पुन्हा व्यापार सुरु कर. दत्ताच्या कृपेने सर्व काही चांगले होईल'' असा आशिर्वाद दिला. पण पुन्हा व्यापार सुरु करण्यासाठी पैसे कुठून आणायचे याच्या काळजीत ते असतानाच घाटकोपरचे मुद्दण्णा शेट्टी नावाचे मोठे व्यापारी त्यांच्याकडे आले आणि त्यांच्या व्यापाराबद्दल व त्यांना झालेल्या नुकसानीबद्दल आस्थेवाईकपणे चौकशी करुन ''तुम्ही काही काळजी करु नका. धाडस करुन पुढे चला. देवाच्या कृपेने सर्व काही ठीक होईल.'' असे म्हणाले. ते केवळ शाब्दिक सांत्वन करुन न थांबता प्रत्यक्ष सहाय्य करण्यास तयार झाले. पालघर येथे सुमारे दीड लक्ष रुपये खर्च करुन त्यांनी एक हॉटेल घेतले होते. ते हॉटेल तुम्हीच चालवा असे शेट्टी बंधूंना सांगून एका शुभ दिनी हॉटेल सुरु करण्यास सांगितले. हॉटेलसाठी लागणारे सामानही एका व्यापाऱ्याकडून त्यांनी उधारीने मिळवून दिले. मुद्दण्णा शेट्टींची विशेष ओळख नसताही त्यांनी आपल्याबद्दल केवळ बाबांच्या प्रेरणेनेच आपुलकी दाखविली याबद्दल शेट्टींची खात्री झाली. त्यांचा व्यापार वाढत गेला व बाबांचा आशिर्वाद खरा ठरला. बाबांचा महीमा त्यांना कळून आला. भक्ती वाढत गेली तशी सेवा करण्याची इच्छाही बळावत गेली.

असेच एकदा आश्रमात बाबांच्या दर्शनाला आले असताना तिथल्या व्यवस्थापकांनी बाबांच्या जेवणासाठी पालघरना भाजी तयार करण्यास सांगितले. ही सेवा करण्यास मिळाल्याने त्यांना फार आनंद झाला. त्यांनी पंधरा वर्षापूर्वी सदानंद महाराजांची सेवा करीत असतानां, त्यांना जी भाजी आवडत होती तीच करुन बाबांना वाढली. बाबांना ती भाजी फार आवडली. ''कोणी केली आहे ?'' असे बाबांनी विचारले. नाव

www.sadgurusadanandamaharaj.com

सांगितल्यावर त्यांना बोलावण्यास सांगण्यात आले. शेट्टी घाबरले. ''कुठे चुकले की काय, तिखट किंवा मीठ जास्त झाले तर नाही ना ?'' असा विचार करीत ते बाबांच्या समोर येऊन उभे राहिले. बाबांनी त्यांना जवळ बसविले व म्हणाले ''स्वयंपाक विशेषत: भाजी छानच झाली आहे. महिन्यातले काही दिवस मी येथे असतो. मी इथं असताना तू आश्रमातच रहाव माझ्यासाठी स्वयंपाक कर. मी विजापूरला गेल्यावर तू पालघरला जा व भावाला धंद्यात मदत कर. मी इथे आलो की परत आश्रमात ये.'' शेट्टी आनंदाने कबूल झाले. असेच कांही महिने गेल्यावर बाबा त्यांना म्हणाले ''यापुढे तू माझ्या बरोबरच रहा तुझ्या भावाला हॉटेल चालवू दे.'' बाबांच्या आज्ञेप्रमाणे बाबांच्या सेवेत ते कायम त्यांच्या बरोबरच असतात.

बाबांच्या निकट राहिल्यामुळे शेट्टींना जशी त्यांची सेवा करण्याची सुसंधी लाभली आहे त्याप्रमाणे बाबांचे अनेक चमत्कार पहायला व अनुभवायलाही मिळाले आहेत. त्यांनी पाहिलेल्या अनेक चमत्कारांपैकी काही चमत्कार खाली नमूद केले आहेत.

एके दिवशी पहाटे पाचच्या सुमारास आंघोळ करुन बाबांच्या दर्शनासाठी शेट्टी त्यांच्या खोलीत गेले. बाबांनी त्यांना भीमाशंकरासमोर बसवून त्याकडे हात करुन ''दे दे'' म्हणू लागले. आश्चर्य म्हणजे असे दोन-तीनदा म्हटल्याबरोबर भीमाशंकरामधून एक मोठे रुद्राक्ष वर उडाले व बाबांच्या हातात आले. त्यांनी तो रुद्राक्ष शेट्टींना देऊन ''तू हा आताच आपल्या गळयात घाल. तुझ सगळं चांगलं होईल.'' असा आशिर्वाद दिला. शेट्टींनी बाबांना नमस्कार करुन रुद्राक्ष आपल्या गळयात घातला.

असेच एके दिवशी पहाटे चार-पाचच्या सुमारास बाबा मोठमोठयाने कण्हत असल्याचे शेट्टींना ऐकू आले. बाबांना बरे नसावे असे समजून, त्यांना काय हवंय ते विचारण्यासाठी ते आत जाऊन पाहातात तो बाबा कण्हत आपल्या कंबरेवर हात फिरवीत होते. शेट्टींनी जवळ जाऊन ''बाबा, कंबर दुखत असेल तर तेल चोळूं काय ?'' असे विचारले. बाबा काही एक न बोलता आपली कंबर चोळतच राहिले. शेट्टींना काय करावे ते समजेना. निमूटपणे ते पहात उभे राहिले. थोडया वेळाने आपण जसे अंगावर डास मारतो त्या प्रमाणे आपल्या कंबरेवर हात मारुन बाबांनी एक शिवलिंग काढले आणि ते एका फडक्यांत बांधून देण्यास शेट्टींना सांगितले. त्याप्रमाणे ते शिवलिंग एका फडक्यात बांधून देऊन शेट्टी बाहेर आले. पुढे त्या शिवलिंगाचे काय झाले ते शेट्टींना समजले नाही.

बाबांनी एकदा पन्नास-साठ भक्तांसमवेत पालघरला भेट दिली. त्यावेळी शेट्टींच्या हॉटेलवरही ते गेले. बाबांची पायधूळ आपल्या हॉटेलला लागल्याने शेट्टी बंधूना फार आनंद झाला. हॉटेलच्या वरच्या मजल्यावरील खोलीत बाबांची यथासांग पूजा करण्यात आली तेव्हा एक चमत्कार घडला. पालघर बंधूंना हॉटेल चालविण्यासाठी ज्या व्यापाऱ्याने त्यांना उधारीने सामान दिले होते तोही बाबांच्या दर्शनाला आला

www.sadgurusadanandmaharaj.com

होता. त्याने बाबांच्या गळयात हार घातला. बाबांनी तो हार काढून बाजूला ठेवल्याबरोबर हाराच्या जागी शिवलिंग दिसू लागले. तिथल्या सर्व भक्तांनी त्याचे दर्शन घेतले. पाच-दहा मिनिटांनी लिंग अदृश्य होऊन त्या जागी पुन्हा हार दिसू लागला. बाबांनी हॉटेलला भेट दिल्यापासून व्यापारातही खूप वाढ झाली.

पालघरहून परतत असताना वाटेत तीनच्या सुमारास सितलादेवीला आले. तिथल्या देवीचे दर्शन घेऊन, शिवदर्शनासाठी समुद्राच्या कडेला असलेल्या शंकराच्या देवळात गेले. ते देऊळ जमिनीपासून आठ-दहा फूट खोल आत आहे. सर्व भक्तांचे दर्शन घेऊन झाल्यावर बाबा आत गेले. देवाचे पूजारी, सुंदर शेट्टी व दोन-तीन लोक फक्त बाबांच्या बरोबर होते.

देवदर्शन झाल्यावर बाबा शिवलिंगावर असलेल्या सर्पावर हात फिरवू लागले. एक-दोन मिनिटांतच त्या जागी लोणी दिसू लागले. थोडयाच वेळात जवळ जवळ अर्धा किलो लोणी तयार झाले. बाबांनी ते हातात घेऊन तिथल्या पुजाऱ्याच्या हातात देऊन ''हे लोणी नंदादीपात घाल. तुझं कल्याण होईल'' असे सांगितले. नंतर तो नंदादीप प्रज्वलित दिसू लागला. पुजाऱ्याला बाबांचा महिमा कळून आला.

१९७४ साली शेट्टी बाबांच्या बरोबर दक्षिण भारताच्या यात्रेवर गेले होते. त्यानंतरची घटना.

पालघरमधल्या हॉटेलात चांदीच्या फ्रेमचे तीन फोटो आहेत. एक पहिल्या सदानंद महाराजांचा, एक नित्यानंद महाराजांचा आणि एक बाबांचा. ते फोटो भिंतीवर जमिनीपासून साधारणपणे आठ फुटांवर लावलेले आहेत. नेहमी प्रमाणे एके दिवशी सकाळी हार घालण्यास गेले असता बाबांच्या फोटोजवळ एक बेडूक बसलेला त्यांना दिसला. बेडूक एवढया उंचावर कसा आला ते कळेना. तरी जास्त विचार न करता शेट्टींनी तो बेडूक उचलला व बाहेर आणून सोडला. दहा पंधरा मिनिटानंतर पुन्हा तो बेडूक तिथेच दिसला. पुन्हा तो तिथे कसा आला याचे आश्चर्य करीत त्यांनी परत त्याला बाहेर आणून सोडले. असे दोन-तीनदा घडले. शेट्टींच्या भावाला याचा अर्थच कळेना. त्या दिवसापासून त्यांचा व्यापारही कमी झाला. शेट्टींच्या भावाने घाबरुन आश्रमातल्या आपल्या भावाला ही हकीकत कळविली. शेट्टींनी बाबांना शरण जाऊन घडलेली हकीकत सांगून पुन्हा व्यापार चांगला व्हावा असा आशिर्वाद मागितला. बाबांनी हसून ''आपण दक्षिण भारताच्या प्रवासात असताना तू मला न विचारताच माझ्या तांब्यातील पाणी प्याला होतास काय ?'' असे विचारले. शेट्टींना काही कळेना. थोडा विचार केल्यावर यात्रेतील एक घटना आठवली. प्रवासात शेट्टींना खूप तहान लागली. प्रवास सारखा चालू होता. थंड पेये कितीही घेतली तरी तहान भागेना. त्यांना गाडीत मागच्या बाजूला बाबांच्या बाजूलाच असलेल्या भांडयात पाणी असल्याचे दिसले. बाबा झोपले होते. त्यांना जाग येऊ

www.sadgurusadanandamaharaj.com

नये म्हणून हळूच ते तांब्यातील पाणी प्याले व तो तांब्या परत त्यांच्या फोटोजवळ बेडूक दिसणं व आपल्या व्यापारात आलेली मंदी या घटनांचा संबंध लक्षात येऊन त्यांना आपली चूक लक्षात आली. बाबांच्या संमती शिवाय त्यांच्या तांब्यातील पाणी प्याल्याबद्दल त्यांनी बाबांची क्षमा मागितली. तेव्हा बाबा हसून ''कांही काळजी करु नकोस. आजपासून तुमचा व्यापार वाढेल.'' असे म्हणाले. आणि त्या दिवसापासूनच त्यांच्या व्यापारात चांगली वाढ झाली. त्या दिवसापासून बाबांच्या कोणत्याही वस्तूला त्यांच्या परवानगीशिवाय हात लावायचा नाही असे त्यांनी ठरविले.

बाबांच्या सान्निध्याचा लाभ झालेले नागेश जोशी यांचे अनुभव विस्मयजनक तसेच अर्थपूर्णही आहेत. ते विविध कलेत निपुण आहेत. ''गीत रामायण'' हिंदीत अनुवाद करण्यात त्यांचा हात होताच. बाबांच्या जीवनावर त्यांनी काव्यही रचलले आहे. गुरुंचे वास्तव्य गोठेंच्या घरी असताना ''सदानंद नावाचे कोणी स्वामी आले आहेत; तुम्ही बाजा पेटी घेऊन भजनाला या,'' असे त्यांना सांगितले गेले. त्याप्रमाणे ते आले.

आसनावर एक व्यक्ती अंगात रेशमी शर्ट व रेशमी धोतर नेसलेली हातात चार-पाच सोन्याच्या आंगठया व सिगारेट ओढीत बसलेली त्यांनी पाहिली. ''हा कसला स्वामी ?'' असा क्षणभर त्यांच्या मनात विचार आला. तरीपण नमस्कार करुन ते बसले. भजनाला प्रारंभ झाला. जोशींनीसुध्दा भजनात भाग घेतला. भजन आटोपल्यावर बाबांनी त्यांना आशिर्वाद दिला व ''कोणाला सांगू नकोस'' असे सांगितले.

त्यांनी दिलेला आशिर्वाद पाहून हा काही सामान्य मनुष्य नव्हे याची खात्री पटली. हीच जोशींची व बाबांची प्रथम भेट. प्रथम दर्शनातच आशिर्वाद मिळालेले पुण्यवंत खरेच.

पुढे ते रोज न चुकता भजनाला जाऊ लागले. गुरुशिष्यांचे संबंध दृढ होत गेले. भक्तांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन बाबा मधूनमधून त्यांच्या घरी जाऊ लागले. असेच एकदा बाबा जोशींच्या घरी गेले होते. तेव्हा केंद्र सरकारच्या मंत्री असलेल्या श्रीमती सरोजिनी महिर्षी आपल्या भगिनीसह तेथे आल्या होत्या. इतर काही भक्त मंडळीही जमली होती. नेहमीप्रमाणे रात्रभर गप्पा व पत्ते खेळणे आटोपल्यावर पहाटे चारच्या सुमारास बाबांनी आपल्या गळयातील हार काढून खोलीत असलेल्या आपल्याच फोटोला घालून ''आता बघ हा पूजा करतो'' असे म्हणाले. सर्व जण कुतूहलाने फोटोकडे पाहू लागले. कही क्षणांत त्या फोटोतून एक शिवलिंग बाहेर आले. बाबांनी ते हातात घेऊन त्या फोटोवरच ठेवले. नंतर आपल्या डाव्या मांडीतून आणखी एक शिवलिंग काढून तेही फोटोवर ठेवले. आपणच काही मंत्र म्हटल्याप्रमाणे पुटपुटले आणि जोशींना एका भांडयातून पाणी आणावयास सांगितले. त्यात त्यांनी त्यांपैकी एक शिवलिंग ठेवताच ते न बुडता पाण्यावर तरंगू लागले.

www.sadgurusadanandmaharaj.com

नंतर तेथील प्रत्येक भक्ताला त्यांनी त्यांत वाकून पाहाण्यास सांगितले. तेव्हा त्या पाण्यातील लिंगात कोणाला बाबा, कोणाला साईबाबा, तर कोणाला बाळकृष्ण दिसला. सर्वांचे पाहून झाल्यावर एक शिवलिंग बाबांनी त्या फोटोवर दाबून अदृश्य केले व दुसरे शिवलिंग जोशींच्या चष्म्याच्या उजव्या काचेवर दाबून अदृश्य केले. बाबांनी केलेला हा चमत्कार पाहून सर्वजण स्तंभित झाले. नंतर काही वेळाने त्या फोटोतूनच मोठे शिवलिंग काढून श्रीमती महिषींना आशिर्वाद म्हणून दिले.

एकदा बाबा विजापूरहून सुंदर शेट्टींच्या गावी पडबिद्रीला जायचे होते. सुंदर शेट्टी मुंबईहून पडबिद्रीला निघाले. ‘‘तू येताना जोशीलाही घेऊन ये’’ असा बाबांचा निरोप मिळाला. आपल्याला का बोलावले ते जोशींना समजेना. ते सुंदर शेट्टींच्या बरोबर विमानाने पडबिद्रीला गेले. बाबासुध्दा दुसरे दिवशी तेथे पोचले.

त्या दिवशी रात्रभर जोशींना आपल्यासमोर बसवून भजन करावयास लावले. रात्रभर बसल्याने हातपाय आखडले होते. हातपाय मोकळे करावे म्हणून पहाटे चारच्या सुमारास जोशी घरच्या अंगणात आले. स्वच्छ चांदणे पडले होते. थंड वाऱ्याने त्यांचे मन उल्हसित झाले होते. सभोवती पाहात असताना त्यांना सुमारे तीस फूट अंतरावर जमिनीपासून सुमारे चार फूट उंच असा फणा काढलेला नाग दिसला. तो पाहाताच त्याच्या अंगात कापरे भरले. त्यांनी डोळे मिटले. रात्रभरच्या जागरणामुळे आपल्याला भास झाला असावा असे वाटून त्यांनी परत डोळे उघडून समोर पाहिले तो परत तेच दृश्य. खात्री करण्यासाठी कसेतरी धीर करुन त्या नागाच्या भोवती अर्धवर्तुळाकारात एकदा उजव्या बाजूला व एकदा डाव्या बाजूला असे फिरले. त्या त्या प्रमाणे नागही त्याच दिशेने फणा काढून वळत होता.

भितीमुळे बाबांचे नामस्मरण करीत व हात जोडीत पावल मागे मागे टाकीत ते आले. तेव्हा कोणीतरी त्यांच्या खांद्यावर हात ठेवल्याप्रमाणे वाटले. पाहातात तो बाबाच हसत उभे होते. त्यांनी परत नागाकडे पाहिले तर तिथे काहीच नव्हते.

या विचित्र अनुभवाचा अर्थच काही दिवसपर्यंत त्यांना लागला नाही. ‘‘जोशींच्या जिवाला धोका असल्यामुळे त्याला पडबिद्रीला बोलावून घेऊन रात्रभर जागरण करायला लावले.’’ असे बाबांनी पुढे काही दिवसांनी सांगितल्याचे ऐकून आपल्याला त्यांनीच पुनर्जन्म दिला याची जोशींना खात्री वाटली.

श्री. नाईक यांच्या घरात एकदा केंद्रीय मंत्री श्रीमती सरोजिनी महिषी आणि इतर भक्त रात्री जमले होते. बाबांनी जोशींना शर्ट काढण्यास सांगितले. तो काढल्यावर त्याने आपले सर्वांग बाबांनी पुसले व शर्ट जोशींना परत केला. पुढे कित्येक दिवस या शर्टाला सुगंध येत होता.

१९७५ च्या दत्तजयंतीस आश्रमात रात्री उशीरापर्यंत काम करुन मंडळी झोपली होती. रात्री अडीचच्या सुमारास बाबांनी पायांनीच जोशींना उठविले. आपल्या

www.sadgurusadanandamaharaj.com

आतल्या खोलीपाशी नेले व हळूच दरवाजातून पाहाण्यास सांगितले. तो त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. आतील शिवलिंग अडीच फूट उंच झाले होते व चमकत होते अत्यंत भक्तीभावाने त्यांनी बाबांचे पाय धरले.

बाबा मुंबईला आल्यावर काही दिवसांतच गोठेंच्या सांगण्यावरुन कुळकर्णी बाबांच्या दर्शनाला आले. प्रथम दर्शनातच बाबांविषयी त्यांच्या मनात भक्ती उत्पन्न झाली. आपल्या व पत्नीच्या आजाराविषयी बाबांना विचारले असता ''तू काही काळजी करु नकोस सर्व काही बरं होईल'' असा आशिर्वाद दिला. त्यांच्या शब्दाप्रमाणे पतिपत्नी आपल्या आजारातून बरे झाले. गुरुंच्यावरील श्रध्दा वाढतच गेली.

रोज सकाळी स्नानानंतर गुरुंचे दर्शन घ्यावे. थोडी सेवा करावी. परत संध्याकाळी दर्शन घ्यावे व त्यांच्या सान्निध्यात काही वेळ घालवावा हा त्यांचा नेहमीचा परिपाठ झाला.

एके दिवशी सकाळी कुळकर्णी पतिपत्नी गुरुंच्या दर्शनासाठी गेले. बाबा झोपलेलेच होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून नमस्कार करुन त्यांच्या पायाशीच बाबा उठण्याची वाट पाहात बसले. दहा-पंधरा मिनिटे झाली तरी बाबा उठले नाहीत. आपल्याला ऑफिसला जायला उशीर होईल म्हणून कुळकर्णींना चिंता वाटू लागली. पण गुरुंच्या दर्शनाशिवाय जाणे त्यांना बरे वाटेना. बाबांचे नामस्मरण करीत ते बसून राहिले. पुढे दहा मिनिटांनी बाबा उठले. ''हे दोघे जण बऱ्याच वेळेपासून तुमची उठण्याची वाट पाहात आहेत'' असे गोठेनी बाबांना सांगितले.

बाबा हसले. आपल्या अंथरुणावरुनच आपला उजवा हात गालावर घासून एक रुद्राक्ष काढून तो कुळकर्णींना दिला व गळ्यात घालण्यास सांगितले. आपण इतका वेळ बसल्याचे सार्थक झाले असं त्यांना वाटले.

असेच आणखी एकदा बाबांची सेवा करीत कुळकर्णी बसले होते. एकदम बाबा म्हणाले, ''त्या खिडकीजवळ काय आहे बघ'' त्यांना काही कळेना. ''बाबा, खिडकीतून सूर्य किरणे येत आहेत.'' असे त्यांनी बाबांना सांगितले ''खिडकीजवळ असलेल्या फोटोत काय दिसतय बघ'' असे पुन्हा बाबा म्हणाले. ते फोटोकडे पाहातात तो आश्चर्याचा धक्काच बसला. बाबांच्या फोटोतून विभूतीचा वर्षाव होत होता. आनंदाने त्यांचे डोळे भरुन आले. विभूती कपाळाला लावून बाबांचे पाय धरुन त्यांनी आशिर्वाद घेतला.

त्यानंतर बाबा कुळकर्णींना घेऊन बाहेरच्या खोलीत येऊन बसले. असाच कही वेळ गेल्यावर ''ते बघ तुझ्या डोक्यात काय पडलय ते'' असे बाबा म्हणाले.

आपल्या डोक्यावर काहीतरी पडते आहे असा कुळकर्णींना भास झाला. काय आहे ते पहावे म्हणून डोक्याला हात लावून पाहातात तो हाताला विभूती लागली. संपूर्ण डोक्यावर विभूती पसरलेली होती.

www.sadgurusadanandamaharaj.com

घरातील सर्व मंडळींना बोलावून बाबांनी ही विभूती दाखविली. बाबांच्या पाया पडून कुळकर्णी घरी परतले.

९ ऑगस्ट १९७५, दुपारची वेळ. आश्रमात नाशिकच्या श्रीमती कुळकर्णी व श्रीमती गोखले या बाबांची सेवा करीत बसल्या होत्या. त्याच वेळी एस्. के. कुळकर्णीसुध्दा आपल्या मुलासह आश्रमात आले. बाबांनी त्यांना प्रेमाने बोलावून जवळ बसवून घेतले. असेच बोलत असताना बाबांच्या चेहऱ्यावरील तेज वाढत असल्याचे त्यांच्या दृष्टीस पडले. आता आपल्याला काहीतरी अद्‌भुत पहायला मिळणार असे सर्वांना वाटले. कुतूहलाने ते बाबांच्याकडे पाहू लागले.

बाबांनी आपल्या पोटावरुन हात फिरवीत त्यातून एक विष्णूशाळीग्राम काढून तो भक्तांना दाखविला. तेथल्या प्रत्येक भक्ताने तो आपल्या हातात घेऊन त्याला नमस्कार करुन परत बाबांच्या हातात दिला. त्या शाळीग्रामाच्या तळाशी एक छिद्र होते व त्यातून सुरेख सुगंध येत होता. बाबांनी पोटावर हात फिरवित परत तो विष्णू शाळीग्राम अदृश्य केला.

असे सुमारे एका तासांत तीन वेळा बाबांनी त्या शाळीग्रामाचे दर्शन दिले.

१९९४ मध्ये ऑक्टोबर महिन्यातील पहिला गुरुवार. नित्याप्रमाणे दत्त आरती झाल्यानंतर प. पू. बाबा आतील स्वत:च्या बैठकीच्या खोलीतुन धावत धावत बाहेर आले व म्हणाले, ''एक ग्लास किंवा कसलेही भांडे द्या'' नंतर बाबांनीच तेथील भांडयामधून स्टीलचा ग्लास उचलला. प. पू. बाबांनी त्या ग्लासच्या तोंडावर धोतराचा शेला सहजपणे फिरविला, तो काय चमत्कार ! त्या ग्लासातून सुगंधी रवाळ तूप भरभरुन वाहू लागले. बाबांच्या चारी बाजूला भक्तानी गर्दी केली. ते रवाळ तूप ग्लास भरुन खाली सांडत होते, ते पडता पडता तळ हातावर झेलून भक्त तिर्थ समजून पिऊ लागले, गर्दी वाढू लागली. बाबांना त्रास होऊ नये म्हणून सौ. महादेवींनी तुपाने भरलेला ग्लास बाबांकडून घेऊन नारायण शेट्टी यांच्याकडे दिला. तोवर बाबांचे धोतर तुपाने अर्धे अधिक भिजून गेले होते. तिथे हजर असलेल्या सर्व भक्तांनी व नंतर सुध्दा आलेल्या सर्व भक्तांनी ते रवाळ तुप तिर्थ म्हणून प्राशन केले, बाबांचे दर्शन घेताना काही भक्तांनी तुपाने भरलेल्या धोतराचाही स्वाद घेतला. धन्य ते भक्त ज्यांनी तुप अमृताप्रमाणे प्राशन करुन जीवनाचा स्वानंद लुटला.

होळी पोर्णिमा - १९८२ मार्च मुंबई चुनाभट्टी येथे श्री. मिनाजी बेळमकर यांच्या घरी पोर्णिमाच्या निमित्ताने पुरणपोळया केल्या होत्या त्यांच्या सौ. महादेवी या पतिराजांना म्हणाल्या आज प. पू. बाबांना पुरणपोळया चुनाभट्टी येथे मंदिरात घेऊन जा. त्याप्रमाणे रात्री दहाच्या दरम्यान श्री. मिनाजी डब्यातून पोळया घेऊन आश्रमात गेले. तिथे सेवका जवळ तो डबा मिनाजीने दिला. प. पू. बाबांनी जेवणाच्या वेळेला आपल्या खोलीत पोळया मनसोक्त खाल्या. त्यानंतर थोड्यावेळाने बाहेर हॉलमध्ये

www.sadgurusadanandmaharaj.com

आले. त्या ठिकाणी हंचाटे, व्ही. एस. नायक आणि सिंदगी तालुक्यातील कोडेकल गांवचे दोन रहिवाशी आले होते. ते कोडेकल गावातील पवित्र विरभद्रय्या मंदिरासाठी उत्सवाचे व मिरवणुकीचे सामान खरेदी करण्यासाठी त्याचवेळी मुंबईला आले होते. त्यानिमित्ताने बाबांच्या दर्शनाला आश्रमात आले. पाचही जणांनी दर्शन घेतल्यावर, 'तुम्ही मुंबईला कशाला आलात' असे त्या दोघांना विचारले, आम्ही मुंबईला विरभद्रय्या मंदिरासाठी उत्सव मिरवणुकीचे सामान खरेदी करण्यास आलो आहोत. पू. पू. बाबा म्हणाले 'कुठे आहे विरभद्रय्या, अरे मी समक्ष आहे विरभद्रय्या ! पहा मी इथे आहे'. अस म्हणुन त्यांनी आपली हृदय उघडे करुन दाखविले व म्हणाले 'पहा विरभद्रय्या'. तोच चमत्कार घडला. त्यांच्या हृदयांत ८ ते १० इंच उंच शिवलिंगाचे प्रत्यक्ष दर्शन त्या पांचही जणांना झाले. ते दृष्य पाहुन सर्वजण आश्चर्यचकीत झाले. दृष्य पहात असताना सद्‌गुरु बोलले 'फक्त पहा ! कुणी हात लावू नका', हें दृष्य जवळ जवळ १० मिनिटे चालू होते. नंतर कुणाचा तरी चुकुन हात लागला तात्काळ ते शिवलिंग अदृष्य झाले. इतक्यांत अंगातले बनियान काढुन त्याचे फाडून तुकडे तुकडे केले व म्हणाले, 'हाच खरा विरभद्रय्या' असे म्हणुन बनियान मांडीखालुन तेंच बनियान जसे होते तसे झाले. 'फाटलेले तुकडे कुठे आहेत दाखवा', असे म्हणुन सर्वांसमक्ष विवस्त्र होऊन दाखविले. नंतर गादी काढुन खाली ठेवली म्हणाले, 'कुठे आहेत बनियानचे फाटके तुकडे?' तिथे फाटकी बनियान वगैरे काही नव्हती. अशा तऱ्हेने प. प. बाबांनी त्या पांचही भक्तांना विरभद्रय्याचे दर्शन देऊन कृतार्थ केले.

श्री. संते दांपत्य भायखळाला राहणारे, हे सद्‌गुरु सदानंद बाबांचे नि:सीम परम भक्त आहेत. त्यांची भक्ती व बाबांवरील श्रध्दा प्रखर व साधीभोळी आहे. हे दांपत्य बाबांचे भक्त झाल्यापासून आजपर्यंत, वर्षातील ३६५ दिवस, सकाळ व संध्याकाळ दोन्ही वेळच्या परम पुज्य बाबांच्या आश्रमात भायखळा स्टेशनवरुन सायन - चुनाभट्टी येथे रोज हजर राहून परम पुज्य बाबांची भजने व आरतीच्या रुपाने सद्‌गुरु बाबांची अव्याहतपणे सेवा करीत आले आहेत. त्रिकाळज्ञानी बाबांनी श्री. संते यांस दोन्ही वेळेस आरतीस येण्यास सांगितले होते. त्यांच्या आज्ञेचे तंतोतंत पालन ते आजपर्यंत करीत आले आहेत.

परम पुज्य बाबांसंबंधातील त्यांना आलेल्या काही मोजक्या प्रचीतींची हकीकत खाली नमूद करीत आहोत.

१९८८ मधील एक घटना श्री. संते हे नेहमीप्रमाणे पहाटे ४ वाजता भायखळा येथे आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी जाण्यासाठी सायन स्टेशन येथे आले. त्यांच्या मुखी नेहमीप्रमाणे बाबांचा नामजप चालू होता. तिथे त्यांना अचानक एका टॅक्सीने जोरदार धडक दिली. परंतु बाबांच्या नामस्मरणाच्या कवचामुळे त्यांना कोणत्याही प्रकारे इजा झाली नाही.

www.sadgurusadanandmaharaj.com

तसेच त्यांचा दुसरा अनुभव असा - एके दिवशी संध्याकाळी ५ वाजता आपले व्यवसायाचे काम आटोपून घरी जात असता वाटेत एका जुन्या इमारतीत दुरुस्तीचे काम चालू असता, एका कडियाकडून काचेची खिडकी निसटून ती श्री. संते ह्यांच्या नेमकी पुढ्यात पडली. अगदी थोड्या फरकाने श्री. संते हे त्या प्राणघातक अपघातातून केवळ सद्‌गुरु बाबांच्या कृपेने ते वाचले. ह्या चमत्काराचा सज्जड पुरावा म्हणजे दुसऱ्या दिवशी आश्रमात उपस्थित असलेल्या भक्तांस सद्‌गुरु बाबांनी अचानकपणे सांगितले की आम्ही काल भायखळ्याच्या एका भक्ताला त्याच्या डोक्यावर कोसळणाऱ्या खिडकीपासून वाचविले. त्यावेळेस तिथे स्वत: श्री. संते हजर होते. बाबांचे हे बोल ऐकून श्री. संते हे अक्षरश: अचंबित होऊन त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले, रोमांचित होऊन त्यांनी बाबांचे चरण धरले. धन्य ते संते आणि त्यांचे कुटुंबिय.

घाटकोपरला राहणारे श्री. वसंत सावंत हे परम पुज्य बाबांचे निसीम भक्त. त्यांची सद्‌गुरुंवर अपार श्रध्दा. बाबांच्या कृपा प्रसादाचे बरेच अनुभव घेतले आहेत. आता पर्यंत आलेल्या अनुभवा पैकी एक अनुभव, १९८१ साली गुढीपाडव्याच्या दिवशी संध्याकाळी ४ वाजता, घाटकोपरहून बोरीबंदरला येत असताना, त्यांच्या खिशात लग्नाचे आहेर पाकीट, रेल्वे पास, बाबांचा फोटा व तीस रुपये अशी रक्कम होती. गाडीत गर्दी नव्हती. ट्रेन मध्ये चढल्यावर विद्याविहार रेल्वे स्टेशन आले. त्यानंतर सहज त्यांचे हात मागच्या पॉकेटकडे वळले. पाहतात तर पाकीट गायब. काय करावे काही सुचतच नव्हते. पाकीटच हरवल्यामुळे तिकीट तपासनीसाच्या भीतीने ते कुर्ला स्टेशनवर उतरले. योगायोगाने ऐंशी पैसेच फक्त त्यांच्या जवळ होते. पाठीमागुन रेल्वे लाईन ओलांडून परत घरी जाण्यासाठी सुटे चाळीस पैसे देऊन पुन्हा रेल्वे तिकीट काढले. गाडीमध्ये चढले. मधल्या पॅसेजमध्ये उभे असताना त्यांना पायाखाली काहीतरी हिरवट रंगासारखी कागदाची गोल चुरगुळी दिसली. पैश्यासारखे काहीतरी वाटले म्हणून मागचापुढचा विचार न करता चुरगुळी गुपचुप खिशात टाकली. घाटकोपर स्टेशन येताच उतरुन थोडे अंतर चालत गेल्यावर, खिश्यातून चुरगुळी बाहेर काढली आणि पाहतो तर चक्क दहा रुपयाच्या तीन नोटा. हा केवढा मोठा चमत्कार होता. जाणाऱ्या गाडीमध्ये पाकीट हरविले म्हणून घरी येताना येणाऱ्या गाडीमध्ये गरजेपुरते पैसे मिळाले. ही फार विलक्षणीय घटना. असाच दोन-तीन वेळा रेल्वेने प्रवास करताना चालू गाडीवर बाहेरुन दगड मारणाऱ्या गुंडांच्या माऱ्यातून थोडक्यात वाचले असे त्यांचे म्हणणे ही सर्व परम पुज्य बाबांचीच कृपा आहे. पिता हा पुत्राला जन्म देतो तर गुरु त्याची जन्मापासून सुटका करतो म्हणून पित्यापेक्षा गुरुला श्रेष्ठ मानले जाते. कुठलीही अपेक्षा न करता सद्‌गुरुवर श्रध्दा ठेवल्यास त्याचे फळ आपोआप मिळते हेच या अनुभवातून दिसून आले.

www.sadgurusadanandmaharaj.com

# बाबांची दक्षिणची यात्रा

१९७४ साली कोरवारला पुराण झाले होते हे आधीच सांगितले आहे. त्यानंतर बाबा मुंबईला आले. पुढे काही दिवसांनी दक्षिण भारताकडे निघाले. बरोबर पालघरशेट्टी होतेच. मुंबईहून प्रथम बेळगावला आले. त्यानंतर तिरुपतीला जाऊन श्री. व्यंकटेशाचे दर्शन घेऊन पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या गोविंदपट्टण येथे येऊन तेथून तिरुथिन्नीला आले. त्यानंतर कंचि-कामाक्षीला आले.

कंचि-कामाक्षी येथे 'कामाष्ठी' मंदीर आहे. त्या देवळाच्या मागे एक आंब्याचे झाड आहे. त्या झाडाचे वैशिष्टय म्हणजे त्याला तीन फांद्या असून प्रत्येक फांदीला वेगवेगळ्या चवीचे आंबे येतात. त्या झाडाखाली शंकर-पार्वतीची मूर्ती आहे. तिथल्या पुजाऱ्याने बाबांकडून त्यांची पूजा करवून बाबांच्या गळ्यात एक हार घातला. बाबांनी तो हार काढला. शेट्टींच्या हाती दिला व "हा हार पेटीत जपून ठेव." असे सांगितले.

बाबांना रोज शेकडो हार घातले जातात. तरी पण फक्त हाच हार तेवढा का जपून ठेवायला सांगितले ते शेट्टींना कळले नाही. शेट्टींनी बाबांच्या सूचनेप्रमाणे तो हार एका पेटीत जपून ठेवला. कंची कामाक्षीहून इतर अनेक क्षेत्रांना भेटी देऊन बाबा रामेश्वरला आले. तेथे यथासांग रामेश्वराची पूजा करुन रामेश्वर मंडपाला आले. तिथून पुढे कन्याकुमारीस जावयाचे होते. प्रवास दूरचा होता. गाडीत फक्त पाच लिटर पेट्रोल होते. तिथला पेट्रोल पंपही त्या दिवशी बंद होता. पेट्रोलशिवाय पुढे जाणे अशक्य होते. ड्रायव्हरच्या निष्काळजीपणाबद्दल बाबा खूप रागावले. ड्रायव्हर व शेट्टी निमूटपणे खाली मान घालून बसले. तेवढयात अचानक पणे तिथे एक जीप गाडी आली. त्यात कोणीतरी मोठा सरकारी अधिकारी होता. बाबांची गाडी उभी असलेली पाहून त्याने "काय अडचण आहे ?" असे विचारले. ड्रायव्हरने पेट्रोलची अडचण सांगितल्यावर तो म्हणाला "काही काळजी करु नका. तुमची गाडी पुढे न्या. मी मागून येतो. पेट्रोल वाटेत संपले तर माझ्या जीपमधील पेट्रोल देईन." प्रवासाला सुरुवात झाली. जरा पुढे गेल्यावर अपेक्षेप्रमाणे पेट्रोल संपले. जीपमधील पेट्रोल घालून पुन्हा पुढे प्रवास सुरु झाला. थोडयावेळानंतर एक पेट्रोल पंप लागला. पेट्रोलसाठी बाबांची गाडी थांबली. मागे वळून पाहातात तो जीप मात्र दिसेना. हा केवळ बाबांचा चमत्कारच आहे याची ड्रायव्हरला व शेट्टींना खात्री झाली.

पेट्रोल भरुन परम पुज्य बाबांची गाडी ताशी १००-१२५ मैल वेगाने जोरात धावत होती. इतक्यात मध्ये एक दुर्घटना घडली. गाडी रस्ता सोडून बाजूच्या खडयात गेली. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. कसेबसे सगळेजण बाहेर पडले. गाडी परत रस्त्यावर कशी आणायची असा विचार करीत असताना त्यांना एक ट्रक येत असलेला दिसला. त्यात आठ दहा मजूर होते. बाबांची गाडी खडयांत

www.sadgurusadanandamaharaj.com

असलेली पाहून ट्रक थांबवून त्या गाडीतल्या मजूरांनी बाबांची गाडी रस्त्यावर आणून ठेवली. एवढे झाल्यावर तो ट्रक जरा पुढे गेला व दिसेनासा झाला. हाही बाबांचा एक चमत्कारच.

प्रवास पुढे सुरु झाला. कन्याकुमारीला येऊन तिथे स्नान, पूजा आदी आटोपून मदुराई मार्गे बेंगळूरला आले. गाडी वेगाने चालली होती. रात्रीच गाडी मदुराई मागे टाकून पुढे गेली. बाबा झोपले होते. मदुराईपासून जवळजवळ पन्नास मैल गेल्यावर बाबा एकदम जागे झाले व ''तुम्हाला देवीचे मंदीर दिसत नाही का ? देवीचे दर्शन न घेता पुढे कसे आलात ? परत चला'' असं म्हणाले. झोपेत असतांना पन्नास मैलांच्या अंतरावरुन बाबांना कसे कळले कोणास ठाऊक ? बाबांनी सांगितल्याप्रमाणे परत मदुराईला येऊन देवीचे दर्शन घेऊन पुढे प्रवासाला सुरुवात केली. मदुराईहून सेलम येथे जाऊन तेथून बेंगलूरला आले. नेहमीप्रमाणे ''पॅलेस लॉज'' येथे उतरले. तिथले भक्त बाबांच्या दर्शनाला आले.

एकदा तिथला एक कापडाचा व्यापारी बाबांच्या दर्शनाला आला. त्याला बाबांनी ''कंची कामाक्षीहून आणलेला पेटीतला हार आणायला सांगितले. व्यापाऱ्याने तो हार आणून दाखवीत म्हटले, ''हा तर सुकलेला आहे.'' बाबांनी हसून तो हार घेतल्याबरोबर एक चमत्कार घडला. तिथल्या भक्तांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. वाळलेल्या फुलांच्या हाराऐवजी रुद्राक्षाची माळ तयार झाली होती. त्यात मोठेमोठे एकशे आठ रुद्राक्ष होते. त्यांतला एक रुद्राक्ष त्या व्यापाऱ्याला देऊन बाबांनी ''हा तुझ्या गळयात घाल. तुझा उत्कर्ष होईल.'' असा आशिर्वाद देऊन त्यानंतर परत तो हार पेटीत ठेवण्यास सांगितले.

बेंगळूरहून बाबा अमरेश्वरला आले. बाबांनी आपल्या बालपणातील काही दिवस येथे घालविले आहेत. त्यावेळी त्यांनी तेथे केलेल्या अनेक चमत्कारांचे वर्णन आधीच केले आहे. अमरेश्वरहून बाबा विजापूरला आले. तेथे आल्यावर एकदा शेट्टींना बोलावून ''तू पंधरा-सोळा वर्षांपूर्वी माझी सेवा मनोभावे केलीस. त्यावेळी सुध्दा तुला यात्रेला घेऊन आलो होतो. पण आशिर्वाद मात्र दिला नाही. आता सुध्दा माझी सेवा तू केली आहेस. तुझ्यावर संतुष्ट होऊन मी तुला यात्रेला घेऊन आलो. यावेळी मात्र तुला आशिर्वाद द्यायचा आहे.'' असे म्हणाले. पंधरा-सोळा वर्षांपूर्वीच्या सर्व घटनांचे वर्णन बाबांनी अचूक केल्याचे पाहून नव्वद वर्षांच्या त्या सदानंद महाराजांचा व अंदाजे चाळीस वर्षाच्या या सदानंद स्वामींच्या संबंधाचा उलगडा न होता अवाक् होऊन शेट्टी गप्प बसून राहिले.

❀ ❀ ❀ ❀ ❀

www.sadgurusadanandamaharaj.com

# मुंबईचा दत्तजयंती उत्सव

१९७५ ला दत्त जयंतीचा उत्सव मुंबईच्या आश्रमात मोठया थाटात पार पडला. १८ डिसेंबर, १९७५ हा दत्त जयंतीचा दिवस. १६ तारखेपासूनच विजापूर, तेलगी, सासनूर, कोरवार, नाशिक, आदी ठिकाणाहून भक्त उत्सवासाठी व बाबांच्या दर्शनासाठी येऊ लागले. बाबा आलेल्या प्रत्येक भक्ताची आस्थेवाईकपणे चौकशी करीत होते. परगावाहून आलेल्या भक्तांच्या राहाण्याच्या व जेवण्याच्या व्यवस्थेतही बाबा जातीने लक्ष घालीत होते. आनंदी उत्साहाने आश्रमाचा परिसर भरुन राहिला होता. आलेले भक्त एकाच कुटुंबातील असल्याप्रमाणे वागत होते. भिन्न भाषा व भिन्न जातींचे भक्त असे एकोप्याने राहिले. ते केवळ बाबांच्या प्रेमरज्जूंनी बांधले गेल्यामुळेच हे सांगावयास नकोच.

१६ तारखेच्या रात्री भजन आटोपल्यावर बाबा, परगावच्या व काही मुंबईच्या भक्तांबरोबर बोलत बसले होते. रात्र सरत होती. बाबा विशेष खुषीत होते. पहाटे तीन चारच्या सुमारास त्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज दिसू लागले. बाबांनी सर्वांना आत्मलिंगाचे दर्शन दिले.

१७ तारखेस सुध्दा भक्तांनी संपूर्ण दिवस भजन आणि आरती करण्यात घालविला. उत्साह वाढतच होता. जास्तीत जास्त मंडळी परगावांहून येऊ लागली. त्यांची व्यवस्था करण्यात मुंबईचे भक्त गुंतले होते. रात्री १२ वाजेपर्यंत दर्शन घेण्याचा कार्यक्रम चालूच होता. त्यानंतर लिहीत असलेल्या बाबांच्या चरित्राचे वाचन झाले. चरित्र वाचीत असतांना रुद्राक्षाचा महिमा सांगण्याचा एक प्रसंग आला. रुद्राक्षाच्या महिम्याचे वर्णन चालू असताना बाबांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज दिसू लागले. तिथल्या भक्तांना बाबांनी हात वर करुन आशिर्वाद दिला आणि तळहात गालावर घासून एक रुद्राक्ष काढला. तो रुद्राक्ष पाटील नावाच्या निवृत्त अधिकाऱ्याला आशिर्वाद म्हणून दिला. दत्त जयंतीच्या प्रात:काळी आशिर्वाद मिळालेला तो भक्त खरोखरच पुण्यवान असला पाहिजे. चरित्र वाचन पहाटे तीन वाजेपर्यंत चालू होते.

आश्रमाचे मुख्य व्यवस्थापक सुंदर शेट्टी, जोशी व इतर काही भक्त बाहेर दत्त जयंतीसाठी आलेल्या हजारो भक्तांना महाप्रसाद करण्यासाठी शेगडी पेटवावी म्हणून ब्रह्ममूहूर्ताची (४।। वा.) वाट पाहात होते. गप्पांत वेळ कसा गेला तो कळला नाही. घडयाळाकडे पाहिले तो ४-३५ झाले होते. गडबडून सगळेजण उठले. पाच मिनीटे उशीर झाला म्हणून त्यांना वाईट वाटले. बाबांची संमती घेऊन शेगडी पेटविण्यास गेले. पहिल्यांदा तीन शेगडयांपैकी दोन शेगडया तेल ओतून पेटविल्या. त्यानंतर तिसरी पेटविण्यास गेले तो सर्वांना धक्काच बसला. शेगडी अगोदरच पेटलेली होती. दहा पंधरा मिनिटे आधीच ती पेटली असावी. पण ती पेटविली कुणी ?

www.sadgurusadanandamaharaj.com

तिथे असलेले सगळे 'मी नाही तू नाही' म्हणू लागले. ही बाबांचीच करणी असली पाहिजे अशी सर्वांचीच खात्री झाली. ब्रह्ममुहूर्त चुकल्याबद्दल भक्तांना वाईट वाटू नये म्हणून बाबांनीच ती शेगडी वेळेवर पेटविली असणार.

१८ तारखेपासूनच सगळीकडे उत्साहाचे वातावरण होते. भक्तांची रीघ लागली. आरती झाल्यावर बाबांचे दर्शन व प्रसाद वाटप सुरु झाले. हे दुपारी तीन वाजेपर्यंत चालू होते. सुमारे पाच हजार लोकांनी तरी तोपर्यंत बाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. त्यानंतर संध्याकाळच्या कार्यक्रमाची तयारी सुरु झाली. आश्रम फुलांनी सजविण्यात आला. संध्याकाळी पाच वाजल्यापासूनच भक्त येऊ लागले. बघता बघता आश्रम आणि भोवतालचा परिसर दत्त जयंतीच्या समारंभात भाग घेणाऱ्या भक्तांनी फुलून गेला. पावणेसातच्या सुमुहूर्तावर दत्त जयंतीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर नेहमीची आरती झाली. बाबा शृंगारलेल्या आसनावर विराजमान झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावर आगळीच शोभा होती. आपण साक्षात दत्त राजाचेच दर्शन घेत आहोत असे प्रत्येक भक्ताला भासत होते. तास दोन तास रांगेत उभे राहून शिस्तीने सात-आठ हजार भक्त लोक बाबांचे दर्शन घेऊन धन्य झाले. दर्शनाचा कार्यक्रम चालू असता आश्रमात विजापूरचे भीमराव जोशी, वसंत आजगावकर आणि पं. भीमसेन जोशी यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम चालू होता. सर्वलोक मंत्र मुग्ध होऊन त्यांचे गाणे ऐकत होते.

रात्री साडेअकरापर्यंत दर्शनाचा कार्यक्रम चालू होता. बाबांच्या आशिर्वादाने दत्त जयंतीचा उत्सव यथासांग पार पडला. परगावाहून आलेले भक्त पुढे एक दोन दिवसांनी आपापल्या गावी परत गेले. उत्साहाच्या सोहळयात भाग घेता आला म्हणून त्यांना धन्यता वाटली असली पाहिजे.

श्री. ए. बी. कुलकर्णी नावाचे गृहस्थ रोज बाबांच्या दर्शनाला येतात. ते सत्य साईबाबांचे भक्त आहेत. बाबांचे दर्शन घेते वेळी त्यांना बाबांच्या ठिकाणी सत्य साईबाबांचेच रुप दिसते असे ते म्हणतात. भक्तांच्या आराध्य दैवतेचेच दर्शन बाबा घडवितात याचे हे आणखी एक उदाहरण.

एवढेच नव्हे तर बाबा आपल्या आराध्य दैवतेच्या पूजेस उत्तेजनही देतात. एकदा बाबा कुलकर्णींच्याकडे जेवायला गेले होते. जेवणाच्या आधी भजन आणि आरती झाली. घरात चाललेल्या साई भजनात बाबा रंगून गेले. ''तुम्ही रोज म्हणता तीच आरती म्हणा'' असे बाबांनी पति-पत्नींना सांगितले.

भोजन झाल्यावर कुलकर्णींना आशिर्वाद म्हणून एक वस्तू देऊन त्यांची रोज पूजा करण्यास सांगितले.

एका रविवारी बाबांनी पेण गणपतीला जावयाचे ठरविले. पंचवीस-तीस भक्त मंडळी चार-पाच गाडयांतून पेणला निघाले. कुलकर्णी पण एका गाडीत होते. दोन गाडयांमध्ये बरेच अंतर होते. मध्येच बाबांची गाडी व इतर गाडया एका रस्त्याने तर



www.sadgurusadanandamaharaj.com

कुलकर्णी बसलेली गाडी चुकून दुसऱ्याच रस्त्याने निघाली. ते पेणला जाऊन पोचले. एक तास झाला तरी बाबा किंवा इतर भक्तांच्या गाडया का आल्या नाहीत हे कळेना. दुपारचे बारा वाजून गेले होते. गणपतीचे दर्शन घ्यावे असा विचार केला पण बाबांच्या आधी आपण कसे दर्शन घ्यायचे ? असा मनात विचार येऊन त्यांना वाईट वाटू लागले. तरी पण देवाचे दर्शन घेऊन बाबांची वाट पाहत बसून राहिले. पुढे एका तासानंतर बाबा व इतर भक्त आले.

बाबांच्या बरोबर सर्वांनी देवाचे दर्शन घेतले. देवळातल्या पूजाऱ्याला बाबांनी आशिर्वाद दिला. बाबा म्हणाले, "दुपारी बारा वाजता जो पुजारी देवळात होता त्याला बोलाव" तो आल्याबरोबर त्याला बाबांनी विचारले "मी दुपारी बारा वाजता देव दर्शनाला आलो असताना मला गाभाऱ्यात का जाऊ दिले नाहीस ?" तेव्हा पुजारी नम्रतेने म्हणाला, "देवावरचे वस्त्र बदलत होतो ! म्हणून आपल्याला आंत सोडले नाही. तरीपण तुम्ही माझ्या सांगण्याकडे दुर्लक्ष करुन आत जाऊन देवाचे दर्शन घेऊन आलात."

त्याला बाबांनी "पुन्हा असं कधीही करु नकोस. रुद्राक्ष धारण करणाऱ्यांना असं कधी अडवू नये" असा उपदेश केला.

खरे तर दुपारी बारा वाजता बाबा महाड येथे होते व त्याच वेळी ते पेणच्या गणपतीच्या दर्शनाला आले ! हे पुजाऱ्याच्या तोंडून ऐकतांच, भक्तांना अतिशय आश्चर्य वाटले. पण कुलकर्णी यांना ही घटना केवळ आश्चर्यकारक नसून अर्थपूर्णही होती.

बाबांच्या आधी आपल्याला गणपतीचे दर्शन घ्यावे लागले. हे कुलकर्णींच्या मनाला सलणारे दु:ख बाबांनी अशा प्रकारे दूर केले होते.

अवतारी पुरुष एकाच वेळी अनेक ठिकाणी राहू शकतात, याची त्यांना प्रचीती आली.

एकदा दुपारी दोनच्या सुमारास आश्रमात कुलकर्णी यांना बाबांनी दोन फुले देऊन "यांची पूजा कर" असं म्हणाले. त्या फुलांची पूजा कशी आणि किती दिवस करता येईल ? असा कुलकर्णी विचार करीत असतानाच, ती फुले परत मागवून घेऊन त्यांचे रद्राक्षांत रुपांतर करुन बाबांनी त्यांना परत दिली. रुद्राक्ष आशिर्वाद म्हणून मिळाल्यामुळे कुलकर्णींना अत्यानंद झाला.

कुलकर्णी यांची धर्मपत्नी सुध्दा बाबांची भक्त आहे. त्यांनाही बाबांनी आशिर्वाद दिला आहे.

बाबाच 'साईराम' आहेत असं समजून उभयता पती-पत्नी बाबांची सेवा करतात.

www.sadgurusadanandamaharaj.com

।। ॐ ।।

प्रिय वाचक बंधू भगिनी, हो

आपण श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांनी आतापर्यंत केलेल्या भक्तांच्या दु:ख निवारणाची उदाहरणे तसेच त्यांनी दाखविलेल्या अद्‌भुत चमत्कारांचे किस्से वाचलेत.

भक्तांच्या दु:खनिवारणामुळे त्यांचे कल्याण झाले. पण चमत्कार दाखविण्यामागे उद्देश काय ? असा स्वाभाविक प्रश्न काही लोक विचारु शकतील. यात चमत्कार जरी दिसले तरी ते सर्व चमत्कार मानवी मनाचे सर्वकालिक उदात्तीकरण करण्यासाठीच केलेले आहेत हे ध्यानात घ्यावे. जन्मत: क्षुद्र असलेला माणूस मरताना महान किर्तीवंत असावा यासाठीच संतांचे प्रयत्न असतात. त्या प्रयत्नांचाच भाग या दृष्टीकोनातूनच या चमत्कारांकडे पाहावे.

बाबांनी चमत्कार दाखविले ते एखाद्या जादूगाराप्रमाणे पोट भरण्याचा उद्योग म्हणून नव्हे. आई-वडील नसलेले, सर्व बंधनांतून मुक्त अशा बाल ब्रह्मचारी बाबांना संसारातील कोणत्याच गोष्टींची आसक्ती नाही. त्यांना चिंता आणि तळमळ आहे ती फक्त भक्तांच्या कल्याणाची. त्यांना हवी ती केवळ भक्तीच.

अशा आपल्या बाबांच्या चरणी ही शब्दपुष्पांची माळ अर्पण करुन त्यांच्या या महिम्यातून जास्तीत जास्त लोकांत भक्ती उत्पन्न व्हावी आणि त्यांचे जीवन उज्वल व्हावे एवढीच श्री सद्‌गुरु सदानंद महाराजांचे चरणी प्रार्थना करुन त्यांच्या महिम्याच्या वर्णनाला अर्धविराम देतो.

**।। श्री सद्‌गुरु सदानंद महाराज की जय ।।**

**सब संतन की जय**

**ॐ शांतिः शांतिः शांतिः**



**नागेश जोशी**
संकलक

www.sadgurusadanandamaharaj.com

# स्वामी सदानंद ॐकार रुपा

स्वामी सदानंद ॐकार रुपा
वंदन करितो तुज मायबापा ।। धृ ।।

बुध्दिचा तू जनक विधाता
अग्रपूजेचा तू वरदाता
गजानना श्री आत्मरुपा ।। १ ।।

अष्ट गणेशा स्वरुप दर्शन
नाम घेऊनी झालो पावन
त्रिगुणात्मक तू त्रैमुर्तीरुपा ।। २ ।।

# ।। श्री गणपतीची आरती ।।

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ता फळांची ।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रे मनकामना पुती ।।धृ.१।।
रत्न खचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुम केशरा ।
हिरे जडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नुपूरे चरणी घागरिया ।।जय.२।।
लंबोदर पितांबर फणिवर बंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ।।जय.३।।

# आरती

दया घन दत्त राज मुर्ती । आरती जय जय त्रैमुर्ती ।।धृ।।
यरगिदा नरर हणेयोळिरुवा । दुरितवा दहिसुव गुरुदेवा
करुणेया शलेय हरिसी मनवा । रमिसुवा सगुणदि सद्भावा ।।१।।
भजकजन कामकल्प पूजा । कुजनकुल कंगडीसुव तेजा
निजदनेले गिळीसिद गुरुराजा । विजयदा मूरती यतिराजा ।।२।।
गाणगापुर निर्गुण पादा । कृष्णेया औदुंबर पादा
ध्यानिपे अमरापुर पादा । कुरवपुरताणद श्रीपादा ।।३।।
मणियुवे करुणिसु अवधूता । चिन्मया केवल सुखदाता
दणियदे योगीशन चित्ता । तणियली गुणगानदि दत्ता ।।४।।

www.sadgurusadanandmaharaj.com

# प्रार्थना - शांतनागु श्री गुरुदत्ता

शांतनागु श्री गुरुदत्ता । संतईसु एन्नय चित्ता
नी एन्नय मातापितनू । एन्नय निजहित चिंतकनू
बंधू स्वजनत्पनु नीनू । नी एन्नय संरक्षकनू
भयकर्तनु नी भयहर्ता । दंडधारिणीम परिपाता
निन्ननुळीदन्य जनव्यर्था । नीनार्तरीगाश्रयदाता ॥ १ ॥

अपराधगलिगे गुरुनाथा । दंडव पीडीदिरुवि यतार्था
पाडी निन्न मंगल चरिता । चरुणदि शिरविडुवेयुदत्ता
मत्तेम्मनु दंडिसे नीनू । निन्ननुळीदन्य जनरन्नु
बिडीसलु करेयुव द्यारन्नु । सलहुव दारेम्मनु दत्ता ॥ २ ॥

ताळुते कोपीय वेषवनु । दंडिसे पापीगळागुवुदनु
मरेदुमत्ते अपराधवनु । गैयलु क्षमिसु वदेम्मन्नु
गच्छत हस्कलनौ क्वापी । येंबुदन्नोप्पी नींकोपी
यागदे कृपे माडु प्रतापी । परिपालीपुदै भगवंता ॥ ३ ॥

तात निन्न पदरी नोळीरलु । दारियनु बिडलु कालुगळु
सहन दिंमतिद्दि दारियोळु । तरुवर्यारिल्ला अन्यरोळु
निज बिरुदनु मनदोळु तंदु । पतित पावनानीन्येंदू
दत्ता नोडेम्मनुबंदु । करुणाघन नी गुरुनाथा ॥ ४ ॥

सह कुटुंब सह परिवार । दासरुनावी मनेमार
निन्नडिगर्पीसी व्यवसार । संसारद दुःखद भार
परिहरी सै करुणा सिंधु । नी दिनानाथर बंधू
तट्टदिरले मगे अघबिंदु । वासुदेव प्रार्थीसु दत्ता
दास योगीश नंतास्ता ॥ ५ ॥

**।। असतोमा सत्गमय ।।**
**।। तमसोमा ज्योतीर्गमय ।।**
**।। मृत्योर्मा अमृतंमगमय ।।**
**।। ॐ शांती शांती शांती ।।**

www.sadgurusadanandamaharaj.com



www.sadgurusadanandamaharaj.com

## ।। श्री दत्ताची आरती ।।

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधि नये ध्याना ।।१।।
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ।।धृ.।।

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त । अभाग्यासी कैची कळे ही मात ।
पराहि परतली तेथे कैचा हेत । जन्ममरणाचाहि पुरलासे अंत ।।जय.२।।

दत्त येऊनिया उभा ठाकला । सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला । जन्म मरणाचा फेरा चुकविला ।।जय.३।।

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हरपले मन झाले उन्मन ।
मी तू पणाची झाली बोळवण । एकाजनार्दनी श्रीदत्त ध्यान ।।जय.४।।